अखंड
प्रगतीची
८०
वर्षे




# माळीनगरची यशोगाथा

दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर
१९३२
शतकपूर्तीकडे
यशस्वी वाटचाल


**लेखन-संपादन**
श्री. मनोज गायकवाड
श्रीपूर



**निर्मिती**
श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे
मॅनेजिंग डायरेक्टर
दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर

**प्रकाशक**
श्री. कृष्णकांत शंकरराव कुदळे
चेअरमन
दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर

# अणुक्रमणिका


- ध्यासपर्व ........ ३४
- साखर निर्मितीचे स्वप्न ........ ३७
- जमिनींची उपलब्धता ........ ४०
- पहिला गळीत हंगाम ........ ४३
- रौप्यमहोत्सवी वर्ष-१९५९ ........ ४६
- सहकारीकरण ........ ५१
- पुन्हा कारखाना कंपनीकडे ........ ५२
- प्रेरणा आणि श्रध्दा ........ ५६
- नवीन कारखान्याची उभारणी ........ ६२
- मोलॅसीस बेस्ड डिस्टिलरी ........ ६६
- ग्रेन बेस्ड डिस्टिलरी ........ ६८
- को-जनरेशन ........ ७०
- अष्टदशकपूर्ती सोहळा ........ ७२
- नि:स्वार्थीपणा आणि सकारात्मकता ........ ७८
- अष्टदशकपूर्तीचा आनंद आणि अभिमान ........ ८४
- उत्तम व्यवस्थापनाची घडी ........ ८८
- नव्या कारखान्यामुळे नवचैतन्य ........ ९१
- दूरदृष्टी-धडाडी आणि अभ्यासूवृत्ती ........ ९६
- सभासदांची साथ आणि प्रेरणा ........ १०२
- घनमापन पध्दतीच्या पाणी वापराचा आदर्श ........ १०४


दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर
१९३२
शतकपूर्तीकडे यशस्वी वाटचाल

- कृषीक्रांतीची ज्योत ........................................ १०६
- आखिल भारतीय माळी शिक्षण संस्था .................... १०८
- जिव्हाळ्याचे संबंध........................................ ११४
- मार्ग चालूया प्रगतीचा... ................................. ११६
- चौफेर प्रगती ................................................ १२०
- सर्वांगसुंदर शैक्षणिक परिसर................................ १२२
- टाटा-सासवड माळी-अध्यात्म............................ १२५
- दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटी .................. १२७
- सावित्री महिला औद्योगीक सहकारी संस्था .............. १३०
- महिला मंडळ............................................... १३१
- शुगरकेन सोसायटी ........................................ १३२
- महात्मा फुले पतसंस्था .................................... १३३
- माळीनगर विकास मंडळ ................................... १३४
- माळीनगर मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी........ १३५
- अजितदादा पतसंस्था..................................... १३६
- नोकरवर्ग सोसायटी........................................ १३६
- शेतकरी जागरण मंच ..................................... १३६
- जेष्ठ नागरिक सेवाभावी संस्था .............................. १३८
- महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा माळीनगर................ १४०

# मनोगत



दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि, या साखर कारखान्यास ८० वर्षे पूर्ण होत असून कारखाना आता शतकपूर्तीच्या दिशेने यशस्वी वाटचाल करीत आहे. ८० वर्षाची वाटचाल ही एखाद्या संस्थेच्या इतिहासात महत्त्वाचा टप्पा आहे. म्हणूनच आम्ही हा अष्टदशकपूर्ती सोहळा मोठ्या दिमाखाने साजरा करीत आहोत. त्याचबरोबर कारखान्याने उभारलेल्या १४.८ मेगावॅट क्षमतेच्या सहवीज निर्मिती प्रकल्पाचा उद्‌घाटन समारंभ पण दि. १० नोव्हेंबर २०१३ रोजी आदरणीय ना. श्री. शरदचंद्रजी पवारसाहेबांच्या शुभहस्ते संपन्न होत आहे ही आम्हास अभिमानाची गोष्ट आहे.

संस्थापकांनी या संस्थेच्या रूपाने माळीनगरला जे रोपटे लावले त्याचा आज वटवृक्ष झालेला आपण पहात आहोत. अष्टदशकपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने मागे वळून पाहताना आज हे जाणवते की, माळीनगर परिसराचा झालेला बदल व विकास हा सर्व सभासद, कामगार, माळीनगरवासी व हितचिंतक यांच्या एकत्रित प्रयत्नातून झालेला आहे. पुढील वाटचाल कितीही खडतर असली तरी त्यातून मार्गक्रमण करावयाचे आहे. संस्थापक संचालकांचा आशीर्वाद सदैव आपल्या सर्वांच्या पाठीशी आहे. श्री गहिनीनाथ, श्री शंकर महाराज, श्री सावता महाराज, महात्मा जोतिबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले या सर्वांचे आशीर्वाद नेहमीच आपल्यामागे असल्याची प्रचिती आपणांस संस्थेच्या संकटकाळी आलेली आहे. ही सर्व आपली प्रेरणास्थाने आहेत.

संस्थेच्या संस्थापकांनी दिलेला कारखान्याचा अमोल ठेवा पुढील पिढीकडे योग्य तऱ्हेने सुपूर्त करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. अष्टदशकपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने ' माळीनगरची यशोगाथा' ही स्मरणिका या निमित्ताने प्रकाशित केली जात आहे.

या स्मरणिकेसाठी ज्यांनी मेहनत घेतली ते मॅनेजिंग डायरेक्टर श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे, सर्व माजी मॅनेजिंग डायरेक्टर्स, सर्व संचालक, स्टाफ व कर्मचारी वर्ग, श्री. मनोज गायकवाड व इतरही हितचिंतक या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

**श्री. कृष्णकांत कुदळे**
प्रकाशक
९८२३०६८६२०

# मनोगत



दि. सासवड माळी शुगर फॅक्टरीचे चेअरमन श्री कृष्णकांत कुदळे, मॅनेजिंग डायरेक्टर श्री राजेंद्र गोपाळराव गिरमे आणि संचालक मंडळाच्या संकल्पनेतून माळीनगरची यशोगाथा या पुस्तकाची निर्मिती झाली आहे. अष्टदशकपूर्तीच्या निमित्ताने या कारखान्याच्या उभारणीचा आणि वाटचालीचा प्रेरणादायी इतिहास नव्या पिढीसमोर ठेवला पाहिजे अशी त्यांची भुमिका होती. आणि त्यातूनच या पुस्तकाची निर्मिती झाली आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून माळी समाज बांधवांच्या संघर्ष, साहस आणि जिद्दीच्या बळावर मिळविलेल्या यशाचा आलेख आपल्यासमोर ठेवला आहे.

१९३२ साली कसल्याही मुलभूत सोयी सुविधा नसताना आणि पारतंत्र्याचा काळ असताना माळी समाजातील दूरदृष्टीच्या मंडळींनी केलेली साखर कारखान्याची ही उभारणी वाटते तेवढी सहज, सोपी गोष्टी नव्हती. सासवड परिसरातून नवनिर्मितीचा ध्यास घेऊन बाहेर पडलेल्या या मंडळींनी माळीनगर येथे पारतंत्र्याच्या काळात देशातील पहिला साखर कारखाना उभा केला. केवळ माळी समाजाला नव्हे तर सबंध भारत वर्षाला अभिमान वाटावा असाच हा स्फूर्तीदायक इतिहास आहे. शेतक-यांनी शेतक-यांसाठी स्थापन केलेला हा सहकारी तत्वावरील देशातील पहिला साखर कारखाना आहे. असा गौरवपूर्ण उल्लेख महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी केलेला आहे. माळी समाज बांधवांनी म्हणजेच मराठी माणसांनी, प्रतिकुलतेवर मात करीत उभारलेली ही यशाची गुढी राज्याच्या औद्योगीकरणाला प्रेरणा व स्फूर्ती देणारी ठरली आहे. याचा रास्त अभिमान आपल्याला असलाच पाहिजे. हीच माझी भावना आहे. पत्रकारिता आणि वेगवेगळ्या कार्यक्रमांचे नियोजन या माध्यमातून या कारखान्याच्या डायरेक्टर बोर्डातील मंडळींशी माझा गेल्या वीस-बावीस वर्षाचा संबंध आहे. त्यामुळेच माळीनगरची यशोगाथा या संकल्पनेचे मी मनापासून स्वागत केले आणि हे काम करण्याची जबाबदारी स्वीकारली. ही जबाबदारी माझ्याकडे देत असताना संचालक मंडळाने माझ्यावर दाखविलेला विश्वास मला खूप महत्वाचा वाटतो. मुळातच या कारखान्यांच्या संस्थापकांची दूरदृष्टी, संघर्ष आणि प्रतिकुलतेवर मात करीत त्यांनी संपादन केलेले यश मला जाणून घ्यायचे होते. या पुस्तकाच्या निमित्ताने हा इतिहास जाणून घेण्याची संधी मला दिल्याबद्दल या सर्वांचा मी आभारी आहे. वेगवेगळ्या टप्प्यावरील घटना घडामोडींची माहिती संकलीत करीत असताना कारखान्याचे चेअरमन श्री. कृष्णकांत कुदळे, व्हा. चेअरमन श्री. विलास इनामके, मॅनेजिंग डायरेक्टर श्री राजेंद्र गोपाळराव गिरमे, माजी मॅनेजिंग डायरेक्टर्स श्री प्रदीप जाधव, श्री अरूण पांढरे, श्री विजयराव गिरमे, श्री. विजयकांत कुदळे, श्री. अरविंद जाधव यांनी मला खूप मदत केली आहे. याशिवाय आपापल्या कारकीर्दीतील वाटचाली स्पष्ट करणारे लेख उपलब्ध करून देणारे कारखान्याचे आजी-माजी पदाधिकारी आणि या पुस्तकाच्या निर्मितीसाठी समन्वयाच्या पातळीवर सतत प्रयत्नशील असलेले वेल्फअर ऑफीसर श्री सतिश झगडे यांचे सहकार्य देखील खूप महत्वाचे आहे. या सर्वांचा मी मनापासून ऋणी आहे.

**श्री. मनोज गायकवाड**
लेखक
मोबा. नं. ९४२२३७०६२७

# दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.

माळीनगर जि. सोलापूर

अष्टदशकपूर्ती सोहळा
व १४.८ मेगावॅट सहवीज निर्मिती प्रकल्प

## उद्घाटन समारंभ

रविवार, दि. १० नोव्हेंबर २०१३
वेळ : सकाळी १० वा.

शुभहस्ते




**मा. ना. शरदचंद्रजी पवारसाहेब**
कृषीमंत्री भारत सरकार

## कार्यक्रमाचे अध्यक्ष



**मा. ना. अजितदादा पवार**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

## प्रमुख उपस्थिती



**मा. ना. छगनराव भुजबळ**
सार्वजनिक बांधकाम मंत्री,
महाराष्ट्र राज्य



**मा. ना. हर्षवर्धन पाटील**
सहकार व संसदीय कामकाज मंत्री,
महाराष्ट्र राज्य



**मा. ना. गणेश नाईक**
उत्पादनशुल्क व अपारंपारीक उर्जा मंत्री
महाराष्ट्र राज्य



**मा. आ. विजयसिंह मोहिते-पाटील**
माजी उपमुख्यमंत्री ,
महाराष्ट्र राज्य



**मा. ना. दिलीप सोपल**
पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री,
महाराष्ट्र राज्य




**मा. श्री. रामराजे निंबाळकर**
कार्याध्यक्ष,
राज्य नियोजन मंडळ

शतकपूर्तीकडे
यशस्वी वाटचाल

जिद्द, चिकाटी, धाडस आणि कोणत्याही संकटावर मात करायची हिम्मत ठेवून आपला संकल्प पूर्ण करणाऱ्या संस्थापक संचालकांच्या कर्तृत्वाला सलाम...


# संस्थापक



कै. हणमंतराव गणपतराव गिरमे



कै. देऊबाई हणमंतराव गिरमे




कै. हरीभाऊ बळवंतराव गिरमे




कै. गंगूबाई हरीभाऊ गिरमे



कै. पार्वतीबाई हरीभाऊ गिरमे




कै. रा. ब. नारायणराव सोपानराव बोरावके



कै. लक्ष्मीबाई नारायणराव बोरावके

जिद्द, चिकाटी, धाडस आणि कोणत्याही संकटावर मात करायची हिम्मत ठेवून आपला संकल्प पूर्ण करणाऱ्या संस्थापक संचालकांच्या कर्तृत्वाला सलाम...


# संस्थापक



कै. मारूतीराव खंडूजी पांढरे




कै. लक्ष्मीबाई मारूतीराव पांढरे



कै. भगवंतराव गेणूजी गिरमे



कै. मुक्ताबाई भगवंतराव गिरमे



कै. गणपतराव दत्तूजी रासकर



कै. सगुणाबाई गणपतराव रासकर

जिद्द, चिकाटी, धाडस आणि कोणत्याही संकटावर मात करायची हिम्मत ठेवून आपला संकल्प पूर्ण करणाऱ्या संस्थापक संचालकांच्या कर्तृत्वाला सलाम...

# संस्थापक



कै. शंकरराव भाऊराव राऊत




कै. वेणूताई शंकरराव राऊत



कै. रघुनाथ सोपानराव इनामके



कै. गिताबाई रघुनाथ इनामके



कै. शंकरराव शिवराम कुदळे



कै. मुक्ताबाई शंकरराव कुदळे



कै. सीताबाई शंकरराव कुदळे

जिद्द, चिकाटी, धाडस आणि कोणत्याही संकटावर मात करायची हिम्मत ठेवून आपला संकल्प पूर्ण करणाऱ्या संस्थापक संचालकांच्या कर्तृत्वाला सलाम...

# संस्थापक



कै. शंकरराव बाळकुजी इनामके




कै. यमुनाबाई शंकरराव इनामके



कै. जाईबाई शंकरराव इनामके




कै. सोपानराव बापूराव गिरमे



कै. लक्ष्मीबाई सोपानराव गिरमे




कै. नारायणराव राघूजी गिरमे




कै.वेणूबाई नारायणराव गिरमे

जिद्द, चिकाटी, धाडस आणि कोणत्याही संकटावर मात करायची हिम्मत ठेवून आपला संकल्प पूर्ण करणाऱ्या संस्थापक संचालकांच्या कर्तृत्वाला सलाम...


# संस्थापक



कै. रामचंद्र भगवंत गिरमे



कै. लक्ष्मीबाई रामचंद्र गिरमे



कै. कृष्णाजी रामजी बोरावके



कै. शेवंताबाई कृष्णाजी बोरावके




कै. बापूराव राघूजी बोरावके




कै. पार्वतीबाई बापूराव बोरावके

# कार्यकाल
## सर्व संचालक



कै. गणपतराव दत्तुजी रासकर
१९३२-३३ ते १९५२-५३


कै. बापुराव राघुजी बोरावके
१९३२-३३ ते १९३३-३४


कै. रा.ब. नारायणराव सोपानराव बोरावके
१९३२-३३ ते १९६६-६७


कै. मारुती खंडूजी पांढरे
१९३२-३३ ते १९६४-६५


कै. नारायणराव राघुजी गिरमे
१९३२-३३ ते १९३५-३६,
१९३७-३८ ते १९३९-४०



कै. कृष्णाजी रामजी बोरावके
१९३२-३३


कै. शंकरराव भाऊराव राऊत
१९३२-३३ ते १९६९-७०



कै. सोपानराव बापुराव गिरमे
१९३२-३३ ते १९३६-३७,
१९४०-४१ ते १९५५-५६


कै. रघुनाथराव सोपानराव इनामके
१९३२-३३,
१९३६-३७ ते १९६२-१९६३

# कार्यकाल
## सर्व संचालक



**कै. शंकरराव शिवराम कुदळे**
१९३२-३३ ते १९३६-३७,
१९४०-४१ ते १९५५-५६



**कै. हरिभाऊ बळवंतराव गिरमे**
१९३२-३३ ते १९६९-७०




**कै. भगवंतराव गेणुजी गिरमे**
१९३३-३४ ते १९३६-३७,
१९४२-४३ ते १९६८-६९




**कै. जमनादास एम. मेहता**
१९३५-३६ ते १९३८-३९




**कै. शंकरराव बाळकुजी इनामके**
१९३४-३५ ते १९५९-६०



**कै. रामचंद्र भगवंत गिरमे**
१९३७-३८ ते १९४१-४२



**कै. तुकाराम राघुजी बोरावके**
१९३७-३८ ते १९३९-४०



**कै. कृष्णाजी लक्ष्मण गिरमे**
१९५६-५७ ते १९६९-७०



**कै. भगवंतराव मारुतीराव जाधव**
१९५६-५७ ते १९६४-६५


# कार्यकाल
## सर्व संचालक



कै पंढरीनाथ हनुमंतराव गिरमे
१९५७-५८ ते १९७६-७७




कै. जगन्नाथ गणपतराव रासकर
१९५७-५८ ते १९६८-६९



कै.चंद्रकांत शंकरराव कुदळे
१९६५-६६ ते १९६९-७०



कै. शंकरराव मारुतीराव गिरमे
१९६५-६६ ते १९६९-७०




कै. अनंतराव मारुतीराव पांढरे
१९६६-६७



कै. दामोदर शंकरराव इनामके
१९६६-६७



श्री. विजयराव नारायणराव बोरावके
१९६७-६८ ते १९६९-७०



कै. पुंडलिक हरिभाऊ गिरमे
१९६९-७० ते १९७६-७७



कै. सदानंद शंकरराव राऊत
१९६९-७० ते १९७४-७५

# कार्यकाल


## सर्व संचालक



**कै. नामदेव महादेवराव भोंगळे**
१९६९-७०



**कै. दिगंबर शंकरराव इनामके**
१९७०-७१ ते १९७५-७६



**कै. वामनराव दत्तात्रय गिरमे**
१९७०-७१ ते १९७७-७८



**श्री. प्रभाकर शंकरराव रासकर**
१९७१-७२ ते १९८१-८२



**श्री. प्रदीप भगवंतराव जाधव**
१९७५-७६ ते १९८७-८८



**श्री. अरूण अनंतराव पांढरे**
१९७६-७७ ते १९७८-७९,
१९८२-८३ ते २००२-०३,
२००५-०६ ते २०१०-११



**श्री. विजय शंकरराव गिरमे**
१९७७-७८ ते १९९९-२०००
२००१-०२ ते २०१२-१३ (कार्यरत)



**श्री. मधुकरराव हरिभाऊ गिरमे**
१९७७-७८ ते १९८४-८५



**श्री. निळकंठ राजाराम रासकर**
१९७८-७९ ते १९८३-८४,
२००२-०३ ते २००४-०५,

# कार्यकाल

## सर्व संचालक




कै. वसंतराव शंकरराव राऊत
१९७९-८० ते २००७-२००८



कै. गजानन शंकरराव इनामके
१९७९-८० ते १९८७-८८



श्री. अरविंद एकनाथराव जाधव
१९७९-८०



कै. शंकरराव नारायणराव बोरावके
१९८२-८३ ते १९८३-८४



श्री. विजयकांत शंकरराव कुदळे
१९८३-८४ ते २००९-१०



कै. जनार्दन निवृत्तीराव गिरमे
१९८४-८५ ते १९८९-९०



श्री. गौतम मधुकरराव गिरमे
१९८५-८६ ते १९९३-९४



श्री. रामचंद्र नारायणराव गिरमे
१९८६-८७ ते १९८९-९०



सौ. उर्मिला प्रदीप जाधव
१९८७-८८ ते १९९०-९१

# कार्यकाल

## सर्व संचालक



**श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे**
१९८८-८९ ते २०१२-१३
(कार्यरत)



**श्री. सुनिल विश्वानंद पाषाणकर**
१९८९-९० ते १९९२-९३



**कै. दिलीप निवृत्तीराव इनामके**
१९९०-९१ ते १९९७-९८



**कै. राजेंद्र कृष्णकांत गिरमे**
१९९०-९१ ते १९९२-९३,
१९९७-९८ ते २००२-०३



**श्री. रत्नदीप नारायणराव जाधव**
१९९३-९४ ते २००१-२००२



**श्री. अनिल कोंडीबा रासकर**
१९९३-९४ ते २००२-२००३



**श्री. नंदकुमार जगन्नाथराव गिरमे**
१९९४-९५ ते २००४-०५
२०११-१२ ते २०१२-१३ (कार्यरत)



**श्री. सुनिल दत्तात्रय बोरावके**
१९९७-९८ ते २०००-२००१,
२००५-०६ ते २०१०-११



**श्री. गणेश ज्ञानदेवराव इनामके**
२०००-०१ ते २००२-०३,
२०११-१२ ते २०१२-१३ (कार्यरत)

# कार्यकाल
## सर्व संचालक



श्री. सतीश दिगंबर गिरमे
२००१-०२ ते २००४-०५
२०१२-१३ (कार्यरत)



कै. संजय वसंतराव गिरमे
२००२-०३ ते २००७-०८



श्री. नितीन राजाराम झगडे
२००२-०३



श्री. हरिभाऊ सोपानराव भोंगळे (जाधव)
२००२-०३ ते २००८-०९



श्री. वसंतराव मल्हारी ताम्हाणे
२००२-०३ ते २०१२-१३ (कार्यरत)



श्री. विलास दामोदरराव इनामके
२००२-०३ ते २०१२-१३ (कार्यरत)



श्री. सुरेंद्र सदाशिवराव गिरमे
२००५-०६ ते २०१०-११



श्री. हेमंत रामचंद्र रासकर
२००९-१० ते २०११-१२



श्री. परेश दिगंबर राऊत
२००८-०९ ते २०१२-१३ (कार्यरत)

# कार्यकाल

## सर्व संचालक



**श्री. कृष्णकांत शंकरराव कुदळे**
२०१०-११ ते २०१२-१३ (कार्यरत)



**श्री. राहुल कृष्णकांत गिरमे**
२००८-०९ ते २०१२-१३



**श्री. प्रविण अनंतराव पांढरे**
२०११-१२ ते २०१२-१३ (कार्यरत)



**श्री. अश्विन कृष्णकांत गिरमे**
२०१३ (कार्यरत)


# कार्यकाल
## सर्व मॅनेजिंग डायरेक्टर



**कै. हरिभाऊ बळवंतराव गिरमे**
१९३२-३३, १९४०-४१ ते १९४१-४२,
१९४३-४४ ते १९६३-६४



**कै. पुंडलिकराव हरिभाऊ गिरमे**
१९७०-७१ ते १९७४-७५



**कै. वामनराव दत्तात्रय गिरमे**
१९७५-७६ ते १९७६-७७



**श्री. प्रदीप भगवंतराव जाधव**
१९७७-७८ ते १९८६-८७



**श्री. विजय शंकरराव गिरमे**
१९८७-८८ ते १९८८-८९



**श्री. अरुण अनंतराव पांढरे**
१९८९-९० ते १९९७-९८



**श्री. विजयकांत शंकरराव कुदळे**
१९९८-९९ ते २०००-०१



**श्री. अरविंद एकनाथराव जाधव**
२००१-०२ ते २००५-०६




**श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे**
**(कार्यरत)**
२००६-०७ ते २०१२-१३

# कार्यकाल

## सर्व चेअरमन



**कै. हरिभाऊ बळवंतराव गिरमे**
१९३३-३४ ते १९३४-३५,
१९३९-४० ते १९५०-५१



**कै. गणपतराव दत्तूजी रासकर**
१९३२-३३




**कै. जमनादास एम. मेहता**
१९३५-३६ ते १९३८-३९



**कै. मारूती खंडूजी पांढरे**
१९५३-५४ ते १९५५-५६,
१९५८-५९



**कै. रघुनाथराव सोपानराव इनामके**
१९५१-५२ ते १९५२-५३



**कै. रा. ब. नारायणराव सोपानराव बोरावके**
१९५६-५७ ते १९५७-५८



**कै. शंकरराव भाऊराव राऊत**
१९५९-६० ते १९६०-६१

# कार्यकाल
## सर्व चेअरमन



कै. भगवंतराव मारूती जाधव
१९६३-६४




कै. भगवंतराव गेणूजी गिरमे
१९६१-६२ ते १९६२-६३



कै. पंढरीनाथ हणमंतराव गिरमे
१९६४-६५ ते १९७०-७१



श्री. प्रभाकर शंकरराव रासकर
१९७५-७६ ते १९७६-७७



कै. वामनराव दत्तात्रय गिरमे
१९७१-७२ ते १९७४-७५



श्री. प्रदीप भगवंतराव जाधव
१९७७-७८



श्री. अरूण अनंतराव पांढरे
१९७८-७९, १९८७-८८
ते १९८८-८९

# कार्यकाल
## सर्व चेअरमन



श्री. निळकंठ राजाराम रासकर
१९८२-८३ ते १९८३-८४



श्री. विजय शंकरराव गिरमे
१९७९-८० ते १९८१-८२,
१९८५-८६ ते ८६-८७
२००२-०३ ते २००४-०५



कै. वसंतराव शंकरराव राऊत
१९८४-८५, २००५-२००६



श्री. अरविंद एकनाथराव जाधव
१९९८-९९ ते १९९९-२०००



श्री. अनिल कोंडीबा रासकर
२०००-२००१ ते २००१-०२



श्री. विजयकांत शंकरराव कुदळे
१९८९-९० ते १९९७-९८,
२००६-०७ ते २००९-१०




श्री. कृष्णकांत शंकरराव कुदळे
(कार्यरत) २०१०-११
ते २०१२-१३

# कार्यकाल
## सर्व व्हाईस चेअरमन



कै. बापूराव राघूजी बोरावके
१९३२-३३




कै. हरिभाऊ बळवंतराव गिरमे
१९३५-३६, १९३७-३८,१९३८-३९



कै. कृष्णाजी लक्ष्मण गिरमे
१९६४-६५ ते १९६५-६६




कै. जगन्नाथ गणपतराव रासकर
१९६६-६७



कै. चंद्रकांत शंकरराव कुदळे
१९६७-६८



कै. शंकरराव मारूतीराव गिरमे
१९६८-६९



श्री. विजयराव नारायणराव बोरावके
१९६९-७०



कै. सदानंद शंकरराव राऊत
१९७०-७१

# कार्यकाल
## सर्व व्हाईस चेअरमन



कै. दिगंबर शंकरराव इनामके
१९७१-७२ ते १९७२-७३, १९७५-७६



श्री. प्रभाकर शंकरराव रासकर
१९७३-७४ ते १९७४-७५



श्री . प्रदीप भगवंतराव जाधव
१९७६-७७



श्री. अरूण अनंतराव पांढरे
१९७७-७८,१९८५-८६ ते १९८६-८७



श्री. निळकंठ राजाराम रासकर
१९७८-७९, १९८०-८१ ते १९८१-८२



श्री. मधुकरराव हरिभाऊ गिरमे
१९७९-८०



कै. वसंतराव शंकरराव राऊत
१९८२-८३ ते १९८३-८४



श्री. अरविंद एकनाथराव जाधव
१९८४-८५, १९९२-९३ ते १९९७-९८

# कार्यकाल
## सर्व व्हाईस चेअरमन



श्री. विजयकांत शंकरराव कुदळे
१९८७-८८ ते १९८८-८९



श्री. गौतम मधुकरराव गिरमे
१९८९-९० ते १९९१-९२



श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे
१९९८-९९ ते १९९९-२०००



कै. राजेंद्र कृष्णकांत गिरमे
२०००-०१ ते २००१-०२



श्री. नंदकुमार जगन्नाथराव गिरमे
२००२-०३ ते २००४-०५



श्री. हरिभाऊ सोपानराव भोंगळे (जाधव)
२००५-०६ ते २००८-०९



श्री. वसंतराव मल्हारी ताम्हाणे
२००९-१०



श्री. विलास दामोदरराव इनामके (कार्यरत)
२०१०-११ ते २०१२-१३

# कार्यकाल
## सर्व होलटाईम डायरेक्टर



**श्री. विजयकांत शंकरराव कुदळे**
१९९०-९१ ते १९९७-९८,
२००८-०९ ते २००९-१०



**श्री. अरविंद एकनाथराव जाधव**
१९९८-९९ ते २०००-०१



**श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे**
२००१-०२ ते २००५-०६



**कै. वसंतराव शंकरराव राऊत**
२००६-०७ ते २००७-०८



**श्री. वसंतराव मल्हारी ताम्हाणे**
(कार्यरत)
२०१०-११ ते २०१२-१३

## दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि;
## या कंपनीचे मेमॉरण्डम व अर्टिकल्स ऑफ असोसिएशन
## (उद्देश, घटना व नियम-१९३२)

**१९३२ साली कंपनीचा उद्देश, घटना व नियम तयार करण्यात आले.**
**यावेळी ज्या व्यक्तींनी जेवढे शेअर्स घेण्याचे आश्वासन दिले होते. त्याची माहिती स्पष्ट करणारा तक्ता.**

| अ. नं. | सही करणाराचे नांव | सही करणाराचा पत्ता व वर्णन | घेतलेल्या शेअर्सची संख्या |
|---|---|---|---|
| १ | गणपत दत्तूजी रासकर | उंसाचे मळेकरी, कोपरगांव तालुका लोकल बोर्डाचे सभासद | ५२ |
| २ | भगवंत गेणूजी गिरमे | उंसाचे मळेकरी, कोपरगांव | ५१ |
| ३ | हरिभाऊ बळवंत गिरमे | उंसाचे मळेकरी,कोपरगांव, अहमदनगर जिल्हा लोकल बोर्डाच्या स्कूल बोर्डाचे सभासद | ५२ |
| ४ | बापूराव राघूजी बोरावके | उंसाचे मळेकरी, शिर्डी; अहमदनगर लोकल बोर्डाचे उपाध्यक्ष | ५२ |
| ५ | नारायणराव सोपानराव बोरावके | उंसाचे मळेकरी, कोपरगांव अहमदनगर जिल्हा लोकल बोर्डाचे आणि डिव्हिजनल बोर्ड ऑफ अग्रिकल्चरलचे सभासद | १०० |
| ६ | कृष्णाजी रामजी बोरावके | उंसाचे मळेकरी, बारामती | २५ |
| ७ | भागोजी शिवराम गिरमे | उसांचे मळेकरी, सासवड | २८ |
| ८ | शंकर शिवराम कुदळे | उसांचे मळेकरी, कोपरगांव | ५२ |
| ९ | मारूती खंडूजी पांढरे | उसांचे मळेकरी, कोपरगांव | ५२ |
| १० | शंकरराव भाऊराव राऊत | उसांचे मळेकरी, कोपरगांव | ५२ |
| ११ | शंकर बाळकू इनामके | उसांचे मळेकरी, कोपरगांव | ३२ |
| १२ | दगडू गणपत गिरमे | उसांचे मळेकरी, कोपरगांव | ३२ |
| १३ | रघुनाथ हणमंत गिरमे | उसांचे मळेकरी, कोपरगांव | ५२ |
| १४ | रामचंद्र भगवंत गिरमे | उसांचे मळेकरी, कोपरगांव | २६ |
| १५ | लक्ष्मण पिराजी बोरावके | उसांचे मळेकरी, बेलापूर रोड | २५ |
| १६ | महादेव कृष्णाजी गिरमे | उसांचे मळेकरी, बेलापूर रोड | ३२ |
| १७ | सोपानराव बापूराव गिरमे | उसांचे मळेकरी, बेलापूर रोड | ३२ |

# पहिले संचालक मंडळ

या कंपनीच्या आर्टिकल ८५ अन्वये सह्या करणारांची सभा कोपरगांव येथे बुधवार तारीख २३ नोव्हेंबर १९३२ रोजी पहिले डायरेक्टर्स नेमण्याकरितां भरविण्यात आली आणि खालील सद्गृहस्थांना पहिले डायरेक्टर्स म्हणून नेमण्यात आले आहे.

| अ. नं. | नांव | वर्णन व पत्ता |
|---|---|---|
| १ | गणपत दत्तूजी रासकर | उंसाचे मळेकरी, कोपरगांव, कोपरगांव तालुका लोकल बोर्डाचे सभासद |
| २ | बापूराव राघूजी बोरावके | उंसाचे मळेकरी, शिर्डी; अहमदनगर लोकल बोर्डाचे उपाध्यक्ष |
| ३ | नारायणराव सोपानराव बोरावके | उंसाचे मळेकरी, कोपरगांव अहमदनगर जिल्हा लोकल बोर्डाचे आणि डिव्हिजनल बोर्ड ऑफ अग्रिकल्चरलचे सभासद |
| ४ | मारूती खंडूजी पांढरे | उसांचे मळेकरी, कोपरगांव; जि. अहमदनगर |
| ५ | भागोजी शिवराम गिरमे | उंसाचे मळेकरी, सासवड, जि. पुणे |
| ६ | कृष्णाजी रामजी बोरावके | उंसाचे मळेकरी, बारामती, जि. पुणे |
| ७ | शंकर भाऊराव राऊत | उसांचे मळेकरी, कोपरगांव, जि. अहमदनगर |
| ८ | सोपानराव बापूराव गिरमे | उसांचे मळेकरी, बेलापूर रोड, जि. अहमदनगर |
| ९ | लक्ष्मण पिराजी बोरावके | उसांचे मळेकरी, बेलापूर रोड, जि. अहमदनगर |
| १० | शंकर शिवराम कुदळे | उसांचे मळेकरी, बेलापूर रोड, जि. अहमदनगर |
| ११ | हरिभाऊ बळवंत गिरमे एक्स-ऑफिशिओ | उंसाचे मळेकरी,कोपरगांव, अहमदनगर जिल्हा लोकल बोर्डाच्या स्कूल बोर्डाचे सभासद |

**१९३२ च्या हिंदुस्थानच्या कंपन्यांविषयी ॲक्ट अन्वये दि. १७ नोव्हेंबर १९३२ ला ही कंपनी नोंदविली गेली.**

### बँकर्स

१) दि इम्पीरिअल बँक ऑफ इंडिया, पुणे शहर.
२) दि बॉम्बे प्रोव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, लि; कोपरगांव

### सॉलिसिटर्स

मेसर्स सामंत आणि कंपनी, मुंबई

### ऑडिटर्स

मेसर्स जी. एम. ओक आणि कंपनी, पुणे शहर.

### रजिस्टर्ड ऑफिस

अकलूज, तालुका- माळशिरस, जि. सोलापूर.

# विद्यमान संचालक

मा. श्री. कृष्णकांत शंकरराव कुदळे, चेअरमन

मा. श्री. विलास दामोदरराव इनामके, व्हाईस चेअरमन

मा. श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे, मॅनेजिंग डायरेक्टर

मा. श्री. वसंतराव मल्हारी ताम्हाणे, होलटाईम डायरेक्टर

मा. श्री. विजयराव शंकरराव गिरमे, संचालक

मा. श्री. अरविंद एकनाथराव जाधव, संचालक

मा. श्री. नंदकुमार जगन्नाथराव गिरमे, संचालक

मा. श्री. गणेश ज्ञानदेवराव इनामके, संचालक

मा. श्री. प्रविण अनंतराव पांढरे, संचालक

मा. श्री. सतिश दिगंबर गिरमे, संचालक

मा. श्री. परेश दिगंबर राऊत, संचालक

मा. श्री. अश्विन कृष्णकांत गिरमे, संचालक

# बोर्ड मिटिंग




बोर्ड मिटींग मध्ये डावीकडून सतिश गिरमे, गणेश इनामके, व्हा. चेअरमन विलास इनामके, अरविंद जाधव, मॅनेजिंग डायरेक्टर राजेंद्र गिरमे, चेअरमन कृष्णकांत कुदळे, होलटाईम डायरेक्टर वसंत ताम्हाणे, विजयराव गिरमे, अश्विन गिरमे, परेश राऊत, नंदकुमार गिरमे, प्रविण पांढरे.



मॅनेजिंग डायरेक्टर राजेंद्र गोपाळराव गिरमे यांच्यासोबत कारखान्याचा अधिकारी वर्ग डावीकडून अनिल जाधव, संजय पांढरे, सुरेश जगताप, अनिल दांडगे, मॅनेजिंग डायरेक्टर राजेंद्र गोपाळराव गिरमे, सतिश झगडे, सिध्देश्वर घोंगडे, विठ्ठल आडत, सुरेंद्र बधे.पाठीमागे डावीकडून गणेश सातव, दत्तात्रय नाळे, अनुप इनामके, नवाज शेख, कुलदीप पांढरे, नंदकुमार पाटील, सचिन टिळेकर, मनोज नेवसे, संजय रडे, अमोघसिध्द शेंडगे, विशाल बोरावके.

# स्मृतीगंध

इरिगेशन इन्क्वायरी कमिटीची भेट.



इरिगेशन इन्क्वायरी कमिटीने १९३६ साली दि. सासवड माळी शुगर फॅक्टरीला भेट दिली. त्यावेळी डावीकडून: रा.ब. ना. सो. बोरावके, के. के. अॅशर, र. सो. इनामके, मा. खं. पांढरे, श्री मोरे, ह. ब. गिरमे, श्री विश्वेश्वरय्या (सुटात), श्री वर्तक, श्री मस्करेन्हास, लालचंद हिराचंद, रा. ब. जी. जी. शेंबेकर, श्री तैय्यबजी.



# ध्यासपर्व

सह्याद्रीच्या पर्वतरांगाच्या पायथ्याला हिरव्यागार निसर्गराईत वसलेल्या 'सासवड' गावाला ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि कर्तृत्व, नेतृत्वाचाही मोठा संपन्न वारसा लाभला आहे. कऱ्हेच्या काठावर वसलेल्या सासवडमध्ये संत सोपानकाकांची समाधी आहे. कैवल्यसम्राट ज्ञानोबा माऊलींची पालखी इथे विसावूनच पुढे पंढरीकडे जात असते. मातीशी निष्ठा ठेवून राबणाऱ्या हातांनी इथल्या मातीचे सोने केले आहे. निढळाचा घाम गाळून काळ्या जमीनीत हिरवाईचे स्वप्न फुलविणाऱ्या इथल्या माणसांनी विविध क्षेत्रांत आपला नावलौकिक निर्माण केला आहे. काळ्या कातळाच्या माथ्यावर अभिमानाने आरूढ झालेला पुरंदरचा किल्लाही त्याला साक्षीदार आहे. आपल्या स्वयंसिद्ध लेखणीने नाट्य, चित्र आणि वृत्तपत्रसृष्टीवर कर्तृत्वाची मोहोर उमटविणारे ज्येष्ठ लेखक प्रल्हाद केशव अत्रे हे याच सासवडचे आणि ब्रिटिश राजवटीत शेतकऱ्यांचा सहकारी तत्त्वावरचा पहिला साखर कारखाना काढणारे दूरदृष्टीचे संस्थापकसुद्धा याच मातीतले.

सासवडच्या माळी समाजातील कर्तृत्वसंपन्न मंडळींनी १९३२ साली सोलापूर जिल्ह्यातील माळीनगर येथे साखर कारखाना उभारला. त्यांची धारणा, जिद्द, चिकाटी आणि त्यांचा आत्मविश्वास खूप लक्षणीय होता आणि या बळावरच अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी अनेक आव्हानांचा यशस्वी मुकाबला करीत आपले ध्येय साध्य केले. असाध्य ते साध्य करण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास हा पुढील पिढ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी असाच आहे.

पारतंत्र्याच्या काळातील साधारणत: १८९५ च्या दरम्यानच्या सासवड गावातील एकूण लोकसंख्येत माळी समाजाची संख्या जवळपास निम्मी होती. सुमारे तीन हजार लोकसंख्या असलेले हे माळी समाजातील लोक शेती मातीशी पूर्ण निष्ठा ठेवून रानात हिरवे स्वप्न फुलविण्यात आघाडीवर होते. सिंचनाच्या अपुऱ्या सोयी आणि निसर्गाची प्रतिकूलता असली तरी थांबणे हा त्यांचा स्वभावधर्मच नव्हता. त्यामुळे सतत पाण्याच्या शोधात त्यांनी शेतीसाठी भटकंती केल्याचा इतिहास आहे. बागायती शेती करण्यासाठी जिथे पाण्याची सहज, सुलभ उपलब्धता होईल तेथे जाऊन आपले कर्तृत्व सिद्ध करण्यात त्यांनी धन्यता मानली. बारामती परिसरात काही मंडळींनी जमीनी खंडाने घेऊन ऊस लागवडी केल्या आणि त्या यशस्वी केल्या. पुढे दोन-तीन वर्षांनी १८९७-९८ च्या सुमारास शेटफळ तलावावर ऊस शेतीचा प्रारंभ केला. ही ऊस शेती फायद्याची ठरत होती. मात्र त्यानंतर एक-दोन वर्षे पावसाने पाठ फिरविल्याने दुष्काळ पडला आणि पुन्हा पाण्याच्या आणि शेतीच्या शोधयात्रा सुरू झाल्या. त्यातून कोपरगाव, बेलापूर, बारामती, बावडा, अकलूज आणि माळीनगरपर्यंतचा प्रवास झाला. या साऱ्या प्रवासात त्यांनी जिथे-जिथे पाऊल ठेवले तिथे-तिथे आपल्या कष्टाच्या आणि जिद्दीच्या बळावर चैतन्याचे मळे फुलविले.

अनेक ठिकाणी विखुरलेल्या समाजबांधवांना एकत्र आणून विकासाच्या नव्या पर्वाचा प्रारंभ केला पाहिजे, असे समाजातील या द्रष्ट्या



ऊस पिकातील आंतर मशागतीचे काम

मंडळींना वाटत होते. डोक्यात विचारचक्र सुरूच होते. संघटन केल्याशिवाय सामूहिक विकास साधता येणार नाही हीच त्यांची धारणा होती. पंच पद्धतीचा अवलंब समाजाने केलेला होताच. याच पद्धतीचा व्यापक अर्थाने विस्तार केला पाहिजे, असेही वाटत होते.

या विचारधारेतूनच हणमंतराव गिरमे यांनी पुढाकार घेऊन सासवड येथे एक बैठक बोलाविली. गावातल्या, वस्तीवरल्या माळी समाजबांधवांना निरोप पाठविले गेले. एका वस्तीवर संध्याकाळी बैठक घेण्यासाठी आणि आपला हेतू स्पष्ट करण्यासाठी हणमंतराव गिरमे आणि ही मंडळी जमा झाली होती. रात्री उशिरापर्यंत वाट पाहिली, पण या बैठकीला कोणी आलेच नाही. प्रतिसाद न मिळाल्याने पहिली बैठक निष्फळ ठरली. मात्र ही मंडळी नाउमेद झाली नाहीत. त्यांचा निर्धार पक्का होता. पुढे काही दिवसांनी एका लग्न-समारंभास मोठ्या संख्येने लोक आले होते. समाजबांधवांची असणारी मोठी उपस्थिती हीच संधी आहे हे ओळखून या लग्नसमारंभाच्या वेळीच या मंडळींनी संघटनाची गरज आणि आपली भूमिका सर्वांसमोर ठेवली. सर्वांनीच या संकल्पनेचे स्वागत केले आणि 'सासवड माळी सभा' या नावाची संस्था स्थापन



ऊसाचे उभे पीक.

झाली. माळीनगर येथे पुढे उभा राहिलेला जो साखर कारखाना आहे त्या कारखान्याच्या निर्मितीची बीजे खऱ्या अर्थाने या संघटन संस्थेच्या रूपानेच रुजली होती.

१९०७ साली सासवड माळी सभा उत्तम स्थितीत आली. त्यासाठी गोविंदराव तुकाराम गिरमे, बळवंतराव धर्माजी गिरमे या मंडळींनी खूप परिश्रम घेतले. समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, समाजातील तंटे समन्वयाने सोडविणे, सामाजिक सुधारणा घडवून आणणे, शेतीमध्ये सुधारणा करणे या ध्येयाने सर्वजण प्रेरित झाले होते. कोपरगाव येथेही सासवड माळी सभेची शाखा काढण्यात आली. शेती करण्यासाठी समाजबांधवांना शेती मशागतीची सर्व साधने एकाच जागी व किफायतशीर भावात मिळावीत यासाठी संस्थेने शेती औजारांचे एक दुकान आणि एक कापड दुकान सुरू करून व्यावसायिकतेचा पाया घातला. या ठिकाणी शेतीची सर्व औजारे व नवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळू लागल्याने शेती मालाचा दर्जा सुधारला, उत्पन्न वाढले आणि सर्वांचा उत्साहही वाढला होता.

***

# साखर निर्मितीचे स्वप्न

खंडाने जमिनी घ्यावयाच्या, मेहनतीने ऊस पिकवावयाचा आणि चांगल्या रवाळ गुळाची निर्मिती करावयाची यामध्ये आता जम बसला होता. पण गुळाचे सतत पडणारे दर हा चिंतेचा विषय बनला होता. या पार्श्वभूमीवर हरिभाऊ गिरमे, रावबहाद्दूर नारायणराव बोरावके, मारुतीराव पांढरे, भगवंतराव गिरमे, सोपानराव इनामके आदि शेतकऱ्यांच्या मुलांना नवीन काहीतरी केले पाहिजे असे वाटत होते. मनातील अस्वस्थता वाढत होती. भविष्याचा वेध घेऊन पुढचे पाऊल टाकले पाहिजे हाच विचार मनात घोळत होता. समाजाची व आपली खऱ्या अर्थाने प्रगती करावयाची असेल तर चाकोरीबाहेर पडले पाहिजे, याची जाणीव झाली होती. गुळाच्या व्यवसायात सतत चढ-उतार सुरू होते. त्यामुळे सतत आर्थिक झळ सहन करावी लागत होती. म्हणूनच वर्षानुवर्षे सुरू असलेल्या गूळ निर्मितीच्या प्रक्रियेकडून साखर निर्मितीकडे वळले पाहिजे ही ठाम धारणा मनात रुजली होती. चर्चा होत होत्या, चारचौघांनी एकत्र येऊन साखर कारखाना उभारणे ही गोष्ट वाटत होती तेवढी सोपी नव्हती हे माहीत होते. पण निर्धार पक्का होता. प्रबळ इच्छाशक्ती होती. त्यामुळे आव्हानांचे सर्व डोंगर पार करायची उमेद निर्माण झाली होती. ही कंपनी रजिस्टर करण्यासाठी गिरमे, बोरावके आदि मंडळींनी किर्लोस्कर ब्रदर्स आणि वेलणकर मिलला भेटी दिल्या. आणि रजिस्टर, कारखाना हिशोब या बाबींची माहिती करून घेतली होती. या कामी जाणवणारा

गु-हाळ





गु-हाळामधील गुळ निर्मितीची प्रक्रिया.

त्यांचा उत्साह पाहून तेथील मंडळीही भारावून जात होती. स्वाभाविकच त्यांच्या मूळ साखर कारखान्याच्या संकल्पनेस इथे प्रोत्साहन मिळत गेले. माळी कंपनीचे हे यश म्हणजेच साखर कारखान्याच्या कल्पनेच्या कार्याची सुरुवात ठरली होती.

१९३१ साली हरिभाऊ गिरमे, नानासाहेब पांढरे, गणपतराव रासकर, रावबहादूर नारायणराव बोरावके, भगवंतराव गिरमे, बापूराव बोरावके आदी प्रमुख मंडळींनी १४ दिवसांच्या अभ्यासदौऱ्याची आखणी केली. कानपूरचा गुळापासून साखर तयार करणारा कारखाना त्यांनी पाहिला. बिहारमधील बकसारचा १०० टनी कारखाना पाहिल्यावर उत्तर प्रदेशातील पचुरकी आणि लखनौ परिसरातील कारखान्यांची त्यांनी पाहणी केली. या अभ्यासदौऱ्यात त्यांना साखर धंद्याची व्याप्ती लक्षात आली. भागभांडवल, एकूण खर्च, उसाची गरज आदी बाबींची व्यापकता त्यांनी समजून घेतली. प्रत्येक ठिकाणी आपल्या मनातील शंका विचारून मनाचे समाधान होणारी उत्तरे मिळविली आणि तेथून परत येत असताना कोणत्याही परिस्थितीत साखर कारखाना उभा करायचाच हा निश्चय पक्का केला. कोपरगाव येथे जेव्हा ही मंडळी आली तेव्हा त्यांचा आत्मविश्वास खूप वाढला होता. आपल्यातील

ऊर्जेची जाणीव झाली होती. विचारांची आणि दृष्टीची व्यापकता वाढली होती आणि त्यातूनच कारखाना उभारणीची कल्पना मूळ धरू लागली होती.

तसा हा काळ पारतंत्र्याचा होता. साखर कारखाना उभारणीसाठी आजच्यासारखी अनुकूलता नव्हती. सरकारी अर्थसाह्य मिळणार नव्हते आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचीही वानवा होती. भांडवल अपुरे होते, कोणी फारसे शिकलेले नव्हते, पैसा, कायदा, घटना, नियम, जमिनी, मशिनरी आदी बाबींची पूर्तता करण्याचे मोठे आव्हान समोर होते. मात्र निश्चय पक्का असल्याने वाटचाल सुरूच होती. १९३१ साली आषाढ वद्य चतुर्दशीला संत सांवता महाराजांच्या पुण्यतिथीचे आयोजन केलेले होते. कोपरगावजवळच्या बेटावरील या कार्यक्रमाला ४०० ते ५०० मंडळी एकत्र आली होती. या वेळी जमलेल्या मंडळींना साखर कारखाना उभारणीच्या संकल्पाची माहिती दिली आणि या कामी सर्व समाजबांधवांना सहकार्याची हाक दिली. त्यास सर्वांनी प्रतिसाद दिला आणि संत सावता महाराजांच्या प्रतिमेच्या साक्षीने या योजनेचा नारळ फोडण्यात आला. १७ जणांचे एक नियामक मंडळ तयार करून कामाची सुरुवात झाली. ९ नोव्हेंबर १९३२ ला दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि; या कंपनीचे मेमोरँडम व आर्टिकल्स ऑफ असोसिएशनच्या संबंधाने उद्देश, घटना व नियमावली तयार करण्यात आली. कोपरगावच्या सभेत १७ जणांनी ४०० चा एक याप्रमाणे २५ पासून १०० पर्यंत शेअर्स घेण्याचे ठरविले. त्या वेळी कोपरगाव-बेलापूर भागात उसाला एक शेअर हे धोरण ठरले व शेअरची किंमत रु. ४०० निश्चित केली होती. २३ नोव्हेंबर १९३२ च्या कोपरगावच्या सभेत ११ जणांची कंपनीचे डायरेक्टर म्हणून निवड करण्यात आली. या पहिल्या डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन गणपत दत्तूजी रासकर होते. तर मॅनेजिंग डायरेक्टरपदी हरिभाऊ गिरमे यांची नेमणूक झाली.

कंपनी ॲक्टनुसार १७ नोव्हेंबर १९३२ ला या कंपनीची नोंदणी झाली. सहकारी शेती व कसेल त्याची जमीन या शेती विषयातील सरकारी कायद्याची अंमलबजावणी स्वातंत्र्योत्तर काळात होत आली आहे. मात्र पारतंत्र्याच्या काळात साखर कारखाना उभारताना सहकार तत्त्व आचरणात आणण्याचा विचार या सर्व मंडळींचा होता. त्याप्रमाणे आपल्या घटनेत या मंडळींनी तसे कलम अंतर्भूत केले होते. पण कंपनी रजिस्टर करताना त्या वेळच्या कायद्यात ही तरतूद नसल्याने ते कलम रद्द करावे लागले. त्यामुळे नाइलाजाने सरकारच्या म्हणण्याला होकार द्यावा लागला. कोणत्याही परिस्थितीत आपल्या उद्दिष्टापासून मन विचलित होऊ द्यावयाचे नाही, असा निर्धार या मंडळींनी केला होता आणि खंबीर व कठोर धोरण स्वीकारले होते. सर्वसाधारण आखणी झाल्यावर ही मंडळी ५-६ दिवसांनी एकत्र जमू लागली. कोपरगावात माळी सभागृहात त्यांच्या बैठका होऊ लागल्या आणि त्यातूनच प्रत्यक्ष कारखाना उभारणीच्या कामाची रूपरेषा निश्चित झाली.

***

# जमिनींची उपलब्धता



बैलांच्या साह्याने केली जाणारी मशागत.

साखर कारखाना उभारणीच्या विचारचक्राने गती घेतली होती, प्रत्यक्ष कामाला सुरुवात करताना प्रथम जागेची निश्चिती करणे गरजेचे होते. या गरजेतूनच जागेचा शोध सुरू झाला. सासवड, बारामती, बेलापूर, कोपरगाव या प्रवासात माळी समाजबांधव कोपरगावात चांगले स्थिरावले होते. त्यामुळे या भागातच कारखाना उभारावा अशी सर्वांचीच इच्छा होती. राहता, पुणतांबा, चितळी या भागात त्यांनी जागेचा शोध घेतला मात्र गरजेएवढ्या जमीनीची उपलब्धता होण्यात अनेक अडचणी येत होत्या. याच काळात नीरा कालव्याचे पाणी सोलापूर जिल्ह्यातील अकलूज परिसरात पोहचलेले होते. पाण्याची उपलब्धता होती परंतु या परिसरातील लोक या पाण्याचा हवा तेवढा वापर करून घेत नव्हते. पाण्याची उपलब्धता दिसत असल्याने या मंडळींनी अकलूज गाठले. १९०० सालच्या दरम्यान भगवंतराव गिरमे व इनामके हे भोडणी येथे आले होते. या परिसरात त्यांनी जमिनी घेतल्या होत्या. उसाची लागवड करून गूळ तयार करीत तयार झालेला गूळ अकलूज मार्केटमध्ये विक्रीसाठी आणत. त्यामुळे त्यांच्या अकलूज येथील व्यापाऱ्यांशी चांगल्या ओळखी



पाट पाण्याची व्यवस्था.

होत्या. त्यामध्ये अकलूजचे नगरशेठ व प्रसिद्ध व्यापारी रायचंद भाईचंद व्होरा यांच्याशी चांगले संबंध होते. त्याचा कंपनीला चांगला फायदा झाला. भगवंतराव गिरमे, इनामके व रायचंद भाईचंद व्होरा यांची अकलूज भागातील जमीनी खंडाने घेण्यासाठी चांगली मदत झाली. परिसरातील जमीनीची पाहणी करण्यासाठी हरिभाऊ गिरमे, शंकरराव राऊत, भगवंतराव गिरमे, सोपानराव गिरमे, नानासाहेब पांढरे, गणपतराव रासकर, बापूराव बोरावके आदी मंडळी आली. या परिसरातील काही मंडळींना भेटून साखर कारखाना उभारणीचा मनोदय सांगितला. तेव्हा त्यांच्यावर विश्वास ठेवायला कोणी तयार नव्हते. साखर कारखाना उभारणे ही सहजसाध्य गोष्ट नव्हती. त्यामुळे त्यांच्या या संकल्पनेला कोणी फारसा पाठिंबा दिला नाही. पराकोटीची जिद्द आणि त्यांचा निश्चय खूप दृढ होता. त्यामुळे ते यत्किंचितही निराश झाले नाहीत.

अकलूजमध्ये राहून त्यांनी या परिसरात जमीनींचा शोध घ्यायला सुरुवात केली. संध्याकाळी बसून उद्याच्या दिवसाचे नियोजन करायचे आणि दुसऱ्या दिवशी सकाळपासून संध्याकाळपर्यंत लोकांना भेटत राहायचे हे काम

सुरू झाले होते. खंडाने जमीनी मिळविण्यासाठी खूप कष्ट करावे लागत होते. शेतकऱ्यांना आपला हेतू पटवून देताना खूप त्रासही होत होता. एके दिवशी तांबवे येथील चारी नं. ३५ च्या परिसरात फिरताना एक शुभशकून घडला. भर दुपारी सूर्य ढगाआड गेला. आकाशात काळे-निळे ढग जमा झाले. गार वारा वाहू लागला आणि ढगांना पान्हा फुटला. पाऊस सुरू झाला. साखर कारखानदारीचे स्वप्न अंत:करणात घेऊन ऊस पिकवण्यासाठी, जमीनी मिळविण्यासाठी फिरणाऱ्या या माळी बांधवांसाठी हा शुभसंकेत होता. त्यांच्या निस्सीम ध्येयासक्तीला ईश्वराचा आशीर्वाद असल्याची ती साक्ष होती. निसर्गाच्या या अनुभूतीने सर्वांचाच उत्साह वाढला आणि याच जागेवर साखर कारखाना उभारायचा हे निश्चित झाले.

गणपतराव रासकर, सोपानराव गिरमे, भाऊसाहेब राऊत या तिघांची एक समिती नेमण्यात आली. शेतमालकांना भेटून जमीनी खरेदी किंवा खंडाने घेण्यासाठी भाडेपट्टे करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. अकलूज येथे एक जागा भाड्याने घेऊन त्यांनी तेथेच आपले कार्यालय सुरू केले. एक घोंगडी आणि लिखाणाचे सामान असे या कार्यालयाचे स्वरूप होते, दररोज वेगवेगळ्या लोकांना भेटायचे, त्यांना आपला हेतू सांगायचा आणि खंडाने जमीन मिळविण्यासाठी प्रयत्न करायचे हे काम या मंडळींनी न थकता, न दमता केले.

अकलूज येथे आल्यावर या मंडळींच्या पहिल्या मुक्कामाची सोय करणाऱ्या रायचंद भाईचंद यांनी आपली ४० एकर जमीन साखर कारखान्यास दिली. त्याचा भाडेपट्टा करण्यात आला. जे लोक भाडेपट्ट्याने जमीनी द्यायला तयार होत असत त्यांना घेऊन माळशिरसला जायचे आणि भाडेपट्टा रजिस्टर करायचा हे काम त्या काळी खूप जिकिरीचे होते. या सगळ्या अग्निदिव्यातून तीन महिन्यांत सुमारे ४००-५०० एकर जमीन भाडेपट्ट्याने मिळवण्यात त्यांना यश आले. जमीनी जशा मिळतील तशी मेहनतीची कामे हाती घेतली होती. दूरवर पसरलेल्या ओसाड रानात काटेरी झाडे वाढलेली होती. खाच, खळगे आणि ओढ्या-नाल्यांच्या घळी सर्वत्र होत्या. मोठमोठाले दगड अस्ताव्यस्त पडलेले होते हे सगळे बाजूला करून लागवडी योग्य जमीनी तयार करण्यासाठी या मंडळींनी अक्षरश: जिवाचे रान केले होते.


नांगरून तयार केलेल्या जमीनीत ऊस लागवड करताना चांगला साखर उतारा असणाऱ्या उसाच्या बेण्याची गरज होती. असे बेणे या परिसरात उपलब्ध नव्हते. कोपरगाव, बेलापूर या परिसरात ई.के. जातीचा ऊस उपलब्ध होता. साखर उताऱ्याच्या दृष्टीने त्या उसाचे बेणे लागवडीसाठी वापरणे फायद्याचे ठरणारे होते. मात्र कोपरगाव, बेलापूर येथून या परिसरात बेणे आणायचे कसे हा प्रश्न होता. रेल्वेने भिगवण, कुर्डुवाडी येथे ऊस बेणे आणायचे आणि तेथून बैलगाडीने आणायचे असा पर्याय त्यांनी निवडला. त्यानुसार भिगवण, कुर्डुवाडीला रेल्वेने ऊस बेणे आणले. रेल्वे स्टेशनवर आणलेले बेणे सुकू नये म्हणून तेथे सतत पाणी मारून ऊस बेणे ताजे ठेवण्याचा प्रयत्न केला.

***

# पहिला गळीत हंगाम



अकलूज भागात जमिनी मिळवण्यासाठी ज्या वेळी प्रयत्न सुरू झाले होते त्याच वेळी कोपरगाव येथेही साखर कारखान्याचे एक छोटेखानी कार्यालय सुरू करण्यात आले होते. हरिभाऊ गिरमे, नारायणराव बोरावके, नानासाहेब पांढरे आदी मंडळी कारखाना उभारणीसाठी आर्थिक जुळवाजुळव करण्यात व्यग्र होती. प्रत्यक्षात कारखाना उभारणीसाठी खूप मोठ्या रकमेची गरज होती. शेअरद्वारे पैसे गोळा करायचा प्रयत्न सुरू होता. पण त्यातही अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. अखेरीस काही मंडळींनी कोपरगाव भागातला आपला बागायतीचा भाग विकला. गुरे-ढोरे, घोडा-गाडी आणि घरातील असतील ते सारे दागिने विकून जेवढी रक्कम उभारता येईल  तेवढी रक्कम उभारण्याचा प्रयत्न केला. अनंत प्रयत्न करूनही कारखान्याच्या बँकेच्या खात्यावर ५८ हजार ४६३ रुपये १३ आणे जमा झाले होते आणि कारखान्याच्या मशिनरीची ऑर्डर देण्यासाठी चार लाख रुपयांची गरज होती. जवळ पुरेशी रक्कम जमा झालेली नव्हती. मात्र मशिनरीची ऑर्डर द्यावीच लागणार होती. खूप वाटाघाटी करून इंग्लंडच्या फॉसेट प्रेस्टन कंपनीला १९३३ मध्ये ऑर्डर देण्यात आली. व्यवहार ठरल्यावर त्या कंपनीने बँक गॅरंटी मागितली तेव्हा कारखान्याच्या बँक खात्यात सुमारे ५५ हजार रुपये होते. शेअरच्या रूपाने १ लाख ६४ हजार ८०० रुपये आले होते. परंतु प्राथमिक खर्चात बरीच गुंतवणूक झाली. शेती आणि कारखाना अजून सुरू नसल्याने कसलीही आवक नव्हती. या दरम्यान मशिनरीचे कमिशन एजंट मगनलाल नरोत्तमदास मार्फतीया यांच्याशी सल्लामसलत करून मार्ग काढण्यात यश आले. इंग्लंडमधील लिव्हरपूलच्या या कंपनीकडे २७ हजार ५०० पौंड एवढ्या रकमेच्या मशिनरीकरिता ९१ हजार ५०७ रुपये १३ आणे म्हणजेच एक चर्तुथांश रक्कम मशिनरीच्या ऑर्डर सोबत ॲडव्हान्स म्हणून पाठविण्यात आली. ऑक्टोबर १९३३ ला मशिनरी कारखाना स्थळावर येण्यास सुरुवात झाली. तात्पुरती अडचण दूर झाली होती. पण त्याकरता फॅक्टरीची मशिनरीसह संपूर्ण मालमत्ता मे. फॉसेट प्रेस्टनकडे गहाण टाकावी लागली. गहाणखताचा व्यवहार पूर्ण झाल्यावरच मशिनरीचा सौदा पूर्ण झाला. ही जबाबदारी पार पाडताना १९३४ च्या जानेवारीमध्ये झालेल्या सर्वसाधारण सभेत त्यास मंजुरी देण्यात आली होती. २ फेब्रुवारी १९३४ ला प्रेस्टन कंपनीशी जो गहाणखताचा करार झाला, त्यावर सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या वतीने त्या वेळचे संचालक श्री. शंकर शिवराम कुदळे व श्री. सोपानराव बापूराव गिरमे यांनी सह्या केल्या होत्या.



१९३२ साली उभारण्यात आलेल्या साखर कारखान्याचे संग्रहीत छायाचित्र.

ज्या वेळी बेलापूर, कोपरगाव या भागातून उसाचे बेणे भिगवण, कुर्डूवाडीच्या रेल्वे स्टेशनवर यायला सुरुवात झाली होती, त्या वेळी रेल्वेने कुर्डुवाडी, पंढरपूर या रेल्वे स्टेशनवर मशिनरी यायला सुरुवात झाली होती. कुर्डूवाडी रेल्वे स्टेशनवरून कारखाना साईटवर मशिनरी आणणे म्हणजे मोठे दिव्य काम होते. त्या काळी रस्ते नव्हते. नीरा, भीमा नद्यांवर पूल नव्हते. दळणवळणाची साधने नव्हती. यंत्रणा, वाहन व्यवस्था आणि मनुष्यबळाची वानवा होती. मात्र या साऱ्या प्रतिकूलतेवर मात करीत ही मशिनरी आणली गेली. त्याच वेळी दगडावर दगड रचून कारखान्याच्या भिंती उभ्या राहू लागल्या होत्या. एकेकाळचा निर्जन परिसर माणसांनी फुलून गेला होता. जाणीवपूर्वक लावलेल्या आणि नियोजन करून वाढविलेल्या झाडांवर पाखरांचे थवे विसावले होते. माणसांची वर्दळ वाढली होती. कारखाना आकार घेत होता.

त्याच वेळी संस्थापकांच्या स्वप्नांनाही आकार आला होता. नवचैतन्याचे सूर सर्वत्र ऐकू येत होते. उसाच्या शेतावरून येणारा गार वारा मनाची प्रसन्नता वाढवीत होता. प्रत्येक दिवशी येणाऱ्या अडचणीसुद्धा कमी नव्हत्या पण आता स्वप्नांना आकार येत आहे हे दिसू लागल्याने अडचणींच्या आव्हानांचे ओझे वाटत नव्हते. रात्रीचा दिवस करून केलेल्या सगळ्या कामाचा अखेर शीण गेला. कारखाना उभा राहिला.

शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी उभारलेला पहिला कारखाना नवनिर्मितीचे स्वप्न उराशी बाळगून सासवड, बारामती, बेलापूर, कोपरगाव




ऊसाने भरलेल्या बैलगाड्या

असा प्रवास केलेल्या जिद्दीच्या माळी बांधवांनी उभारलेला आपल्या स्वप्नातील हा राजमहल, सत्य आणि शिवा इतकेच सुंदर यशोमंदिर, त्यांच्या कर्तृत्वाची गाथा स्पष्ट करणारी एक चैतन्यशाली स्वप्नशील, अविरत, अविश्रांत घेतलेल्या कष्टातून उभारलेले हे यशोमंदिर दि सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या संस्थापकांच्या दूरदृष्टीची आणि कर्तृत्वसंपन्नतेची साक्ष आहे.

सन १९३४-३५ या गळीत हंगाम वर्षात या कारखान्याने पहिला हंगाम घेतला. विजयादशमीचा तो दिवस होता. सासवडच्या माळी बांधवांनी उभारलेला हा कारखाना या परिसरासाठी सुद्धा वरदान ठरला होता. विजयादशमीच्या निमित्ताने सोने संबोधून आपट्यांची पाने देण्याची प्रथा आहे. सोने लुटायच्या या शुभमुहूर्तावर शेतकऱ्यांच्या जीवनात सोन्याचे दिवस आणणाऱ्या या उद्योगाचा प्रारंभ होत होता. या दिवशी गव्हाणीत मोळी टाकून कारखाना सुरू करताना या संस्थापकांना झालेला आनंद हा अवर्णनीयच होता. जे स्वप्न पाहिले ते सत्यात उतरले तेव्हा सोसलेल्या सर्व यातना आणि कष्टाची फुले झाल्याची सार्थ भावना त्यांच्या अंत:करणात उमटलीच असणार. अपार मेहनत घेऊन त्यांनी उभारलेल्या या कारखान्याने राज्याच्या कारखानदारीला एक आशेचा किरण दाखविला. सहकाराला दिशा दिली आणि तेथून पुढे खऱ्या अर्थाने साखर कारखानदारी वाढत गेली ही वस्तुस्थिती आहे. पहिल्याच हंगामात कारखान्याने उत्पादित केलेल्या साखरेला पुणे येथील प्रदर्शनात सुवर्ण पदक बहाल करण्यात आले.

***

# रौप्यमहोत्सवी वर्ष-१९५९



रौप्य महोत्सव समारंभाचे प्रमुख पाहुणे आणि महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांचे स्वागत करताना कारखान्याचे त्या वेळचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री हरीभाऊ गिरमे.

१९३४-३५ ला कारखाना सुरू झाला त्या वेळी या भागात उसाचे एकरी उत्पादन ३४ ते ३५ टनांपर्यंत होते. माळी बांधवांनी आपले शेतीतील ज्ञान आणि कष्ट करायची तयारी या बळावर एकरी उत्पादनाचा आकडा ७० ते ८० टनांपर्यंत नेला. थांबणे हा मंडळींचा स्वभावच नव्हता आणि कसल्याही प्रतिकूलतेवर मात करायची ऊर्मी त्यांच्यात होतीच. त्यामुळेच तर साखर कारखाना उभारणीचे स्वप्न ते सत्यात आणू शकले होते. आजच्यासारखी कसलीही भौतिक अथवा शासकीय स्तरावरची मदतीची उपलब्धता आणि सोयी, सवलती नसताना त्यांनी दाखवलेले धाडस आणि दिलेली दिशा नक्कीच प्रेरणादायी आहे. कोणतेही अवघड काम नक्की पूर्ण करता येते. परंतु त्यासाठी कमालीची जिद्द, चिकाटी आणि प्रयत्नातील सातत्य हवे असते. कोणत्याही संकटाला निकराने सामोरे जाण्याचे धाडस आणि स्वत:वरील आत्मविश्वास अढळ असावा लागतो. तरच स्वप्नांची सिद्धता होत असते. या मंडळींच्या कार्याकडे पाहिल्यावर याची मनोमन खात्री पटते. पारतंत्र्याच्या काळात आपल्या समाजबांधवांच्या आणि पर्यायाने शेतकरी वर्गाच्या हिताचा विचार करून त्यानी दाखवलेल्या धाडसाला नक्कीच सलाम केला पाहिजे. आजच्या पिढीला नव्या उमेदीचे पंख लाभावेत यासाठी त्यांनी दिलेले योगदान



रौप्य महोत्सव समारंभाचे प्रमुख पाहुणे आणि महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यासोबत १९५९ सालचे संचालक मंडळ-बसलेले डावीकडून रघुनाथराव इनामके, भगवंतराव गिरमे, हरीभाऊ गिरमे, श्री चव्हाण, मारूतीराव पांढरे, रावबहाद्दूर नारायणराव बोरावके, शंकरराव राऊत. उभे असलेले - शंकरराव इनामके, कृष्णकांत गिरमे, भगवंतराव जाधव, पंढरीनाथ गिरमे, जगन्नाथ रासकर.

अतुलनीय असेच आहे.

१९३४-३५ ला पहिला हंगाम पार पाडल्यावर दुसऱ्या हंगामात कारखान्याने गाळप आणि उत्पादनात वेग घेतला होता. ३१ जुलै १९३४ ला सुमारे १९५१ एकर जमीन कारखान्याने ऊस लागवडीसाठी ३० वर्षांच्या कराराने खंडाने घेतली होती. त्या पाठोपाठ अजून एक हजार एकर जमीन मिळाली. कारखान्याची गती, प्रगती आणि माळी बांधवांच्या कर्तृत्वावरील विश्वास वाढत होता. त्यामुळे दोन वर्षांतच कंपनीचे क्षेत्र तीन हजार एकरांवर गेले. सुमारे ११०० एकरांवर कंपनीने उसाचे मळे फुलविलेले होते. साखर कारखान्यात उत्पादित झालेल्या साखरेचे 'पंढरपुरी पवित्र साखर' असे नामकरण केले होते. साखर कारखाना सुरू झाल्यावर कामगार वसाहतीनेही आकार घेतला होता. या कारखान्याने या भागाचा कायापालट झाला होता. आत्मविश्वासाच्या बळावर सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलेसुद्धा उद्योजक होऊ शकतात हा विश्वास बळावला होता. मात्र कोणताही उद्योग मार्गक्रमण करीत असताना त्याला अनेक अडचणी आणि आव्हानांचे डोंगर पार करावे लागतातच. उन्हाळे, पावसाळे झेलावे लागतातच. दि सासवड माळी शुगर फॅक्टरी तरी त्याला कसा अपवाद असणार. कंपनीच्या प्रगतीमध्ये अपुऱ्या भांडवलाची अडचण येत होती. त्यासाठी घ्याव्या लागणाऱ्या

रकमा आणि त्यांचे भरमसाट व्याज याची मोठी चिंता होती. १९३५ सालात पाच लाख ब्याण्णव हजार तीनशे बावन रुपये इतके कर्ज कंपनीकडे होते. या सालात सात हजार सातशे एकवीस रुपये निव्वळ नफा कंपनीला झाला होता. कारण कर्ज आणि व्याजाचा हप्ता व साखरेवरील कमिशन या रकमा फायद्यातून गेल्या होत्या, अपुरे भांडवल असल्याने स्वत: साखर विक्री करून कमिशन वाचविणे कंपनीला शक्य होत नव्हते. त्या वर्षी जवळपास ३५ हजार रुपये व्याज आणि ३१ हजार रुपये कमिशनपोटी गेले होते. तर सरकारला ६५ हजार रुपये एक्साईज ड्यूटीपोटी गेले होते. आर्थिक ओढाताण सुरूच होती.

१ एप्रिल १९३४ ला मुंबईत जमनादास मेहताकडे कंपनीच्या डायरेक्टर मंडळींची बैठक पार पडली होती. जमनादास यांनी त्यापूर्वीपासूनच कंपनीला कर्जरूपाने पैशाची मदत केली होती. त्यामुळे त्यांना ४०० रुपये किमतीचे २५ शेअर्स देऊन शेअर होल्डर करण्याचे या बैठकीत ठरले, पण कायद्यात तशी तरतूद नसल्याने ते शक्य झाले नाही. त्याच वेळी एशियन इन्शुअरन्स कंपनीकडून डिबेंचर्सच्या रूपात कारखान्याला दोन लाख रुपयांचे कर्ज मिळाले होते. त्यातील तरतुदीनुसार डिबेंचर होल्डरचा प्रतिनिधी डायरेक्टर म्हणून घेणे बंधनकारक होते. या तरतुदीनुसार जमनादास मेहतांचा कंपनीत डायरेक्टर म्हणून समावेश झाला. डिबेंचर्सचे कर्ज घेऊनच कारखान्याला मशिनरी पुरविणाऱ्या फॉसेट प्रेस्टनचे कर्ज हप्ते भागविलेले होते. या साऱ्या प्रकरामुळे जमनादास यांचा डायरेक्टर बोर्डात समावेश झाला होता व पुढे बोर्डाच्या चेअरमनपदी निवड होऊन कारखान्याची सर्व सत्ता त्यांच्या हाती गेली होती. १९३६ ला जमनादास मेहता व कंपनी हे साखर कारखान्याचे मॅनेजिंग एजंट्स झाले. ९ जून १९३६ ला बोर्डाने त्यास मान्यता दिली. कंपनीचे रजिस्टर्ड ऑफिस जमनादास यांच्या मुंबईच्या पत्त्यावर हलविण्यात आले. या परिस्थितीतून कंपनीला बाहेर काढण्यासाठी आणि मूळ उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी बोर्डातील मंडळींनी प्रयत्नांची मोठी पराकाष्ठा केली. भगवंतराव गिरमे यांनी स्वत:जवळील ५० हजार रुपये कंपनीला देऊन मोठा हातभार लावला. जगद्‌विख्यात स्थापत्य विशारद श्री. मोक्षगुंडम्‌ विश्वेश्वरय्या यांच्याशी भगवंतराव गिरमे यांचे घनिष्ठ मैत्रीचे संबंध होते. कंपनीच्या मूळ संचालकांनी व डायरेक्टर्सनी कंपनीचा खर्च खूप कमी केला. याच वेळी सर्व बागायतदारांनी प्रती टनाला चार रुपये दोन आणे याप्रमाणे कंपनीला रिबेट दिले. स्वत: आर्थिक झळ सोसून कंपनीचा फायदा वाढविला. बागायतदारांनी कंपनीला स्वखुशीने दिलेला आधाराचा हात लाखमोलाचा होता.

कंपनीस चांगला नफा रहावा यासाठी त्या वेळचे साखर विक्रीचे सोल एजंट भगवंतराव गिरमे यांचे वडील गेणूजी गिरमे यांनी त्यांना कराराप्रमाणे मिळालेला दहा वर्षांचा साखर विक्रीवरील कमिशनचा अधिकार सोडून दिला. अशा रीतीने नफ्याचा वाढता आकडा दिसू लागल्यावर भांडवलदारांकडून कंपनीला कर्ज मिळण्यात अनुकूलता निर्माण झाली. त्यानंतर लेव्ही लिमिटेडचेही संकट पर्व आले. मात्र या

साऱ्यावर मात करीत कारखाना सुरूच होता. लेव्ही लिमिटेडच्या कचाट्यातून कसे सुटायचे हा मोठा गंभीर प्रश्न होता. अनेक हालअपेष्टा, अपमान सहन करावा लागत होता. मात्र संस्थापक मंडळींनी आपले उद्दिष्ट नजरेआड होऊ दिले नाही. या सर्वांची सद्‌भावना, चिकाटी, प्रयत्नशील व विनयशील वृत्ती आणि सचोटी यामुळे ते प्रत्येक संकटावर मात करून बाहेर पडले. ७ जून १९४० ला जमनादास यांनी राजीनामा दिला. त्या वेळी व्हाईस चेअरमन असणाऱ्या हरिभाऊ गिरमे यांच्याकडे तात्पुरते अधिकार देण्यात आले. १९४० ला कारखान्याच्या मूळ संस्थापकांकडे सर्व सूत्रे आली. तरी पैशांची अडचण होतीच, त्यामुळे मेसर्स मोरेश्वर सूद आणि कंपनीशी वाटाघाटी केल्या. मॅनेजिंग एजन्सी देण्याच्या अटीवर मोरेश्वर सूद आणि कंपनी कर्ज द्यायला तयार होती. त्याबाबतचा ठराव करण्यासाठी रावबहाद्दर नारायणराव सोपानराव बोरावके, नानासाहेब पांढरे, हरिभाऊ गिरमे मुंबईस गेले होते. मात्र तिथे गेल्यावर त्यांची निराशा झाली. करारावर सह्या न करताच हे सर्वजण परत आले. येथे येऊन आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा केली.

झाले तेवढे पुष्कळ झाले. आपल्या कारखान्यात भांडवलदार शिरू नयेत असे वाटत असेल तर आता आपणच पुढे आले पाहिजे असा विचार बोलून दाखविला. आपण स्वत:च काही रक्कम गोळा करू, काही ठेवी घेऊया आणि मार्ग काढूया असा विचार पुढे आला. त्याला सर्वांनीच मान्यता दिली आणि लगेचच बैठकीत ठरल्यानुसार प्रत्येकाने वैयक्तिक पातळीवर पैसा उभा करून कंपनीची गरज भागविली. कंपनीच्या सोयीनुसार.

फॅक्टरी, इरिगेशन, ऑफिस, स्थानिक प्रगती आणि स्टोअर्स जनरल हे पाच विभाग पाडण्यात आले आणि कारभार जोमाने सुरू झाला. दरम्यान कंपनीची प्रगती सहन न झाल्याने काही मंडळींनी डायरेक्टर बोर्डाच्या विरोधात सरकारकडे तक्रारी केल्या होत्या. फौजदारी स्वरूपाच्या न केलेल्या या गुन्हांच्या चौकशीला सामोरे जावे लागले. त्यासाठी विनाकारण खूप मानसिक त्रास सहन करावा लागला. मात्र काही घडलेच नव्हते त्यामुळे या अकरा फौजदारी गुन्ह्यांतून काहीच सिद्ध झाले नाही. या घटनेनंतर भागीदारांचा बोर्डावरचा विश्वास अधिक दृढ झाला. १९३८-३९ साली अशा सर्व संकटामुळे कंपनी हातून गेली आहे अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र प्रबळ इच्छाशक्ती आणि निस्सीम प्रयत्न यामुळे या संस्थापकांनी कंपनी कोणाच्याही हाती जाऊ दिली नाही, त्याबद्दल त्यांचे खूप मोठे ऋण आज समाजावर आहे.

न थकता, न दमता अविश्रांत कार्यरत राहून या मंडळींनी कंपनीच्या प्रगतीची पताका अभिमानाने फडकावीत ठेवली. १९५९ हे वर्ष कंपनीचे रौप्यमहोत्सवी वर्ष होते. २५ वर्षांचा यशस्वी टप्पा पूर्ण केल्यानंतर यानिमित्ताने मोठा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. श्री. हरिभाऊ बळवंतराव गिरमे हे मॅनेजिंग डायरेक्टर व श्री. मारुती खंडूजी पांढरे हे चेअरमन होते. त्यांनी व त्यांच्या सहकारी संचालकांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी त्या वेळच्या मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित

होते. पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांच्या हद्दीवर नीरा नदीवरील पुलाजवळ यशवंतरावांचे जंगी स्वागत करण्यात आले. सराटी ते माळीनगर या पाच किलोमीटरच्या रस्त्यावर जागोजागी मुख्यमंत्र्यांच्या स्वागतासाठी कमानी उभारल्या होत्या. सराटी येथे यशवंतरावांचे स्वागत झाल्यावर त्यांच्या गाड्यांचा ताफा माळीनगरात दाखल झाला. त्या वेळी त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. यशवंतरावांची सजविलेल्या रथातून मिरवणूक काढण्यात आली. त्यांच्या सोबत कारखान्याच्या बोर्डातील मंडळीही रथात होती. सजवलेले आणि पाठीवर झुली घातलेले ५१ बैल हा रथ ओढीत होते. ढोल, ताशे आणि लेझिमची पथके मिरवणुकीत सामील झाली होती. यशवंतरावांनी शाळेची पाहणी केली. महिला मंडळाच्या कार्याची माहिती घेतली. गुणी कामगारांना पारितोषिके दिली. गुणवंतांचा सन्मान केला आणि या कारखान्याच्या उभारणी आणि प्रगती विषयीचा अभिमान आपल्या भाषणांतून व्यक्त केला. महाराष्ट्रातील पहिला मानाचा सहकारी साखर कारखाना असा या कारखान्याचा त्यांनी गौरवाने उल्लेख केला आणि सामान्य कुटुंबातील पण असामान्य कर्तृत्वाच्या माळी समाजातील व्यक्तींनी केलेल्या या कार्याला मानाचा मुजरा करायला हवा ही भावना त्यांनी बोलून दाखविली. त्या वेळी सर्वांनाच आपल्या कष्टाचे चीज झाल्याचा आनंद झाला होता आणि परिसरातील नागरिक, बागायतदार, कामगार यांचा ऊरही अभिमानाने भरून आला होता.

***

## रौप्य महोत्सव १९५९
## संचालक मंडळ

मा.श्री. मारूतीराव खंडूजी पांढरे, चेअरमन.
मा.श्री. हरीभाऊ बळवंतराव गिरमे, मॅनेजिंग डायरेक्टर.
मा.श्री. भगवंतराव गेणूजी गिरमे, संचालक.
मा.श्री. रघुनाथराव सोपानराव इनामके, संचालक.
मा.श्री. रा.ब. नारायणराव सोपानराव बोरावके, संचालक.
मा.श्री. शंकरराव भाऊराव राऊत, संचालक.
मा.श्री. शंकरराव बाळकूजी इनामके, संचालक.
मा.श्री. कृष्णाजी लक्ष्मणराव गिरमे, संचालक.
मा.श्री. भगवंतराव मारूतीराव जाधव, संचालक.
मा.श्री. पंढरीनाथ हणमंतराव गिरमे, संचालक.
मा.श्री. जगन्नाथराव गणपतराव रासकर, संचालक.

# सहकारीकरण

१९५९ साली कारखान्याचा वैभवशाली रौप्यमहोत्सव सोहळा पार पडला. गेल्या पंचवीस वर्षांत कंपनीची चांगली भरभराट झाली होती. मूळची २५० टन गाळप क्षमता असणाऱ्या कारखान्याची गाळप क्षमता १९३९-४० च्या हंगामात ३७५ टन करण्यात आली. कारण या काळात नीरा कालव्याच्या शाखा क्रमांक १ च्या चारी क्रमांक ९ लगतची जमीन मिळवून फॅक्टरीच्या संचालकांनी उत्पादन क्षेत्र वाढविले होते. पुढे ५०० टन आणि १९५० साली ७५० टन आणि नंतर १००० टनांवर कंपनीची गाळप क्षमता वाढवत नेली. या काळात अनेक अंगांनी विस्तार व विकासाचे काम संचालक मंडळाने केले. मात्र १९६० नंतर नैसर्गिक अवकृपेमुळे पुन्हा अडचणी वाढल्या. उसाची उपलब्धता घटली. त्यामुळे कंपनीसमोर संकट उभे राहिले. जवळपास दहा वर्षे हा संघर्षाचा काळ होता. या प्रतिकूलतेमध्ये अधिकचा ऊस आणि चांगला साखर उतारा मिळण्याचे निकराचे प्रयत्न झाले. मात्र परिस्थितीने वेगळेच रूप धारण केल्याने १९७१ साली कारखान्याचे सहकारीकरण करावे लागले. दि सासवड माळी सहकारी साखर कारखाना या नावाने कारखान्याची वाटचाल सुरू झाली. सुमारे ३०० सभासद आणि कार्यक्षेत्रही वाढले. १ ऑगस्ट, १९७१ ला सुरू झालेला सहकारी कारभार १९७९-८० च्या हंगामापर्यंत सुरू होता. कारखान्याचे सहकारीकरण करताना कारखान्याची स्थावर मालमत्ता व मशिनरी सुमारे साडेसहा लाख रुपये वार्षिक भाड्याने सहकारी कारखान्यास दिली होती. सहकारीकरण केल्यानंतर उसाची मोठी उपलब्धता होईल, शासनाच्या इतर सोयी-सवलती मिळतील व कारखाना उत्तम चालेल हा खोटा आशावाद  निर्माण करून दिला होता. मात्र १९७९-८० च्या हंगामात सहकारी कारखाना पुरेशा उसाचे गाळप आणि उत्पादन करू शकला नाही. १९८०-८१ च्या हंगामात कारखाना सुरु होऊ शकला नाही. गलथान कारभार व राजकीय हस्तक्षेपामुळे कारखाना बंद पडला. यंत्राचा घरघर थांबली, राबणारे हात स्थिरावले. कारखाना परिसरात नीरव शांतता पसरली. सकाळ-संध्याकाळी कारखाना परिसरातील झाडांवर पक्षांचा किलबिलाट होत होता. पण त्यामधले सूर बदलले होते. भयाचे मोठे सावट माळीनगर परिसरात पसरले होते. बकाल वर्तमानच भविष्याची चिंता स्पष्ट करीत होते. कारखाना बंद पडल्यावर ज्यांचा ऊस शेतात उभा होता अशा मंडळींनी इतर कारखान्यांना ऊस पाठवून त्या पिकाची व्यवस्था लावली. आपला ऊस आपल्या कारखान्यासमोरून दुसरीकडे नेत असताना त्यांच्या अंत:करणातही मोठी घालमेल होत होती. बंदच्या काळात कामगार व कारखान्यावर अप्रत्यक्षपणे अवलंबून असणाऱ्या मंडळींवर अक्षरश: उपासमारीची वेळ आली. रोजच्या जगण्याबरोबरच मुलांचे शिक्षण, आजारपण, घरातील मुला-मुलींचे लग्नसमारंभ या साऱ्या चिंतांचा डोंगर समोर दिसत होता. कारखाना बंद पडल्याने रोजीरोटीबरोबरच अनेक प्रश्न उभे राहिले होते. माणसांचा गोंगाट, पक्ष्यांचा किलबिलाट आणि यंत्रांची लयबद्धता अनुभवणाऱ्या या विकासनगरीच्या वाट्याला काय वाढून ठेवलेले आहे हे कळत नव्हते.

***

# पुन्हा कारखाना कंपनीकडे

कारखाना पुन्हा चालू व्हावा म्हणून कामगारांनी शासनाकडे निवेदने दिली. संबंधित मंत्र्यांच्या भेटी घेतल्या. आपल्या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी आंदोलने केली. रास्ता रोको केले. त्याच वेळी सहकारीच्या ताब्यात असलेला साखर कारखाना पुन्हा मूळ कंपनीकडे आणण्यासाठी तत्कालीन चेअरमन श्री. विजयराव शंकरराव गिरमे, व्हा. चेअरमन श्री. निळकंठ राजाराम रासकर, मॅनेजिंग डायरेक्टर श्री. प्रदीप भगवंतराव जाधव व त्यांच्या सर्व सहकारी संचालक, सभासद, कामगार व नागरिकांनी महाराष्ट्र शासनाकडे जोरदार प्रयत्न सुरू केले. बंद असलेला कारखाना चालविण्याची तयारी दर्शविली. त्याच वेळी कारखाना पुन्हा मूळ कंपनीकडे आणण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू होते. त्या वेळचे मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले, सहकारमंत्री नरेंद्र तिडके यांच्याकडे ही मागणी होत असताना सोलापूर जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री कमळे गुरुजींनीही या मागणीला पाठिंबा दिला होता. या साऱ्यांचा विचार करून पुन्हा १९८१-८२ साली एक वर्षाच्या विदारकतेनंतर कारखाना दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लिमिटेडच्या ताब्यात देण्यात आला. माळीनगर परिसराने या घटनेचे अगदी मनस्वी स्वागत केले. मात्र एक हंगाम कारखाना बंद राहिल्याने गोदामामध्ये साखर शिल्लक नव्हती. बंद पडलेला कारखाना सुरू करण्यासाठी आर्थिक उपलब्धता कशी करायची हा मोठा प्रश्न होता. मात्र दि सासवड माळी शुगर फॅक्टरीवरच्या विश्वासामुळे सगळ्या बाबींची पूर्तता झाली आणि १९८१-८२ चा हंगाम घेण्यात आला.

कारखाना मूळ कंपनीकडे आल्याने संचालक मंडळ, सभासद, शेतकरी आणि कामगारांचा आत्मविश्वास बळावला होता. या दारुण परिस्थितीवर मात करून माळीनगरला पुन्हा गतवैभव मिळवून द्यायचे या ऊर्मीनेच सगळे कामाला लागले होते. सगळे वातावरण झपाटून गेले होते. सुवर्णमहोत्सावाकडे निघालेल्या कंपनीला पुन्हा सुवर्ण झळाळी मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही हा विडाच सर्वांनी उचलला होता, आणि त्याची प्रचितीही याच हंगामात आली. या हंगामात सोलापूर जिल्ह्यात सर्वप्रथम म्हणजेच ३० ऑक्टोबर, १९८१ ला कारखाना सुरू झाला आणि सर्वांत शेवटी म्हणजे अगदी पावसाळ्याच्या तोंडावर २० जून, १९८२ ला हंगामाची सांगता केली. या हंगामात जिल्ह्यातील सर्व उसाचे गाळप करायला कारखाने असमर्थ ठरले होते. त्या वेळी शासनाने माळीनगर कारखान्याला सर्व उसाचे गाळप होईपर्यंत कारखाना सुरू ठेवण्याचे आवाहन केले होते. बंद पडलेला कारखाना पुन्हा सुरू होण्यासाठी शासनाने कंपनीला केलेले सहकार्य लक्षात घेऊन सभासदांचा ऊस संपल्यावर १ महिना २० दिवस कारखाना सुरू ठेवला आणि इतर कारखान्यांकडील ४० हजार टन ऊस गाळप केला. गेल्या वर्षी बंद असलेल्या या कारखान्याने चालू वर्षी एवढी चांगली कामगिरी करावी यावर विश्वासच बसत नव्हता. बंद पडलेल्या कारखान्याला शेतकरी

# सुवर्णमहोत्सव



सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने निघालेल्या मिरवणूकीत डावीकडून: प्रदीप जाधव, बी. व्ही. सोनाळकर, माधवराव आपटे,
उभे: निळकंठ रासकर, अरविंद जाधव, प्रभाकर रासकर.



डावीकडून वसंतराव राऊत, निळकंठ रासकर, विजयराव गिरमे, बी. व्ही. सोनाळकर, प्रदीप जाधव, गजाननराव इनामके.
उभी रांग: प्रभाकर रासकर, अरविंद जाधव, मधुकरराव गिरमे, अरूण पांढरे.

# सुवर्णमहोत्सव



प्रसिध्द उद्योगपती माधवराव आपटे यांच्या उपस्थितीत कारखान्याच्या सुवर्ण महोत्वाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या समारंभात बोलताना सेंट्रल बँकेचे चेअरमन व मॅनेजिग डायरेक्टर बी. व्ही. सोनाळकर.



हॉटेल सेंट्रल पार्क उद्घाटन प्रसंगी डावीकडून विजयराव गिरमे, प्रदीप जाधव, प्रतापराव पवार, विजयकांत कुदळे, अरूण पांढरे.

### कारखान्याचा सुवर्णमहोत्सव

सेंट्रल बँकेचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर बी. व्ही. सोनाळकर यांच्या हस्ते दि. ७ जानेवारी १९८३ रोजी सुवर्णमहोत्सव साजरा झाला. यावेळी सुवर्णोदय अंकाचे प्रकाशन करण्यात आले. प्रसिध्द उद्योगपती माधवराव आपटे या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी विविध सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित केले होते. या वेळी श्री. विजयराव शंकरराव गिरमे हे चेअरमन होते. श्री. निळकंठ राजाराम रासकर व्हाईस चेअरमन होते. तर प्रदीप भगवंतराव जाधव हे मॅनेजिंग डायरेक्टर होते.

ऊस देतील का? कारखाना चालेल का? दर किती मिळणार अशा अनेक शंका काढणाऱ्या टीकाकारांना हे चोख उत्तर होते. या हंगामात कारखान्याने २ लाख टन उसाचे विक्रमी गाळप केले आणि २ लाख ४ हजार ४४० साखर पोती उत्पादित करून एक नवा विक्रम आपल्या नावावर नोंदविला.

***

### सुवर्ण महोत्सव १९८३
### संचालक मंडळ

मा.श्री. विजयराव शंकरराव गिरमे, चेअरमन.

मा.श्री. निळकंठ राजाराम रासकर, व्हाईस चेअरमन.

मा.श्री. प्रदीप भगवंतराव जाधव, मॅनेजिंग डायरेक्टर.

मा.श्री. प्रभाकर शंकरराव रासकर, संचालक.

मा.श्री. मधुकर हरीभाऊ गिरमे, संचालक.

मा.श्री. वसंत शंकरराव राऊत, संचालक.

मा.श्री. गजानन शंकरराव इनामके, संचालक.

मा.श्री. अरविंद एकनाथराव जाधव, संचालक.

मा.श्री. अरूण अनंतराव पांढरे, संचालक.


# प्रेरणा आणि श्रध्दा

१९३१ साली कोपरगाव बेटावर श्री संत सावता महाराज पुण्यतिथीदिनी साखर कारखान्याच्या संकल्पाचा नारळ फोडण्यात आला होता आणि १९३३-३४ च्या हंगामात विजयादशमीला हा संकल्प प्रत्यक्षास पूर्णत्वास जाऊन कारखाना सुरू झाला. सावता महाराजांच्या प्रतिमेस साक्ष ठेवून कारखाना उभारणीचा संकल्प केला होता. सावता महाराज हे संत मांदियाळीतील एक श्रेष्ठ संत आहेतच. पण सकल माळी समाजाचे श्रद्धास्थान आहे. कर्तव्य आणि कर्म करीत राहण्यातच खरी ईश्वर सेवा आहे अशी धारणा असणाऱ्या सावता महाराजांचे विठ्ठल हे परम दैवत होते. परंतु विठ्ठलाच्या भेटीसाठी ते कधीच पंढरीला गेले नाहीत. अंकुरणारे बीज, फुलणारी पालवी आणि डोलणाऱ्या पिकातच त्यानी परमेश्वर पाहिला.


**कांदा मुळा भाजी ।**
**अवघी विठाबाई माझी।**
**लसूण मिरची कोथिंबिरी ।**
**अवघा झाला माझा हरी ॥**

हा कर्मवाद सावता महाराजांनी आयुष्यभर जोपासला. निढळाचा घाम गाळून सोने पिकविणाऱ्याच्या सोबतच परमेश्वर असतो. याची प्रचिती त्यांच्या चरित्राकडे पाहिल्यावर येते. सावता महाराज कधी पंढरीला गेले नाहीत मात्र त्यांना भेटायला प्रत्यक्ष विठ्ठल आल्याचे आणि दर वर्षी विठ्ठलाची पालखी सावता महाराजांना भेटायला येत असल्याचे आपण अनुभवतच आहोत. याच सावता महाराजांचा आशीर्वाद घेऊन कारखान्याच्या संकल्पाचा नारळ फोडला आणि तो संकल्प विजयादशमीच्या मुहूर्तावर सिद्धीस गेला. केवळ शेतीत पिक घेण्यापेक्षा शेतीतून उद्योगाकडे या निमित्ताने नव्या सीमोल्लंघनाचे कार्य सिद्धीस गेले.


शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आणि या देशाचा मुख्य व्यवसाय आहे. या शेतीव्यवसायात माळी समाजाचे स्थान अनन्यसाधारण आहे. रोपांना केवळ पाणी घालून



परमपुज्य श्री शंकर महाराज.



१७ आक्टोबर १९५६ रोजी ह.भ.प. सोनोपंत दांडेकर यांच्या शुभहस्ते कारखान्याच्या कार्यालयासमोरील प्रांगणात अनावरण करण्यात आलेला श्री संत सावता महाराजांचा संगमरवरी पुतळा



परमपुज्य गहिनीनाथ महाराज पादूका.



माळीनगरच्या मुख्य रस्त्यालगतच्या विश्रामगृहाच्या आवारातील महात्मा जोतीबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा.

चालत नाही तर त्याला जीव लावून वाढवले तरच प्राप्त होणाऱ्या फळांचे रसमाधुर्यही अमृताचे रूप धारण करते याची जाणीव माळी समाजाला आहे. काळ्या मातीशी एकरूप होऊन अविरत कष्ट करणाऱ्या माळी समाज बांधवांच्या शेतीतील पिके नेहमीच हेवा वाटावा अशी येत राहिली आहेत. महत प्रयासाने माळीनगर परिसरात उसाची शेती फुलविणाऱ्या माळी समाजबांधवांनी ऊस शेती कशी करावी याचा आदर्श राज्याला घालून दिला आहे. प्रसंगी तलवारीच्या पात्याचे रूप धारण करणाऱ्या उसाच्या पात्यांचा वाऱ्यावरचा झुला पाहिला की पंख पसरून मोर नाचत असल्याचा भास व्हावा एवढे देखणे ऊसमळे माळीनगर परिसरात पारतंत्र्याच्या काळापासून फुलत आहेत. संत सावता महाराजांचा कर्मवाद हा त्यांच्यासमोर आहेच पण त्याचबरोबर थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले हे त्यांचे खरे प्रेरणास्थान आहे. सत्यशोधक समाजाची स्थापना करणाऱ्या महात्मा जोतिबा फुले यांचे कार्य या राष्ट्रातील प्रत्येकासाठीच स्फूर्ती आणि प्रेरणेचा अमोल ठेवा आहे. शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथातून शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदनांवर परखड भाष्य करणाऱ्या जोतिबांनी झाडांना नळीने (पाईपने) पाणी घाला असे त्या काळात सांगितले होते. भविष्यातील पाण्याची वाढती गरज ओळखून



श्री दत्त मंदिर




श्री हनुमान मंदिर



श्री गहिनीनाथ महाराज मंदिर



श्री शंकर महाराज मंदिर




श्री गणेश मंदिर



३१ मे १९६९ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते पुणे महानगरपालिकेने उभारलेला महात्मा जोतिबा फुले यांचा हा पूर्णाकृती पुतळा दि. सासवड माळी शुगर फॅक्टरी माळीनगर यांनी तयार करून घेऊन पुणे महानगरपालिकेला दिलेला आहे.

पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचा संदेश आजच्या ठिबक सिंचनाच्या पार्श्वभूमीवर त्यामुळेच लाख मोलाचा वाटतो.

कमालीची प्रतिकूलता आणि पदोपदी जाणवणारे अपमानाचे अनुभव दुर्लक्षित करून महिलांना शिक्षणाची कवाडे उघडी करणाऱ्या सावित्रीबाईंचे योगदान खूप अतुलनीय ठरले आहे. स्त्री शिक्षणाची ज्ञानगंगोत्री असणारी सावित्री जोतिबाच्या सत्यशोधक मार्गातील क्रांतिज्योती होती. ज्योतिबा आणि सावित्री हे माळी समाजाचे प्रेरणास्थान आहे. उगवत्या पिढीलाही याचे भान असावे म्हणून १८ नोव्हेंबर, १९५९ रोजी कारखान्याचा रौप्यमहोत्सव साजरा करीत असताना मॉडेल विविधांगी प्रशालेत महात्मा फुले यांच्या पुतळ्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. त्याच दिवशी अतिथी गृहाचेही उद्घाटन करण्यात आले होते. याच अतिथिगृहाच्या हिरवळीवर जोतिबा-सावित्रीचे पुतळे बसविण्यात आले आहेत. माळी समाजाचे नेते आणि ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते अनावरण करण्यात आलेले जोतिबा- सावित्रीचे हे पुतळे म्हणजेच या परिसराची प्रेरणाशक्ती आहे. संत सावता महाराज हे समाज बांधवांचे श्रद्धास्थान आहे. त्यांना साक्षी ठेवून कारखाना उभारणीचा संकल्प सिद्धीस गेल्यावर कारखान्याच्या आवारात कार्यालयासमोरच त्यांचा पुतळा बसविण्यात आला आहे. सावता महाराज हे सकल समाजबांधवांचे श्रद्धास्थान आहे.

## श्री गहिनीनाथ महाराज व श्री शंकर महाराज

हिंदू, मुस्लिम, ख्रिचन आदि धर्मांतील लोक श्री शंकर महाराजांचे भक्त आहेत. श्री शंकर महाराजांचे भारतभर भ्रमण होते. त्यांचे बाह्य जीवन साधे होते. परंतु अंतर्मनामध्ये आत्मज्ञानाचा दिवा प्रज्वलित झालेला होता. अशा या महान तपस्व्याचे आगमन १९४० च्या सुमारास माळीनगर येथे झाले. त्यांच्या वास्तव्यामुळे, पदस्पर्शामुळे ही भूमी पावन झाली.

श्री गहिनीनाथ महाराज यांचेही वास्तव्य माळीनगरच्या भूमीत झाले होते. श्री शंकर महाराज यांनी कारखाना परिसरात श्री गहिनीनाथ

महाराजांच्या पादुका असल्याचे सांगितले. त्या ठिकाणी खोदकाम केले असता खरोखरच पादुका मिळाल्या. श्री शंकर महाराजांच्या दिव्यत्वाची प्रचिती आली. त्या पादुकांची त्यांनी प्राणप्रतिष्ठा केली व त्या ठिकाणी मंदिर बांधले. हे अत्यंत जागृत देवस्थान आहे. आजपर्यंत कारखान्यावर अनेक संकटे आली पण श्री गहिनीनाथ व श्री शंकर महाराजांच्या कृपेने या सर्व संकटांचे निवारण होत गेले.

सन्मानाच्या मार्गाने वाटचाल केली तर आनंदाची प्राप्ती होते. त्यासाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. आपण प्रयत्न केले की, आपले भाग्यही चालू लागते. आपण थांबलो की, आपले भाग्यही थांबते. आपण प्रयत्न न करता महाराजांच्या आशीर्वादाने कामे होतील असा विचार करू लागलो की, आपले तेज, आत्मविश्वास कमी होत जातो. साधुसंतांवर विश्वास ठेवण्याबरोबर आपण आपल्यावरही विश्वास ठेवला पाहिजे, अशी त्यांची धारणा होती.

श्री शंकर महाराज सिद्धपुरुष होते. भारतभर त्यांचा संचार होता. माळीनगरला अनेक बागाईतदारांच्या घरी जात. त्यांच्या दिव्य अनुभूतीचा प्रत्यय त्यांना येत असे. साधूमहाराजांचे अनेक भक्तगण असतात आणि भक्तांवर संतांची कृपादृष्टी असतेच हा आध्यात्मिक संकेत आहे, परंतु एखाद्या संस्थेवर एखाद्या सत्पुरुषाची कृपादृष्टी असावी याची प्रचिती माळीनगर परिसराला आली आहे. अनेकांचे संसार फुलविणारी संस्था एका अर्थाने खूप मोठे पुण्यकर्म करीत असते. त्यामुळे या सत्कार्याला



कंपनीच्या आवारातील हरीभाऊ गिरमे यांचा पुतळा.

संतांच्या आशीर्वादचे पाठबळ हवेच असते. शंकर महाराजांच्या कृपा-आशीर्वादाचे पाठबळ या संस्थेच्या वाटचालीत खूप मोलाचे आहे.

श्री शंकर महाराजांचे आशीर्वाद कायमस्वरूपी रहावेत म्हणून श्री गहिनीनाथ मंदिराशेजारी सन १९९७ साली श्री शंकर महाराज यांचे मंदिर बांधले व त्यांच्या पादुकांची प्राणप्रतिष्ठा ह.भ.प. श्री साखरे महाराज - आळंदी यांच्या हस्ते करण्यात आली.

गहिनीनाथ मंदिराच्या परिसरात श्री शंकराची संगमरवरी मूर्ती व पिंड बसविण्यात आली आहे. माळीनगर परिसरातील तसेच बाहेरगावचे अनेक भक्तगण मंदिरामध्ये दर्शनासाठी येत असतात.

***

# नवीन कारखान्याची उभारणी



२५ एप्रिल १९९१ रोजी नवीन कारखान्याच्या जागेचा भुमीपूजन समारंभ प.पू.डॉ. भाईनाथ महाराज कारखानीस यांच्या हस्ते संपन्न झाला.

सुवर्णमहोत्सवाच्या टप्प्यावर कारखान्याने केलेले विक्रमी गाळप आणि उत्पादन यामुळे कारखान्याला या काळात आर्थिक स्थिरता प्राप्त होत होती. मात्र उसाची वाढती उपलब्धता आणि त्या तुलनेत जुनी मशिनरी यांमुळे गाळप आणि उत्पादनाला मर्यादा येत होत्या. वाढत्या उत्पादन खर्चाचा परिणाम ऊस दरावर होत होता. या परिस्थितीत उत्पादन खर्च कमी करणे ही महत्त्वाची गरज होती. श्री. विजयकांत शंकरराव कुदळे हे चेअरमन होते. श्री. अरुण अनंतराव पांढरे हे त्या वेळी मॅनेजिंग डायरेक्टर होते. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी कारखान्याचे विस्तारीकरण करण्याचा निर्णय घेतला. प्रतिदिन १७५० टन गाळप क्षमतेचा परवाना मिळवला. त्या वेळचे केंद्रीय संरक्षणमंत्री आणि आताचे केंद्रीय कृषिमंत्री मा. शरदचंद्रजी पवार साहेबांचे त्यासाठी मोलाचे सहकार्य मिळाले. त्या वेळची नाणे टंचाई, इराण-इराक युद्धामुळे निर्माण झालेली परिस्थिती, शासकीय पातळीवर वारंवार होणारे बदल, भाववाढ आदि संकटांना समर्थपणे सामोरे जात केवळ ११ महिन्यांत नवीन कारखाना उभारला गेला. २५ एप्रिल, १९९१ रोजी सायंकाळी ५.४५ या गोरज मुहूर्तावर भाईनाथ महाराज यांच्या शुभहस्ते भूमिपूजन करून १४ मे, १९९३ रोजी सकाळी १० वा. त्या वेळचे चेअरमन विजयकांत शंकरराव कुदळे व त्यांच्या पत्नी सौ. अनुपमा कुदळे यांच्या हस्ते गळीत हंगामाची चाचणी




पद्मश्री अप्पासाहेब पवार यांचा सत्कार करताना अरूण पांढरे.



जगदगुरू तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारक-यांना मिष्टान्न भोजन प्रसंगी वारक-यांसमवेत अरूण पांढरे.



पद्मश्री अप्पासाहेब पवार यांच्या शुभहस्ते नवीन साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा प्रारंभ झाला. यावेळी त्यांच्यासोबत डावीकडून विनायकराव पाटील, श्री पवार, राजेंद्र गोपाळराव गिरमे, विजयराव गिरमे, विजयकांत कुदळे, वसंतराव राऊत, प्रदीप जाधव, गौतम गिरमे, उदय पांढरे.



कर्नाटक विधासभा सदस्य बी.जी.पाटील यांच्या हस्ते साखर पोते पूजन समारंभात अरूण पांढरे यांच्या समवेत खातेप्रमुख व अन्य मान्यवर.

घेतली. बारामती कृषिप्रतिष्ठानचे अध्यक्ष पद्मश्री अप्पासाहेब पवार यांच्या शुभहस्ते १ नोव्हेंबर, १९९३ रोजी सकाळी १० वा. या नवीन कारखान्याच्या पहिल्या गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी उसाची उपलब्धता व शेतकऱ्यांचा आग्रह यांमुळे पुन्हा कारखान्याच्या गाळप क्षमतेत वाढ करावी लागली. २५०० टन गाळप क्षमता करण्यात आली आणि त्यानंतर कारखाना प्रतिदिन ३००० ते ३२०० टनांपर्यंत उसाचे गाळप करू लागला. हंगाम अखेर सुमारे ६ लाख टन उसाचे गाळप आणि सुमारे ७ लाख साखर पोत्यांचे निर्माण त्यामुळे होऊ लागले. कोणत्याही धंद्यात व व्यवसायात चढउतार असतातच. साखर धंदाही त्याला आपवाद नाही. मात्र कितीही चढउतार आले तरी उत्तम व्यवस्थापन कौशल्याच्या बळावर काळाबरोबर टिकून राहत पुढे जाता येते हे माळी समाज बांधवांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. त्यामुळे तर सन २००३-२००४, २००४-२००५ आणि २००५-२००६ या दुष्काळाच्या छायेत पार पडलेल्या गळीत हंगामातही कंपनीने इतरांच्या तुलनेत खूप चांगली कामगिरी केली. या काळात राज्यात अनेक कारखाने उसाअभावी बंद होते आणि साखरेचे दर पडल्याने कारखाने अडचणीत आले होते. मात्र अशा काळातही योग्य नियोजन करून कारखान्याने हे तीनही हंगाम यशस्वी केले.

***

## नवीन कारखाना उभारणी १९९३
## संचालक मंडळ

मा.श्री. विजयकांत शंकरराव कुदळे, चेअरमन व होलटाईम डायरेक्टर.
मा.श्री. अरविंद एकनाथराव जाधव, व्हाईस चेअरमन.
मा.श्री. अरूण अनंतराव पांढरे, मॅनेजिंग डायरेक्टर.
मा.श्री. विजयराव शंकरराव गिरमे, संचालक.
मा.श्री. वसंत शंकरराव राऊत, संचालक.
मा.श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे, संचालक.
मा.श्री. गौतम मधुकरराव गिरमे, संचालक.
मा.श्री. दिलीप निवृत्ती इनामके, संचालक.
मा.श्री. सुनिल विश्वानंद पाषाणकर, संचालक.
मा.श्री. राजेंद्र कृष्णकांत गिरमे, संचालक.
मा.श्री. रत्नदीप नारायणराव जाधव, संचालक.

# मोलॅसीस बेस्ड डिस्टिलरी

केवळ साखर उत्पादन घेऊन कारखानदारी फायदेशीर ठरणार नाही. याची जाणीव संचालक मंडळाला होती.त्यामुळे नव्या कारखान्याच्या उभारणीनंतर डिस्टीलरी व सहवीज निर्मिती करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला. सन २००० मध्ये जनरल मिटींगची ही त्यास मान्यता घेतली. सन २००० ते २००२ या कालावधीत झालेल्या अनेक बोर्ड मिटींगमध्ये याबाबत सविस्तरपणे चर्चा होऊन डिस्टीलरी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार केंद्र व राज्य सरकारकडे अर्ज केले. सन २०००-२००१ साली त्यास केंद्र शासनाची मान्यता मिळाली. मात्र राज्य शासनाची मान्यता अजून मिळालेली नव्हती. श्री विजयकांत कुदळे हे त्यावेळी मॅनेजिग डायरेक्टर होते. त्यांनी व संचालक मंडळातील सदस्यांनी त्यासाठी मुख्यमंत्री, उत्पादनशुल्क मंत्री, सचिव, आयुक्त यांच्याकडे सतत पाठपुरावा केला होता. संचालक मंडळाच्या सोबत मा. श्री. शरद पवार साहेबांची भेट घेऊन त्यांना ही अडचण सांगितली होती. त्यानंतर श्री पवार साहेबांनी केलेल्या सहकार्यातूनच सन २००३ च्या दरम्यान कारखान्याला डिस्टीलरी प्रकल्प उभारणीसाठीचे लायसन मिळाले. त्यावेळचे मॅनेजिंग डायरेक्टर अरविंद जाधव, होलटाईम डायरेक्टर राजेंद्र गोपाळराव गिरमे, प्रोजेक्ट चेअरमन विजयकांत कुदळे आणि संचालक मंडळाने मेहनत घेऊन केवळ अकरा महिन्यात मोलॅसीस बेस्ड डिस्टीलरी उभारणीचे काम पूर्णत्वास नेले.

काळानुरुप देशातील साखर कारखाने सहउद्योगाकडे वळू लागले होते. बदलत्या स्पर्धात्मक युगात सहउद्योगाकडे वळणे क्रमप्राप्त झाले होते. सहउद्योगाचे महत्त्व ओळखून सन २००५ साली कारखान्याने मोलॅसीस डिस्टिलरी उभारण्याचा निर्णय घेतला. प्राज इंडस्ट्रीजला डिस्टिलरी उभारण्यासाठी करारबद्ध केले. डिस्टिलरी उभारण्यातील अत्याधुनिक तंत्रज्ञान व प्राज कंपनीचा दीर्घ अनुभव त्यासाठी विचारात घेतला होता. श्री. अरविंद एकनाथराव जाधव हे मॅनेजिंग डायरेक्टर होते. कै. वसंतराव शंकरराव राऊत हे चेअरमन होते. श्री. नंदकुमार जगन्नाथराव गिरमे हे व्हाईस चेअरमन व श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे हे होलटाईम डायरेक्टर होते. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केवळ सहा महिन्यांच्या काळात हा प्रकल्प उभारून कारखान्याने कमीत कमी काळात डिस्टिलरी उभारण्याचा उच्चांक आपल्या नावावर नोंदविला. आणि २३ जून २००६ रोजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या शुभहस्ते या प्रकल्पाचे उद्‌घाटन करण्यात आले. ग्रामविकास व पर्यटनमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या उद्‌घाटन समारंभात अर्थमंत्री जयंतराव पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. अतिशय कमी काळात उभारलेल्या या प्रकल्पाच्या उभारणीसाठी येणाऱ्या खर्चातही मोठी काटकसर करण्यात आली होती. कमी वेळेत पूर्णत्वास नेलेल्या या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या डिस्टिलरी प्रकल्पातून कारखान्याला अपेक्षेनुसार रिझल्ट मिळाले आहेत. या यशस्वी प्रकल्पाचा पथदर्शी प्रकल्प म्हणूनच त्या वेळी

गौरव झाला आणि साखर उद्योगातील अनेक मान्यवरांसह वेगवेगळ्या क्षेत्रांतील तंत्रज्ञांनी या प्रकल्पाला भेटी देऊन माहिती घेतली आहे. त्यात परदेशातील अनेक मान्यवरांचा सहभाग होता.

## कंपोस्ट खत प्रकल्प

कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये गेले ७५ ते ८० वर्षे सतत ऊस पीक लागवड होत आहे. सतत ऊस पीक घेतल्यामुळे जमिनीच्या सुपीकतेवर याचा अनिष्ट परिणाम होतो. यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांकडून शेणखत, अखाद्य पेंडीचा पूर्वीपासून वापर होत होता, परंतु सध्याच्या परिस्थितीमध्ये सेंद्रीय खताची वेळेवर उपलब्धता व त्याची किमतीही शेतकऱ्याच्या आवाक्याबाहेरची आहे.

वरील समस्येवर कारखाना व्यवस्थापनाने विचार करून सन २००२ या वर्षापासून सेंद्रीय (कंपोस्ट) खत निर्मिती प्रकल्प राबविण्याच्या हेतूने प्रयत्न चालू केले. यामध्ये कारखान्यातून उत्पादित होणारा प्रेसमड, प्लॉय ॲश व आसवनी विभागातून निघणारे सांडपाणी यांचा उपयोग करून प्रती वर्षी सुमारे १२००० मे. टन क्षमतेची सेंद्रीय खत निर्मिती चालू केली. सदरचे निर्माण झालेले सेंद्रीय खत शेतकऱ्यांना पोहच देण्यात येत आहे. याचा फायदा निश्चितपणे शेतकऱ्यास होत असून एकरी ४ ते ५ मे. टन ऊस उत्पादनात वाढ झालेली आहे.

पर्यावरणाच्या हेतूने आसवनी प्रकल्पातील सांडपाण्याचा पुरेपूर वापर करून पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न या प्रकल्पाच्या माध्यमातून साखर कारखान्यामार्फत होताना दिसून येत आहे.



मोलॅसीस बेस्ड डिस्टिलरी

## इथेनॉल निर्मिती

सहउद्योगाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन वेगवेगळे उद्योग समोर येत होते. त्यात इथेनॉल निर्मिती हा पर्याय होता. मॅनेजिंग डायरेक्टर श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे, चेअरमन श्री. विजयकांत शंकरराव कुदळे, व्हा. चेअरमन श्री. हरिभाऊ सोपानराव भोंगळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी इथेनॉल निर्मितीचा निर्णय घेतला. मोलॅसीस बेस डिस्टिलरी उभारल्यावर कारखान्याने इथेनॉल उत्पादन करण्याचा निर्णय घेतला तीस हजार लिटर क्षमतेचा प्रकल्प कमीत कमी वेळेत उभारला आणि २३ मार्च २००८ रोजी राज्याच्या उत्पादन शुल्क विभागाचे सहआयुक्त एस. आर. कुदळे यांच्या शुभहस्ते हा प्रकल्प कार्यान्वित केला. प्राज इंडस्ट्रीजचे मॅनेजिंग डायरेक्टर एस. एम. इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ पार पडला. मोलॅसीस बेस्ड डिस्टिलरी नंतर कारखान्याने इथनॉलची निर्मिती करून सहउद्योगमध्येही यशस्वी पावले टाकायला सुरुवात केल्याचे संकेत या वेळी स्पष्ट दिसून आले होते.

***

# ग्रेनबेस्ड डिस्टिलरी

काळाच्या ओघात साखर कारखाने सहउद्योग उभारू लागले होते. त्याच वेळी पावसाने भिजलेल्या आणि त्यानंतर काळ्या पडलेल्या ज्वारीचा प्रश्न सरकारपुढे आला होता. भिजून काळे पडलेले धान्य बाजारात कुणीही घेत नव्हते. त्यामुळे या धान्याचे काय करायचे हा प्रश्न होताच. ज्या शेतकऱ्याचे हे धान्य आहे तो शेतकरी या परिस्थितीमुळे गंभीर संकटात सापडला होता. यावर पर्याय शोधताना या खराब धान्यापासून अल्कोहोल निर्मितीचा पर्याय शासनासमोर आला होता. शेतकऱ्यांचे नैसर्गिक अवकृपेमुळे होणारे नुकसान टाळण्याच्या हेतूने सरकारने ग्रेन बेस्ड डिस्टिलरी उभारणीला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले. किती खराब धान्य उपलब्ध होऊ शकते याचा पूर्ण अंदाज घेऊनच शासनाने हे धोरण स्वीकारले होते.

शासनाचे धोरण, खराब धान्याचा निर्माण झालेला प्रश्न आणि एक नवा सहउद्योग उभारण्याची संधी या बाबी लक्षात घेऊन मॅनेजिंग श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे आणि संचालक मंडळातील त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्रेन बेस डिस्टिलरी उभारण्याचा निर्णय घेतला. २७ मार्च २००९ रोजी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर विधान परिषदेचे माजी सभापती श्री. ना. स. फरांदे यांचे शुभहस्ते व अखिल भारतीय माळी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णकांत शंकरराव कुदळे, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी चेअरमन श्री. विजयराव बोरावके यांच्या उपस्थितीत या प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. प्रतिदिन तीस हजार लिटर उत्पादन क्षमतेचा हा प्रकल्प असून त्यासाठी प्राज कंपनीचे तंत्रज्ञान वापरले आहे. या प्रकल्पाची उभारणी पूर्ण झाल्यानंतर २४ मार्च २०१० रोजी त्याचे उद्घाटन करण्यात आले. वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाच्या बळावर नावलौकिक कमावलेल्या माळी समाजातील ४० मान्यवरांच्या शुभहस्ते अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात हा उद्घाटन समारंभ पार पडला. ग्रेन बेस डिस्टिलरीने आपण आणखी एक सहउद्योग उभारून यशस्वी केला आहे. पण त्याचबरोबर ज्या शेतकऱ्यांसमोर खराब धान्याचा प्रश्न निर्माण झाला होता त्यांनाही मोठा आधार देण्याचे काम केले आहे. शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी चालविलेला कारखाना म्हणून महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात आपल्या कारखान्याचा गौरवाने उल्लेख होतो. हा गौरव उंचावण्याचे काम एका अर्थाने आपण केले आहे. कारण ज्या शेतकरी बांधवांकडे खराब धान्याचा प्रश्न जटील बनला होता त्यांना या प्रकल्पाच्या माध्यमातून आपण हातभार लावून शेतकरी वर्गाला दिलासा देण्याचेही काम केले आहे. सडलेले, काळे पडलेले आणि खराब धान्य या प्रकल्पासाठी वापरले जाते. त्यात मक्याचाही समावेश आहे. विशेषतः मक्याचा अन्न म्हणून वापर होत नाही आणि जिरायती भागात कमी पाण्यावरही मका पीक घेता येते. विशेषतः पशुखाद्यासाठी वापरला जाणारा मका या प्रकल्पासाठी वापरात आल्याने शेतकऱ्याला जास्तीचे चार पैसे मिळाले आहेत. हा प्रकल्प होण्यापूर्वी मक्याला ६५० ते ७५० रुपये प्रति क्विंटल दर मिळत होता. तिथे प्रति क्विंटल मक्याचा दर १००० रुपयांवर गेला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढच झाली. या



ग्रेनबेस डिस्टीलरीची प्रशासकीय इमारत.

प्रकल्पात प्रक्रिया होऊन बाहेर पडणाऱ्या धान्याच्या विशेषतः मक्याच्या चोथ्याचा एक सकस पशुखाद्य म्हणून वापर होत आहे. या पशुखाद्यामुळे जनावरांचे आरोग्य उत्तम राहण्याबरोबरच दूध उत्पादनात भरीव वाढ होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे त्यालासुद्धा मोठी मागणी आहे. प्रतिदिन तीस हजार लिटर उत्पादन क्षमतेचा हा ग्रेन बेस डिस्टिलरी प्रकल्प यशस्वीपणे सुरू आहे.

## बायोगॅस प्रकल्प

कंपनीच्या मोलॅसीस डिस्टिलरीमधून निघाणाऱ्या स्पेंटवॉशला ट्रीटमेंट करण्यासाठी बायोगॅस प्लॅन्ट स्वयंत्रणेची उभारणी सन २०१२ रोजी केलेली आहे. मॅनेजिंग डायरेक्टर श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे, चेअरमन श्री. कृष्णकांत शंकरराव कुदळे, व्हा. चेअरमन श्री. विलास दामोदर इनामके, होलटाईम डायरेक्टर श्री. वसंतराव मल्हारी ताम्हाणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा प्रकल्प उभारला आहे. बायोगॅस प्लॅन्टमध्ये स्पेंटवॉश मधील ऑरगॅनिक मॅटरचे रिडक्शन करून मिथेन गॅसची निर्मिती केली जाते. बायोगॅस प्लॅन्टच्या डायजेस्टरची क्षमता ८४०० घनमीटर असून त्यामधून दररोज प्रती तास ६०० घनमीटर याप्रमाणे दररोज १४,४०० घनमीटर एवढ्या मिथेन गॅसची निर्मिती केली जाते. तयार झालेला मिथेन गॅस बॉयलरमध्ये इंधन म्हणून वापरला जात असून त्यापासून दररोज सरासरी ३० मे. टन बगॅसची बचत केली. तसेच बायोगॅस प्लॅन्टमधून बाहेर पडणारा ट्रीटेड स्पेंटवॉश कारखान्यामधून तयार होणाऱ्या प्रेसमडवरती स्प्रे करून उत्तम प्रतीचे कंपोस्ट खत तयार केले जाते.

***


# को-जनरेशन



१४.८ मेगावॅट क्षमतेचा को-जन. प्रकल्प.

सहवीज निर्मिती प्रकल्प उभारणी करून सहउद्योगाच्या मालिकेतील एक दमदार पाऊल आपण टाकले आहे. देशात जाणवणारा विजेचा तुटवडा आणि विजेची वाढती गरज लक्षात घेता वीज उत्पादनाला सध्या चांगले दिवस आहेत. कारखान्याने तयार केलेल्या विजेला शासनाच्या रूपाने शाश्वत ग्राहक आहे, याचा विचार करून मॅनेजिंग डायरेक्टर श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे, चेअरमन श्री. कृष्णकांत शंकरराव कुदळे, व्हा. चेअरमन श्री. विलास दामोदर इनामके, होलटाईम डायरेक्टर श्री. वसंतराव मल्हारी ताम्हाणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सहवीज निर्मित्ती प्रकल्प उभारला आहे.

२९ मे २००१२ रोजी भागधारकांच्या सर्वसाधारण सभेत हा प्रकल्प उभारणीला मंजुरी घेण्यात आली. १४ डिसेंबर २००१२ रोजी होलटाईम डायरेक्टर वसंतराव मल्हारी ताम्हाणे यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. १४.८ मेगावॅट क्षमतेच्या कन्डेसिंग रूटच्या या प्रकल्पाचे बॉयलर व सिमेन्स




टर्बाईनचे काम इस्जेक कंपनीने केले आहे. १३ सप्टेंबर २०१३ रोजी या प्रकल्पाच्या नवीन बॉयलरची अग्निपूजा सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या माळीनगर शाखेच्या वरिष्ठ व्यवस्थापक आय. एस. प्रेम व बँक ऑफ बडोदा शाखा अकलूजचे मुख्य व्यवस्थापक व्ही. एस. पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आली. होलटाईम डायरेक्टर वसंतराव ताम्हाणे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुजलाताई वसंतराव ताम्हाणे या उभयतांच्या शुभहस्ते होमहवन पूजा करण्यात आली.

१४.८ मेगावॅट क्षमतेचा हा प्रकल्प पूर्णत: पर्यावरणपूरक आणि भुशापासून वीजनिर्मित्ती करणारा प्रकल्प आहे. या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विजेपैकी साडेपाच ते सहा मेगावॅट वीज स्वत:साठी वापरून उरलेली वीज विद्युत मंडळाला पाठविली जाणार आहे. त्यासाठी मोठ्या भूमिगत विद्युतवाहिनी केबल्स् टाकण्यात आल्या आहेत. केवळ दहा महिन्यांच्या काळात उभारलेला हा प्रकल्प स्वयंचलित प्रकल्प आहे. त्यामुळे अतिशय कमी मनुष्यबळाचा वापर येथे होणार आहे. या प्रकल्पामुळे कसल्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली असून प्रकल्पातून बाहेर पडणारी राख नियंत्रण करण्यासाठी इ.एस.पी. बसविला आहे. हा प्रकल्प पूर्ण झाला असून १० नोव्हेंबर २०१३ रोजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्रजी पवारसाहेबांच्या शुभहस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला सार्वजनिक बांधकाममंत्री छगन भुजबळ, सहकार व संसदीय कामकाजमंत्री हर्षवर्धन पाटील, उत्पादन शुल्क व अपारंपरिक ऊर्जामंत्री गणेश नाईक, पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री दिलीप सोपल यांच्यासह राजकीय, सामाजिक, सहकार आदी क्षेत्रांतील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. केवळ ११ महिन्यांत व कमी खर्चात उभारलेल्या या प्रकल्पाचे उद्घाटन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवारसाहेबांच्या शुभहस्ते होणार आहे. माळीनगर परिसराच्या दृष्टिकोनातून ही निश्चितच गौरवाची बाब आहे.

***

# अष्टदशकपूर्ती सोहळा

दि. सासावड माळी शुगर फॅक्टरीचा अष्टदशकपूर्ती सोहळा १० नोव्हेंबर २०१३ रोजी अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.केंद्रीय कृषीमंत्री मा.ना. शरदचंद्रजी पवार साहेबांच्या शुभहस्ते याच दिवशी कारखान्याच्या १४.८ मेगावॅट क्षमतेच्या सहवीज निर्मिती प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. अष्टदशकपूर्तीच्या निमित्ताने सहवीज निर्मिती प्रकल्पाचे उद्घाटन करून कारखान्याने आपल्या वैभवशाली वाटचालीतील नव्या पर्वाचा प्रारंभ केला. आपला गौरवशाली इतिहास अधिक दैदिप्यमान करण्याचा संकल्प सिध्दीस नेला. सार्वजनिक बांधकामंत्री मा.ना. छगनराव भुजबळ, पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री मा.ना. दिलीपराव सोपल, सहकारमंत्री मा.ना. हर्षवर्धन पाटील, मा. श्री रामराजे निंबाळकर, माजी उपमुख्यमंत्री मा.आ. विजयसिंह मोहिते पाटील, आ. बबनराव शिंदे, आ. दिपक साळुंखे, आ. भारत भालके, राज्य परिवहन महामंडळाचे माजी अध्यक्ष सुधाकरपंत परिचारक यांच्यासह अनेक मान्यवर या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. या कारखान्याने शेतकरी हाच केंद्रबिंदू मानून स्वातंत्र्यपुर्व काळापासून आजपर्यंत विकासाच्या अनेक योजना राबविल्या आहेत. त्यामुळे कारखान्याला ऊसपुरवठा करणारे शेतकरी, कामगार आणि परिसरातील नागरिकांमध्ये कारखान्याविषयी आपुलकीची भावना आहे. या आपुलकीच्या भावनेतूनच अष्टदशकपूर्ती सोहळा समारंभासाठी कारखान्याच्या प्रांगणात विशाल जनसमुदाय आवर्जून उपस्थित होता. कारखान्याच्या व्यवस्थापनाने जनमानसात निर्माण केलेली आपुलकी आणि विश्वासाचे नातेच त्यातून स्पष्ट होत होते. अतिशय भारावलेल्या आणि मंतरलेल्या वातावरणात हा अष्टदशकपूर्ती सोहळा साजरा होताना कारखान्याच्या व्यवस्थापनासह परिसरातील नागरिकांच्या ही आनंदाला पारावार उरलेला नव्हता. आपल्या वाडवडिलांनी स्थापन केलेल्या आपल्या कारखान्याचा हा गौरवशाली ऐतिहासीक टप्पा अनुभवताना कारखान्याचे सभासद भारावून गेले होते. पुर्वजांचे योगदान आणि प्रत्येक टप्प्यावर नव्या पिढीतील शिलेदारांनी बजावलेली कर्तव्यदक्षता यामुळेच आजचा हा सोनियाचा दिवस पाहत असल्याची भावना दाटून आली होती. प्रत्येक टप्प्यावर प्रतिकुलता असताना सुध्दा कारखान्याचे चेअरमन श्री कृष्णकांत कुदळे, मॅनेजिंग डायरेक्टर राजेंद्र गिरमे आणि त्यांच्या सर्व सहका-यांनी त्यावर मात करीत सहवीज निर्मिती प्रकल्प पूर्णत्वास नेला. मा. शरद पवार साहेबांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले. कारखान्याच्या इतिहासातील सुवर्णपान ठरावे असा हा महन्मंगल क्षण होता.

अष्टदशकपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने उपस्थित मान्यवरांचे स्वागत कारखान्याचे चेअरमन मा. कृष्णकांत कुदळे यांनी केले आणि हा सोहळा सुरू झाला. यावेळी बोलताना चेअरमन श्री कुदळे यांनी कारखान्याच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेतला. स्वातंत्र्यपूर्व काळात संस्थापक संचालकांनी माळीनगर येथे जे रोपटे लावले त्याचा आज वटवृक्ष झाला



केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार साहेबांच्या शुभहस्ते को-जन प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी त्यांच्यासोबत डावीकडून : नंदकुमार गिरमे, प्रवीण पांढरे, दिलीपराव सोपल, हर्षवर्धन पाटील, विजयसिंह मोहिते पाटील, छगनराव भुजबळ, श्री पवार साहेब, राजेंद्र गो. गिरमे, कृष्णकांत कुदळे, विजयराव गिरमे, अरविंद जाधव, सतिश गिरमे, परेश राऊत.

आहे. कारखान्याचे सर्व सभासद, कामगार, माळीनगरवासीय नागरीक आणि हितचिंतकांच्या सहकार्याने आपण हा यशस्वी टप्पा पूर्ण केला आहे. भविष्यातील अडचणींवर मात करण्यासाठी संस्थापक संचालकांचा आशीर्वाद आपल्या पाठीशी आहेच. या आशीर्वादाच्या बळावरच आज अष्टदशकपूर्तीचा वैभवशाली सोहळा आपण साजरा करीत आहोत अशी भावना व्यक्त केली.

कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर मा. राजेंद्र गिरमे यांना आपल्या प्रास्तावीकात कारखान्याची गती, स्थिती आणि प्रगतीचा आढावा घेतला. त्यांच्या प्रत्येक शब्दातून आत्मविश्वास आणि पुढे जाण्याच्या संकल्पाचा निर्धारच जाणवत होता. मा. पवारसाहेब आणि माळीनगरचे नाते खूप जुने आहे. त्यासाठी कुणाच्या दाखल्याची गरज नाही. असे सांगत, त्यांनी मा. पवार साहेब आणि माळीनगरची मंडळी यांच्यात असलेल्या स्नेहबंधाचा गौरवाने उल्लेख केला. स्वतः श्री पवार साहेबांनी सुध्दा माळीनगरशी असलेल्या आपल्या स्नेहाचा आवर्जून उल्लेख केला. आपल्या भाषणात ते म्हणाले, १९५६ साली पहिल्यांदा या कारखान्यात मी आलो होतो. बारामती येथील शेतकरी या कारखान्यात माहिति घेण्यासाठी आले होते. त्यावेळी वडिलांच्या मागे लागून मी येथे आलो होतो. इथल्या मंडळींनी आपुलकीने सर्व माहीती दिली. स्वातंत्र्यपुर्व काळात परकीयांची सत्ता असताना आम्ही कारखाना उभा केला. आता तर सरकार आपले आहे. हे काम तुम्ही अगदी सहज करू शकता. असे सांगत त्यांनी आमचा आत्मविश्वास वाढविला. आणि येथून माहिती आणि प्रेरणा घेऊनच पुढे छत्रपती सहकारी आणि माळेगांव हे



को-जन उद्घाटन समारंभ प्रसंगी विद्यमान संचालक मंडळः डावीकडून अरविंद जाधव, विजयसिंह मोहिते पाटील, सार्वजनिक बांधकामंत्री छगनराव भुजबळ, चेअरमन कृष्णकांत कुदळे, केंद्रीय कृषीमंत्री शरद पवारसाहेब, मॅनेजिंग डायरेक्टर राजेंद्र गोपाळराव गिरमे, सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री दिलीपराव सोपल, होलटाईम डायरेक्टर वसंतराव ताम्हाणे, व्हाईस चेअरमन विलास इनामके, विजयराव गिरमे. पाठीमागे उभे - डावीकडूनः परेश राऊत, नंदकुमार गिरमे, प्रवीण पांढरे, गणेश इनामके, सतिश गिरमे, अश्विन गिरमे.

दोन कारखाने बारामती परिसरात उभे राहिले. ही आठवण त्यांनी सांगितली. आपल्या भाषणात पुढे ते म्हणाले, १९३२ साली हा कारखाना सुरू झाला. जरी हा कारखाना खाजगी असला तरी एका अर्थाने राज्यातला पहिला सहकारी साखर कारखाना म्हणूनच याचा उल्लेख करावा लागेल. सासवड परिसरातील माळी समाजातील मंडळींनी ऊसशेतीच्या निमित्ताने वेगवेगळ्या ठिकाणी केलेले स्थलांतर, प्रयोगांमधील यशस्वीता, जिद्द, चिकाटी आणि दूरदृष्टीच्या सामर्थ्यावर उभी केलेली कारखानदारी याचा गौरवाने उल्लेख करीत, आज नव्या पिढीने या धंद्यातील बदलाची नोंद घेऊन पावले टाकल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. प्रवरा येथील सहकारी साखर कारखाना हा नोंदणी झालेला देशातील पहिला साखर कारखाना आहे. पण सहकाराचा विचार घेऊन, शेतक-यांनी पुढाकार घेऊन जी कारखानदारी उभी केली, त्याचा जर उल्लेख करायचा असेल तर सासवड माळीचाच उल्लेख करावा लागेल हे त्यांनी नमूद केले.

माळीनगर कारखान्याने दोन डिस्टीलरी उभारल्या आणि त्यानंतर सहवीज निर्मिती प्रकल्प ही उभारला. याबाबत बोलताना ते म्हणाले, मी देशातल्या अनेक कारखान्यात गेलो आहे. वीज तयार करण्यसाठी किती खर्च येतो याची मी माहिती घेत असतो.एक मेगावॅट वीज तयार करायला साधारणपणे सहा कोटी रूपयांच्या आसपास खर्च येतो. मात्र या ठिकाणी राजेंद्र गिरमे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जी वीज निमि ति केली आहे. त्याचा खर्च पावणे पाच कोटी रूपयांच्या आसपास आहे. धंदा असा चोख केला पाहिजे. लोकांनी टाकलेल्या विश्वासाला पात्र राहिले पाहिजे. तसा प्रयत्न इथे झाला आहे. याचा मला मनापासून आनंद आहे. असे त्यांनी


को-जन उद्घाटन समारंभ प्रसंगी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवारसाहेब यांचा सत्कार करताना मॅनेजिंग डायरेक्टर राजेंद्र गोपाळराव गिरमे आणि चेअरमन कृष्णकांत कुदळे. यावेळी मंचावर सार्वजनिक बांधकामंत्री छगनराव भुजबळ, सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील आदी मान्यंवर.

सांगितले तेंव्हा, उपस्थित जनसमुदायाने टाळ्यांचा कडकडाट करीत व्यवस्थापनाच्या विश्वासार्हतेला दाद दिली. सार्वजनिक बांधकाममंत्री छगनराव भुजबळ यांनी कारखान्याच्या संस्थापकांच्या स्मृतींना आदरांजली वाहीली. विद्यमान संचालक मंडळाच्या कारभाराबाबत त्यांनी अभिमानाची भावना व्यक्त केली. कारखान्याच्या रौप्यमहोत्सवाच्या
समारंभाला यशवंतराव चव्हाणसाहेब उपस्थित होते. आज अष्टदशकपूर्ती समारंभाला त्यांचे मानसपुत्र शरद पवारसाहेब उपस्थित आहेत. शेतकऱ्यांविषयी कणव असलेले हे नेते आहेत. शेतकऱ्याचा मान-सन्मान उंचावण्याबरोबरच शेतकरी ताठ कण्याने उभा राहिला पाहिजे ही माळीनगरच्या कारखान्याची भुमिका आहे. असे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमासाठी उपस्थित असणाऱ्या मान्यवरांनी दि. सासवड माळीचे वेगळेपण आपल्या भाषणांमधून अधोरेखीत केले. अष्टदशकपूर्तीच्या निमित्ताने कारखान्याचे आजवरचे सर्व माजी चेअरमन, माजी व्हाईस चेअरमन, माजी मॅनेजिंग डायरेक्टर, माजी संचालक यांचा मा. पवार साहेबांच्या आणि मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. सर्व माजी पदाधिकाऱ्यांच्या योगदानाप्रती विद्यमान संचालक मंडळाने व्यक्त केलेली ही कृतज्ञतेची भावना माजी पदाधिका-यासाठी सुखावह अशीच होती. सामाजिक ऐक्य, नाविण्याचा ध्यास, संकल्पपूर्तीचा निर्धार आणि कर्तव्यपूर्तीचा आनंद ओसंडून वाहणारा हा अष्टदशकपूर्ती सोहळा म्हणजे कारखान्यान्याच्या व्यवस्थापनाने शतकोत्सवाच्या दिशेने टालेले एक दमदार पाऊलच म्हणावे लागेल.

***

# अष्टदशकपूर्ती सोहळा क्षणचित्रे

रविवार, दि. १० नोव्हेंबर २०१३





# अष्टदशकपूर्ती सोहळा क्षणचित्रे





# नि:स्वार्थीपणा आणि सकारात्मकता...



**श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे**
मॅनेजिंग डायरेक्टर,
दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर
**मोबा. ९८२२३६३६३६**

खडकातून, दगडातून वाट काढीत पुढे पुढे सरकणाऱ्या 'कऱ्हा' नदीचे सुपीक खोरे, काळ्या कातळाच्या निधड्या छातीवर पाय रोवून उभा असलेला पुरंदरचा किल्ला आणि हाती घेऊ ते तडीस नेऊ हा निर्धार असणाऱ्या असामान्य कर्तृत्वाच्या युगंधरांचा प्रदेश म्हणून सासवड परिसराच्या पुण्यभूमीची महाराष्ट्राला ओळख आहे.

शेती-मातीशी नाळ असणाऱ्या आणि स्वकर्तृत्वावर अढळ विश्वास असलेल्या या परिसरातील बहादूर शेतकऱ्यांनी राज्याच्या कृषी क्षेत्रात आपले भरीव योगदान दिले आहे. शेती हाच मुख्य व्यवसाय असणाऱ्या माळी समाज बांधवांचे स्थान त्याच अग्रक्रमावर राहिले आहे. सह्याद्रीच्या पर्वतरांगांच्या कुशीत सासवड परिसरात शेती करणाऱ्या माळी समाज बांधवांनी २० व्या शतकाच्या पूर्वार्धात कृषी क्षेत्रात नवा अध्याय निर्माण करण्यासाठी सासवड परिसराची सीमा ओलांडली. देश पारतंत्र्यात होता. शेती, शेतकरी आणि शेतीपूरक उद्योग यांसाठी सरकारी धोरणात कसलाही आधारभूत दिलासा नव्हता. दळणवळणाची साधने उपलब्ध नव्हती. ओढ्या नाल्यांचे राहू द्या. पण नद्यांवरसुद्धा कोठे पूल होते. रस्त्यांची सोय नव्हती. या अराजकाच्या पार्श्वभूमीवर होणारी शेतीसुद्धा पारंपरिक पद्धतीनेच होत होती. जे आहे त्यातच समाधान मानण्याची वृत्ती लोकांची झाली होती. मात्र त्याच वेळी आपल्या क्षमतेचा पूर्ण वापर करून नवा इतिहास घडविण्याची स्वप्ने माळी समाजबांधव पाहत होते. त्यांची इच्छाशक्ती खूप प्रबळ होती. आत्मविश्वास दांडगा होता आणि वागण्या-बोलण्याला कृतीची जोड होती. त्यामुळेच तर सासवडमधून बाहेर पडले होते.

सासवड, बारामती, कोपरगाव अशा अनेक ठिकाणी जाऊन माळी समाज बांधवांनी शेती केली. शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करून उत्पादकता वाढविली. याच कालखंडात साधारणत: १९०१ साली माझे आजोबा भगवंतराव गेणूजी गिरमे हे भोडणी येथे शेती करीत होते. इनामके परिवारातील काही मंडळीही तेथे होती. भोडणी येथे त्या वेळी त्यांनी ऊस आणि नंतर गूळ उत्पादनाचा प्रारंभ केला. ही उसाची शेती पाहून तिथे अन्य मंडळींनीही त्यांच्यापासून प्रेरणा घेतली. उसाची शेती करताना आणि गुळाची व्यापारीपेठेत विक्री करताना त्यांचे अकलूज परिसरातील व्यापाऱ्यांशी अतिशय

जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते. विशेषत: जैन समाजातील मंडळींचा त्यात समावेश होता. याच वेळी कोपरगाव येथील समाजातील मंडळींनी ऊस शेतीमध्ये आपले स्थान पक्के केले होते. १९३२ ला जेव्हा साखर कारखाना काढण्याच्या शोधात अकलूज परिसराची पाहणी त्या वेळच्या संस्थापकांनी केली त्या वेळी अकलूज परिसरातील जैन समाजातील मंडळींनी खूप सहकार्य केले होते.

या ठिकाणी काम करताना साखर कारखाना आणि त्या अनुषंगाने उभ्या राहिलेल्या संस्था आणि माळीनगर परिसर यासाठी जे जे करता येईल ते करीत आलो आहे. एखाद्या कामावर समाधान मानण्याचा माझा स्वभावच नाही. त्यामुळे एक संपण्यापूर्वीच दुसरे काम हाती घेत आलो आहे. संचालक मंडळातील सहकारी, सभासद, कामगार यांनीही त्याला साथ दिली आहे. त्यामुळे शतकाच्या उंबरठ्यावर असणाऱ्या या उद्योग जगताला एक वैभवशाली स्वरूप प्राप्त होतेय याचा आनंद आहे.

साखर कारखान्याचे सहकारीकरण, त्यानंतर बंद पडलेला कारखाना या काळातील विदारकता आठवली की आजही मन खिन्न होते. परंतु पुन्हा कारखाना कंपनीकडे आला. सुस्थितीत राहिला. नवा कारखाना उभारला. त्यानंतर काळाची गरज ओळखून मोलॅसीस बेस्ड डिस्टिलरी उभारली. अतिशय कमी वेळात उभारलेल्या डिस्टिलरीमुळे कारखान्याने सहउद्योगाच्या दिशेने पाऊल टाकले. त्या वेळी मनात खूप दृढनिश्चय केला होता. आपल्या पूर्वजांनी अतिशय मेहनतीने आणि दूरदृष्टीने उभारलेल्या उद्योगाला आपल्याला खूप पुढे न्यायचे आहे. या कारखान्याचा चहूबाजूने




वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएनच्या बैठकीत विजयकांत शंकरराव कुदळे, राजेंद्र गोपाळराव गिरमे, वसंतराव शंकरराव राऊत यांच्या समवेत खाजगी साखर कारखान्यांचे पदाधिकारी.




कारखान्याचे प्रवेश द्वार

विस्तार आणि विकास झाला पाहिजे तरच त्यांचे वारस म्हणून घेण्यात अर्थ आहे असा विचार केला होता. आणि याच ध्येयाने प्रेरित होऊन मी झपाटून काम केले आहे. कोणतेही काम करताना अडचणी या येतच असतात. काही शत्रू समोरासमोर असतात. ते दिसत असतात, परंतु काही शत्रू पडद्यामागेसुद्धा असतात. हे सगळीकडेच असते. या सगळ्या संकटांवर मात करायची मानसिकता ठेवूनच काम केल्याने संकटांची आव्हाने मोडून काढताना एका अर्थाने मी आनंदच उपभोगला आहे. काळाची आणि कारखान्याच्या आर्थिक मजबुतीकरणाची गरज ओळखून आम्ही २००८ मध्ये इथेनॉल निर्मित्ती प्रकल्प उभारला. प्रतिदिन ३० हजार लिटर क्षमतेचा हा प्रकल्प कमी खर्चात व कमी वेळेत उभारला. केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार साहेबांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले. सन २००९ साली शासनाने ग्रेन बेस्ड डिस्टिलरी उभारणीचे धोरण जाहीर केले होते. खराब धान्य, पावसाने भिजलेले धान्य, काळी पडलेली ज्वारी, मका या धान्याला बाजारात ग्राहक नसल्याने शेतकरी अडचणीत येत होता. त्यामुळे शासनाने ग्रेन बेस्ड डिस्टिलरीचे धोरण जाहीर केले होते. या धोरणाचा अभ्यास करून प्रतिदिन ३० हजार लिटर उत्पादन क्षमतेची ग्रेन बेस्ड डिस्टिलरी उभारली. दिनांक २७ मार्च २००९ ला गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर भूमिपूजन करून या संकल्पाची गुढी आम्ही उभारली. दिनांक २४ मे २०१० रोजी समाजातील चाळीस मान्यवरांच्या हस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन केले. वेगवेगळ्या क्षेत्रांत आपले भरीव योगदान देणाऱ्या समाज बांधवांच्या हस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन केले.

गेल्या १०-२० वर्षांत साखर उद्योगात अनेक चढ-उतार आले. बरेच कारखाने आर्थिक


संकटात आले. मात्र दि सासवड माळी शुगर फॅक्टरीचा प्रगतीचा आलेख उंचावतच गेला आहे. दुष्काळ, पाणीटंचाई या काळात अनेक कारखान्यांसमोर उसाचे संकट उभे राहिले होते. मात्र माळीनगर कारखान्यावर वर्षानुवर्षे विश्वास असणाऱ्या शेतकऱ्यांनी या कारखान्याला कधी ऊस कमी पडू दिला नाही. अतिरिक्त उसाचा प्रश्न उभा राहिला होता, त्या वेळी काही कारखान्यांनी अनेक शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून दिले होते. तुमच्या उसाचे विल्हेवाट कशी लावायची ते तुम्हीच ठरवा असे सांगून हात झटकले होते. माळीनगर कारखान्याने आपल्या सर्व सभासदांचा ऊस गाळलाच पण त्याच वेळी अडचणीत आलेल्या इतर कारखान्यांच्या शेतकऱ्यांचा ऊस गाळप करायलासुद्धा मदत केली. त्यामुळे ऊस टंचाईच्या काळात हे शेतकरी आमच्या सोबत राहिले. त्यामुळे विश्वासाचे हे नाते अजून घट्ट होत गेले आहे.

ग्रेन बेस्ड डिस्टिलरीनंतर को-जन प्रकल्प उभारणीचा संकल्प करून तो आता पूर्णत्वास नेला आहे. केंद्रीय कृषिमंत्री श्री. शरद पवार साहेबांच्या हस्ते त्याचे उद्घाटन होत आहे. हा प्रकल्प उभा करताना खूप अडचणी आल्या हे नजरेआड करता येणार नाही. त्या सगळ्यावर मात करीत हा प्रकल्प पूर्णत्वास गेला आहे. या प्रकल्प उभारणीच्या कामात खूप विचित्र अनुभव आले हेसुद्धा सांगितले पाहिजे. कारण एखादा प्रकल्प उभारताना कशा अडचणी येतात हेदेखील कळले पाहिजे. आव्हाने कितीही मोठी असली, अडचणी असल्या तरी त्यावर मात करून ध्येयपूर्ती करता येतेच हेदेखील कळावे हा त्यामागचा माझा हेतू आहे. पण एक गोष्ट मात्र नक्की आहे की, आपला दृष्टिकोन सकारात्मक असेल, स्वतःवर विश्वास असेल आणि हेतू निःस्वार्थ असेल तर हाती घेतलेले काम तडीस जातेच. निःस्वार्थी वृत्तीत खूप मोठी ताकद आहे. ही ताकद वृत्तीतून प्राप्त होत असते. सतत आपले आणि इतरांचेही चांगले चिंतित गेलो की त्याचे फळ मिळाल्याशिवाय राहत नाही. मग अशा कामात कितीही अडथळे येऊ द्या, अडचणी येऊ द्या ते काम पूर्णत्वाला जातेच. को-जन प्रकल्प उभारणीच्या कामात आलेल्या सर्व आव्हानात्मक टेकड्यांची सपाट मैदाने करीत आम्ही पुढे गेलो. त्याबाबत कधीच खंत मानली नाही. अडचणी आल्याने कधी निराश झालो नाही. बेचैन झालो नाही. मनाची अस्वस्थता कधीच वाढली नाही. सर्व अडथळे पार करीत हा प्रकल्प पूर्णत्वास गेलाचा हा आनंद अवर्णनीय आणि शब्दांच्या पलीकडचा आहे. सगळे अडथळे पार करीत ११ महिन्यांत हा प्रकल्प पूर्ण झाला आहे. जर सर्व अनुकूलता असती आणि विना अडथळ्याचा मार्ग असता तर असे वाटते की हा प्रकल्प कमी वेळेत व कमी खर्चात झालाच नसता.

सहवीजनिर्मिती प्रकल्प उभारताना अनंत अडचणींना सामोरे जावे लागले. आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा विविध स्तरावरच्या या अडचणी होत्या. आभाळभर अडचणी आल्या तरी त्यावर मात करून आम्ही हा प्रकल्प पूर्ण केला आहे. मात्र या अडचणींनी आम्ही कधी बेचैन झालो नाही तर अडचणी सोडविण्यातला

आनंद उपभोगत गेलो. हा आनंद शब्दांच्या पलीकडचा आहे. आमच्या पुर्वजांनी अतिशय प्रतिकुल परिस्थीतीवर मात करून कारखाना उभारला. त्यासाठी तहान-भूक विसरून रात्रंदिवस कष्ट घेतले. आपल्या स्वप्नातील ध्येयाची पूर्तता केली. त्यामुळेच आज हे सारे वैभव दिसत आहे. पुर्वजांच्या कर्तृत्वसंपन्न इतिहासातूनच प्रेरणा घेऊन आम्ही मंडळी काम करीत आहोत. त्यामुळे आम्ही अडचणींची तमा कधीच बाळगलेली नाही. आमच्यासाठी आणि पुढच्या पिढ्यांसाठी त्यांनी हे साम्राज्य उभे केले होते. त्यामुळेच आम्ही पुढे गतीने वाटचाल करू शकलो.  केवळ अकरा महिन्यात को-जन प्रकल्प उभा राहिला आहे. चेअरमन श्री कृष्णकांत शंकरराव कुदळे, व्हा. चेअरमन श्री विलास दामोदर इनामके, होलटाईम डायरेक्टर श्री वसंतराव मल्हारी ताम्हाणे, संचालक मंडळातील सर्व सहकारी, माजी मॅनेजिंग डायरेक्टर श्री. विजयकांत शंकरराव कुदळे, सभासद, शेतकरी, कामगार व नागरिकांचे यांचे या कामात मला खूप चांगले सहकार्य मिळाले आहे. गहिनीनाथ महाराज, शंकर महाराज यांचा कृपाशिर्वाद, सर्व सहकाऱ्यांचा पाठिंबा आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर आम्ही कमी वेळेत व कमी खर्चात हा प्रकल्प पूर्ण केला आहे. याचा आनंद आणि अभिमान आहे.

आज माळीनगरमध्ये सर्व सोयी सुविधांची उपलब्धता आहे. शेतकरी, कामगार आणि नागरिकांच्या सर्व गरजा लक्षात घेऊन सर्व प्रकारच्या सुविधा कारखान्याच्या माध्यमातून निर्माण केल्या आहेत. गुणवत्ता प्रधान शिक्षणसंस्था, सर्व प्रकारच्या खेळांची मैदाने, शॉपींग मॉल्स, भाजी बाजार, स्वच्छ आणि प्रशस्त रस्ते, आणि जाणीवपूर्वक सर्व परिसरात फुलविलेल्या झाडा वेलींनी माळीनगरच्या सौंदर्यात भर घातली आहे. माळीनगरचा आर्थिक स्तर उंचावल्याने पतसंस्था, बँका अशा वित्तीय संस्थांचे जाळे निर्माण झाले आहे. इथल्या विशाल क्रिडांगणावर महाराष्ट्र विरूध्द गुजरात हा रणजी ट्रॉफीचा क्रिकेटचा सामना झाला होता. याच मैदानावर सायकल पोलोच्या राष्ट्रीय स्पर्धा पार पडल्या आहेत. दरवर्षी होणा-या माळीनगर फेस्टीव्हलने या परिसरातील नागरिकांमध्ये आपुलकीची भावना वाढीला लावायला मोठी मदत केली आहे. शैक्षणिक संस्थातील मुलांनी शालेय गुणवत्ते बरोबरच कला, क्रीडा क्षेत्रातही उज्वल कामगिरी केली आहे. अनेक खेळात माळीनगरच्या मुलांनी राष्ट्रीय स्तरावरील यश खेचून आणले आहे. रामदेव बाबांचे ग्रामीण भागातील पहिले प्राणायाम मार्गदर्शन शिबीर सुध्दा माळीनगरलाच झाले आहे. मुलांमध्ये धाडसीवृत्ती वाढीला लावण्याचे काम कमांडो शिबीराच्या माध्यमातून झाले आहे. नावलौकीक कमावलेली शिक्षणसंस्था, निष्ठेने काम करणारे शिक्षक, शिस्तप्रिय विद्यार्थी, शेतकरी व कामगार हिताला प्राधान्य देणारा कारखाना, कारखान्यावर निस्सीम प्रेम करणारे सभासद शेतकरी, प्रामाणिक कामगार आणि पालकत्वाच्या भुमिकेतून कार्यरत असलेले संचालक मंडळ हे माळीनगरचे भूषण आहे.  या बळावरच माळीनगरमध्ये दृष्ट लागावी असा एकोपा आहे. सर्व धर्म समभाव आहे.




केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते मोलॅसीस बेस्ड डिस्टीलरीचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी डावीकडून संजय गिरमे, सुनिल बोरावके, वसंतराव ताम्हाणे,राजेंद्र गो. गिरमे, विजयकांत कुदळे, अरविंद जाधव, हरीभाऊ भोंगळे, नामदार विजयसिंह मोहिते पाटील, विजयराव बोरावके, विजयराव गिरमे, वसंतराव राऊत, कमलताई ढोले पाटील, नामदार जयवंतराव पाटील, अरूणराव पांढरे.

आम्ही अंधश्रध्दा निर्मूलनाचे काम केले आहे आणि त्याच बरोबर परिसरातील देव देवतांच्या मंदिरांच्या जिर्णोध्दाराचे काम करून सामाजिक श्रध्दांचा ही आदर केला आहे. सर्वांच्या सहकार्याने आज माळीनगरला सर्वांग सुंदरतेचे रूप प्राप्त झाले आहे. याचा आनंद आणि अभिमानही आहे. शतकपूर्तीकडे जात असताना हा वारसा अजून समृध्द करण्याचा आमचा निर्धार आहे.

आमच्या पूर्वजांनी जी संस्कृती रुजवली त्यापासून प्रेरणा घेत आम्ही काम करीत आहोत. हे करताना आता पुढच्या पिढीसाठी काहीतरी प्रेरणादायी निर्माण करण्याची जबाबदारी आमच्यावरती आहे याची जाणीव ठेवून जास्तीत जास्त गतीने काम करण्याचा प्रयत्न करीत आहोत. कोणत्याही कामात पूर्णपणे झोकून दिले, आपल्या पूर्ण क्षमतेचा वापर केला आणि निःस्वार्थी हेतू असला की हाती घेतलेल्या कामात यश मिळतेच हा सिद्धांत प्रमाण मानून आमची वाटचाल सुरू आहे. पुन्हा आणखी नव्या निर्माणासाठी, उद्याच्या तरुण पिढीसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी.

***

# अष्टदशकपूर्तीचा आनंद आणि अभिमान



**श्री. कृष्णकांत कुदळे**
चेअरमन
दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर
**मोबा. ९८२३०६८६२०**

पुणे जिल्ह्याच्या सासवड या गावच्या परिसरातील काही मंडळी बारामती, कोपरगांव, श्रीरामपूर, बावडा आदी ठिकाणी बागायती शेती करावयास गेली. नंतर त्यांनी अकलूज जि. सोलापूर परिसरात ५ हजाराच्यावर एकर जमीन खंडाने व काही मालकीने घेऊन माळीनगर या ठिकाणी दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि; हा साखर कारखाना १९३२ साली स्थापन केला. या कारखान्याची मशिनरी लिव्हरपूल इंग्लंड या देशातून आयात केली होती व १९३३-३४ साली पहिले साखरेचे पोते कारखान्यातून बाहेर पडले. एक इतिहास निर्माण झाला. अत्यंत कमी शिकलेल्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन त्यांच्याच खाजगी मालकीचा व सहकार तत्वाचा स्विकार करून स्वत: ऊस पिकवून सुरू केलेला हा कारखाना सर्व भारतात साखर कारखानदारीत एक नवी दिशा देऊन गेला. त्याचाच आदर्श घेऊन खाजगी कारखाने सहकारी तत्वाचा फक्त आधार घेऊन मोठ्या प्रमाणात सध्या सुरू होऊ लागले आहेत. त्याची मुहूर्तमेढ ८० वर्षापूर्वी या कारखान्याने रोवली परंतु हा इतिहास समाजापुढे पाहिजे तेवढा प्रकर्षाने आलेला नाही. दूरदृष्टी दाखवून दि सासवड माळी शुगर फॅक्टरीने हा प्रयोग केला आहे.

हा साखर कारखाना उभारण्यात व तो यशस्वी करण्यात जे संस्थापक संचालक होते त्यात कै. हरिभाऊ गिरमे, कै. नानासाहेब पांढरे, कै. रा. ब. नारायणराव बोरावके, कै. शंकरराव राऊत, कै. भगवंतराव गिरमे, कै. गणपतराव रासकर, कै. शंकरराव इनामके, कै. शंकरराव कुदळे, कै. रघुनाथराव इनामके, कै. बापू राघू बोरावके,कै. नारायण राघू गिरमे, कै. सोपानराव बापू गिरमे, कै. कृष्णाजी बोरावके व कै. रामचंद्र भगवंतराव गिरमे आदींचा मोलाचा सहभाग होता. त्यांना दिशा देण्याचे काम प्रथमत: कै. हणमंतराव गिरमे यांनी केले.

१८ नोव्हेंबर १९५९ या दिवशी संस्थेचा रौप्यमहोत्सव मोठ्या दिमाखात पार पडला. त्यावेळचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण त्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. त्यावेळी त्यांची बैलगाडीच्या रथातून मिरवणूक काढण्यात आली होती. या रौप्यमहोत्सवी सोहळ्यात बोलताना कै. यशवंतराव चव्हाण म्हणाले होते. 'शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी चालविलेला शेतकऱ्यांच्या मालकीचा सहकारी तत्वावरचा हा अशिया खंडातील पहिला साखर कारखाना आहे.' हे सांगण्यात मला मोठा अभिमान




मोलॅसीस बेस्ड डिस्टीलरीच्या उद्घाटन समारंभात मार्गदर्शन करताना केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री. शरदराव पवार साहेब.

वाटतो. गिरमे, बोरावके आदिंनी महाराष्ट्राला बागायती शेती करण्यास शिकवले. इतिहास या गोष्टींची नोंद घेतल्याशिवाय राहणार नाही.

१९४५ साली या मंडळींनी व पुण्यातील कै. गणेश हरी उर्फ दादासाहेब दरोडे, कै. दादासाहेब कुदळे आणि कै. तुकाराम गिरमे यांच्या सहकार्याने 'क्षत्रिय माळी शिक्षण संस्था' ही विश्वस्त संस्था स्थापन केली. सध्याचे या संस्थेचे नाव 'अखिल भारतीय माळी शिक्षण संस्था' असे आहे. तिचे कार्यालय सध्या 'हॉटेल सेंट्रल पार्क डेक्कन जिमखाना पुणे' येथे आहे. या संस्थेला ६७ वर्षे पूर्ण झाली आहेत. उच्च शिक्षण घेणाऱ्या समाजातील गरजू विद्यार्थ्यांना कर्जाऊ शिष्यवृत्ती देऊन शिक्षणासाठी मदत करण्यास सुरूवात केली. सर्व मंडळी अत्यंत कमी शिकलेली असून सुध्दा त्यांनी शिक्षणाचे महत्व ओळखून ही शैक्षणिक संस्था स्थापन केली व ती आजअखेर जोमाने सुरू आहे. या संस्थेची शिष्यवृत्ती घेणाऱ्यांमध्ये माजी उपमुख्यमंत्री मा. छगनरावजी भुजबळ, माजी खासदार श्री. जनार्दन वाघमारे, माजी राज्यमंत्री

रजनीताई सातव, माजी विधान परिषद सभापती प्रा. ना. स. फरांदे, प्रा. सदाशिव माळी आदिंचा समावेश आहे.

१९४५ साली माळीनगर येथे 'दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटी माळीनगर' ही शैक्षणिक संस्था स्थापन करून प्राथमिक शाळा, मॉडेल विविधांगी प्रशाला, ज्युनियर कॉलेज, गुलमोहर इंग्लिश स्कूल, आय.टी.आय. आदि शैक्षणिक उपक्रम सुरू केले आहेत व लवकरच सायन्स, आटर्स व कॉमर्स सिनियर कॉलेज सुरू होत आहे. माळीनगर परिसर मुळातच सुंदर होता परंतु तो आता जास्त हिरवागार झालेला दिसतो, शॉपिंग सेंटर, सावित्री उद्यान, सुंदर रस्ते आदिंची भर पडल्यामुळे या भागात आलेली कोणतीही व्यक्ती प्रसन्नचित्त होते.

१९८३ साली दि सासवड माळी शुगर फॅक्टरीचा सुवर्ण महोत्सव झाला. त्या कार्यक्रमास सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे त्यावेळेचे चेअरमन, मॅनेजिंग डायरेक्टर श्री. बी. व्हि. सोनाळकरसाहेब आले होते. त्यावेळी जे संस्थापक मंडळ हयात होते त्यात कै. शंकरराव कुदळे, कै. शंकरराव राऊत, कै. नारायण राघू गिरमे यांचा समावेश होता. त्यांचा सत्कार त्यावेळी करण्यात आला होता व एक सुंदर स्मरणिकाही काढण्यात आली होती.

त्यानंतर १९९३ साली नूतन साखर कारखाना सुरू करण्यात आला. त्याची गाळप क्षमता १७५० मेट्रिक टनापर्यंत वाढविण्यात आली. ज्येष्ठ कृषितज्ज्ञ डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या हस्ते नवीन कारखान्याचा गळीत हंगाम दि १ नोव्हेंबर १९९३ रोजी सुरू करण्यात आला व त्याचा सांगता समारंभ १९९४ साली मा. श्री. शरद पवारसाहेब यांच्या हस्ते झाला. सध्या त्याची गाळप क्षमता ३२०० मे. टनाच्या पुढे आहे. त्यानंतर दि. २३ जून २००६ रोजी मोलॅसिस बेस्ड डिस्टिलरी सुरू करण्यात आली त्याचे उद्घाटन त्यावेळी भारताचे केंद्रीय कृषीमंत्री ना. शरदचंद्रजी पवार यांचे हस्ते झाले. पुढे २३ मार्च २००८ पासून ३०,००० एलपीडी क्षमतेचा इथेनॉल प्रकल्प सुरू केला गेला.

दि. २४ मार्च २०१० पासून ३०,००० हजार लिटर्स क्षमतेचा धान्याधारीत डिस्टिलरी प्रकल्प चालू केला त्याचे उद्घाटन समाजातील ४० मान्यवर उद्योगपतींच्या हस्ते करण्यात आले व आता २०१३ मध्ये १४.८ मेगावॅट क्षमतेचा सहवीज निर्मितीचा ९० कोटींचा प्रकल्प कार्यान्वित होत आहे. व संस्थेला पण ८० वर्षे पूर्ण झालेली आहेत. त्याचा अष्टदशकपूर्ती सोहळा दि. १० नोव्हेंबर २०१३ रोजी साजरा करण्यात येत आहे.

सर्व माळीनगर परिसराचा विकास होण्यासाठी येथे जागृत देवस्थान असलेल्या श्री गहिनीनाथ महाराज व श्री शंकर महाराज यांचे आशीर्वाद आहेत. माळीनगरच्या ऑफिसच्या आवारात संतश्रेष्ठ श्री सावतामहाराज यांची मूर्ती आहे. ती सदैव आम्हाला 'देव कामातच पहावा' असे स्मरण देते. गेस्ट हाऊस जवळील महात्मा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे अर्धपुतळे समतेचा संदेश आणि स्त्री शिक्षणाचे महत्त्व विषद करतात. अनेक वर्षे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून असलेले संस्थेचे शिल्पकार व संस्थापक संचालकांपैकी एक असलेले कै. हरिभाऊ गिरमे

यांची समाधी व पूर्णाकृती पुतळा हा 'आम्ही केले ते जपून ठेवा अथवा त्यात वाढ करा' असा संदेश देतो. ही सर्व दैवते माळीनगरवासियांची प्रेरणास्थाने आहेत. संस्थेचे सभासद हे जिज्ञासु, अभ्यासु, आपल्या शेतीवर व संस्थेवर निष्ठा असणारे आहेत. संस्थेचा विकास किंवा नवीन प्रकल्प सुरू करण्यास त्यांचा नेहमीच सहकार्याचा हात असतो. स्टाफ व कामगारांचे सहकार्य तर नेहमीच असते. तसेच ऊस पिकविणारे बिगर सभासद हे आमचे महत्वाचे आधार आहेत.

संस्थापकांनी संस्था भरभराटीस आणली व नंतर पुढील पिढीतील श्री. प्रदीप भगवंतराव जाधव, श्री. विजयकांत शंकरराव गिरमे, श्री. अरूणराव अनंतराव पांढरे, श्री. विजयकांत शंकरराव कुदळे व श्री. अरविंद एकनाथराव जाधव या माजी मॅनेजिंग डायरेक्टर्स व त्यांच्या सहकाऱ्यांचा विकास करण्यात मोठा हातभार आहे. सध्या मॅनेजिंग डायरेक्टर असलेले श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे यांनीही संस्था आणखी प्रगतीपथावर नेण्यास मोठाच हातभार लावला आहे. माळीनगर हे सर्वांगसुंदर व्हावे म्हणून ते सदैव प्रयत्नशील असतात.

संस्थेच्या मालकीचे पुण्यातील डेक्कन जिमखान्याच्या ठिकाणी 'हॉटेल सेंट्रल पार्क' आहे. ती जागा दीड एकर आहे व तेथे लवकरच सुंदर प्रकल्प उभा करणे हा संस्थेच्या प्रगतीतील पुढचा टप्पा आहे. ते स्वप्नही लवकरच प्रत्यक्षात येईल.

मूळ संस्थेशिवाय शुगरकेन प्रोड्युसर्स विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, महात्मा फुले पतसंस्था,माळीनगर विकास मंडळ, शेतकरी जागरण मंच, सावित्रीबाई फुले गृहउद्योग, महिला मंडळ या वेगवेगळ्या संस्था माळीनगरच्या प्रगतीत मोलाचा हातभार लावतात. माळीनगर फेस्टिव्हल हे तर माळीनगरचे आकर्षण झाले आहे.

आमचे वडील कै. शंकरराव कुदळे हे २३ वर्षे संस्थापक संचालक होते. परंतु कारखान्याच्या रौप्य महोत्सव सोहळ्याच्यावेळी ते संचालक पदावर नसल्यामुळे त्यांना संचालक म्हणून सहभाग घेता आला नाही. सुवर्णमहोत्सव सोहळ्याच्या वेळीही आमचे बंधू श्री. विजयकांत कुदळे संचालक नव्हते. ते पदाधिकारी असताना अमृत महोत्सव झाला नाही. ही उणीव भरून काढण्याची संधी या अष्टदशकपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने मला मिळाली आहे. मी चेअरमन असताना हा सोहळा होत आहे हे मी माझे भाग्य समजतो.

अष्टदशकपूर्ती सोहळा व सहवीज निर्मिती प्रकल्पाच्या उद्घाटनानिमित्ताने मा. ना. श्री. शरदचंद्रजी पवारसाहेब उद्घाटक म्हणून आहेत, त्याचबरोबर मा. ना. श्री. छगनराव भुजबळ, मा. ना. श्री. हर्षवर्धन पाटील, मा. ना. श्री. दिलीप सोपल, माजी उपमुख्यमंत्री श्री. विजयदादा मोहिते-पाटील, श्री. रामराजे निंबाळकर व अनेक आमदार हे सर्व पाहुणे म्हणून उपस्थित रहात आहेत हे आपणा सर्वांचे परमभाग्य आहे. आपल्या संस्थेच्या अडचणीच्या वेळी श्री. पवारसाहेब यांनी नेहमीच सहकार्य व मदत केली आहे. त्यांचे आशीर्वाद व प्रेम ही आमच्या दृष्टीने मोठी शिदोरी आहे ती शिदोरी घेऊनच आम्ही पुढील यशस्वी वाटचाल करू.

***

# उत्तम व्यवस्थापनाची घडी...



**श्री. प्रदीप भगवंतराव जाधव**
माजी मॅनेजिंग डायरेक्टर
दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर
**मो.नं. ९२२५९१८७८९**

आज कंपनी ८० वर्षांची वाटचाल पूर्ण करीत आहे ही विशेष आनंदाची बाब आहे. ब्रिटिश राजवटीत १९३२ साली रजिस्टर झालेल्या कंपनीच्या या प्रवासात अनेक स्थित्यंतरे झाली, अडचणी आल्या, त्यावर मात करून कंपनी आपले अस्तित्व टिकवून आहे, ही समाधानाची बाब आहे.

पूर्वजांनी जो भक्कम पाया आणि शेती व्यवसायाची घडी घालून दिली, त्याचा फायदा आजच्या सर्व सभासदांना होत आहे. यामध्ये सर्वांचे योगदान महत्त्वाचे आहे.

मला तरुणपणी कंपनीच्या संचालक मंडळात काम करण्याची संधी मिळाली व मी सभासदांच्या हितासाठी झटण्यास ती कारणी लावली. वयाच्या ३१ व्या वर्षी म्हणजे १९७६ साली मी संचालक झालो, त्या वेळी साखर कारखाना सहकारी झाला होता. कंपनीकडे फक्त इरिगेशन, ट्रॅक्टर, पेट्रोल पंप व पुण्याचे एम जे होस्टेल एवढीच खाती होती. एकूण ८८ कर्मचारी होते. १९७८ साली मॅनेजिंग डायरेक्टरपदाची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली, त्या वेळी माझे वय ३३ वर्षे होते. त्या वेळी कंपनीला उत्पन्नाचे साधन नव्हते, कारण सहकारी कारखान्याकडून दर वर्षाचे रु. ६ लाख मिळणारे भाडे वेळेवर मिळत नव्हते. त्यांनी ते तीन वर्षे थकविले. त्या काळात कंपनीचे बुलडोझर पुण्याच्या टेल्को कंपनीत भाड्याने लावून कामगारांचा पगार व इतर खर्च भागविले. जमिनीचे प्रश्न निर्माण झाले कारण भाडेपट्ट्याच्या मुदती संपल्या होत्या. सरकारकडून त्या १० वर्षांकरिता वाढवून घेतल्या. कंपनीने साखर धंदा बंद केल्यामुळे जमिनी परत कराव्यात, अशी जोराची मागणी जमीन मालकांची होती. शासन-दरबारी पोटकुळाची बाजू प्रभावीपणे मांडून ८ फेब्रुवारी १९७८ नोटिफिकेशन अस्तित्वात आणले व पोटकुळांना संरक्षण प्राप्त करून दिले. जमीन मालकांनी हे ७८ चे नोटिफिकेशन हायकोर्ट नंतर सुप्रीम कोर्टापर्यंत चॅलेंज केले. शेवटी १९९७ साली सुप्रीम कोर्टाने पोटकुळाच्या बाजूने निर्णय दिला.

१९८० साली सहकारी कारखाना बंद पडला, तो शासनाशी भांडून व राजकीय विरोधातून मार्ग काढून १ ऑगस्ट १९८१ साली कारखाना ताब्यात घेतला. सुरुवातीला शासनाने फक्त तीन वर्षांकरिता कारखाना दिला. त्या तीन



कारखान्याच्या सेंट्रल ऑफीसची इमारत.

वर्षांत यशस्वीपणे कारखाना चालवून कामगारांचे, ऊस उत्पादकांचे प्रश्न हाताळल्यामुळे कायमस्वरूपाने कारखाना कंपनीकडे आला.

सुरुवातीला अनंत अडचणी आल्या. कंपनीकडे फक्त २ लाख रुपये भांडवल होते. त्या वेळी बकाऊ-वूल्फ कंपनीचे शेअर्स संपदा बँकेकडे गहाण ठेवून ५ लाख रुपये कर्ज मिळविले मशिनरी जुनी झाली होती. सहकारीच्या काळात बँकेत व गेटकेनमध्ये कंपनीची पत कमी झाली होती. कंपनीला कोणी माल उधारीवर देत नव्हते. कामगारांनी व अधिकाऱ्यांनी संपूर्ण योगदान देऊन हंगाम यशस्वी करुन दाखविला त्याचे श्रेय त्यांनाच आहे.

१९८३ साली कारखान्याचा 'सुवर्णमहोत्सव' दिनांक ७ जानेवारी १९८३ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सेंट्रल ऑफिसच्या वरच्या मजल्याचे नूतनीकरण करण्यात आले. पूर्वीच्या बोर्डरूमला 'गोल्डन ज्युबिली हॉल' असे नाव देण्यात आले. बाजूला भव्य असे अकौंट ऑफिस झाले. कंपनीच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त दिनांक २४/५/१९८३ रोजी सर्वधर्मीय मोफत सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. त्या वेळी एकूण ३२ विवाह झाले.

१९८५ साली माळीनगर ग्रामपंचायत झाली, त्या वेळी गावठाण नव्हते, त्यामुळे त्यांनी कंपनीच्या राख टाकण्याच्या नदीच्या किनाऱ्याची



२९ मार्च १९८७ रोजी पुणे येथील हॉटेल सेंट्रल पार्कच्या उद्घाटन समारंभात भाषण करताना सकाळचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री प्रतापराव पवार. यावेळी डावीकडून प्रदीप जाधव, उल्हास ढोले पाटील, विजयसिंह मोहिते पाटील, ज. नि. गिरमे

२७ एकर जागा गावठाणासाठी मागणी केली. ती जागा वाचविण्यासाठी सामाशु ॲग्रोची स्थापना केली व पोल्ट्री स्थापन केली, त्यामुळे आज २७ एकर जागा कंपनीकडे राहिली.

कंपनीचे पुण्यामध्ये महात्मा फुले विद्यार्थी वसतिगृह होते. पुण्यामध्ये बऱ्याच कॉलेजेसने वसतिगृहाची सोय केली. कारखान्यास उत्पन्न वाढावे म्हणून १९८७ साली या जागेमध्ये हॉटेल सेंट्रल पार्क सुरू केले. सकाळ समूहाचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. प्रतापराव पवार यांच्या शुभहस्ते दिनांक २९/३/१९८७ रोजी हॉटेल सेंट्रल पार्कचे उद्घाटन झाले. कारखान्याची आर्थिक घडी बसविली. त्यामुळे कारखान्याला पुढील प्रोजेक्ट करता आले. हे काम करीत असताना सर्व संचालकांची मला मोलाची साथ मिळाली.

मॅनेजिंग डायरेक्टरपदाची जबाबदारी मी १० वर्षे सांभाळली. पुढे १९९३ साली नवीन प्लॅन्ट उभारला गेला. डिस्टिलरी प्रपोजल कार्यान्वित झाल्यामुळे कंपनीला चांगले उत्पन्न मिळाले, स्थिरता आली आणि आता को-जन प्रकल्प उभारला आहे. काळाच्या ओघात सहउत्पदनाची निर्मिती करणे अपरिहार्य झाले आहे. त्याचबरोबर सेंट्रल पार्कची डेव्हलपमेंट करण्याचा संकल्पही लवकरच पूर्णत्वास जाण्याचीही गरज आहे. कंपनीच्या पुढील वाटचालीस माझ्या शुभेच्छा.

***

# नव्या कारखान्यामुळे नवचैतन्य



**श्री. अरूण अनंतराव पांढरे**
माजी मॅनेजिंग डायरेक्टर
दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर
**मो.नं. ९७६३००३६७७**

नोव्हेंबर १९८९ साली मॅनेजिंग डायरेक्टरच्या पदासाठी नियुक्ती झाली. त्या वेळी शुगर फॅक्टरीचा १००० टनांचा जुना प्लॅन्ट होता. त्याची वर्किंग कपॅसिटी केव्हाच संपली होती. त्यामुळे ओव्हरहेड खर्च खूप वाढलेले होते. या जादा खर्चामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव देता येत नाही, असे मॅनेजमेंटला वाटत होते. नवीन कारखाना व्हावा ही बोर्ड ऑफ डायरेक्टर्स व सर्व  सभासदांची इच्छा होती. परंतु भांडवलाचा मोठा प्रश्न होता. उजनी धरण व कॅनॉल नुकतेच चालू झाले होते, त्यामुळे भविष्यात ऊस वाढणार याचीही मॅनेजमेंटला कल्पना होती.

भारत सरकारच्या आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये जुन्या साखर कारखान्यांना री-स्ट्रक्चरिंगसाठी आर्थिक मदत देण्याचे धोरण जाहीर झाले. त्या संपत कमिटी बेनिफिटमध्ये अर्ज केल्यापासून तीन वर्षांत कारखाना उभा केल्यास शंभर टक्के साखर आठ वर्षांसाठी खुल्या बाजारात विकण्यास परवानगी होती, त्याचा जास्तीत जास्त  फायदा कसा उठवायचा या बाबतीत आपले ऑडिटर्स श्री. प्रसन्न जोशी व कै. मुरारी यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक प्रस्ताव तयार करण्यात आला.

प्रपोजल घेऊन या असा प्रस्ताव आला. कंपनीकडे त्या वेळी फक्त १५ लाख रुपयांचे रिझर्व होते. कारखाना जास्त कार्यक्षमतेने चालवून सर्व तऱ्हेच्या काटकसरी करून रिझर्व एक कोटी वीस लाखांपर्यंत नेले. त्यानंतर दिल्लीच्या प्रस्तावामध्ये कंपनीचे रिझर्व एक कोटी वीस लाख रुपये अधिक दाखवण्यात आले आणि नवीन कारखान्यासाठी प्रस्ताव दाखल करण्यात आला, नंतर मॅनेजमेंटने नवीन शुगर मशिनरी प्लॅन्ट घेण्यासाठी हालचाली सुरू केल्या, त्यासाठी अनेक शुगर मशिनरी पुरवठा करणाऱ्या कंपन्यांचे प्रस्ताव कंपनीकडे दाखल झाले. त्यानंतर मशिनरी कुठली घ्यायची त्याची योग्य किंमत किती असावी या दृष्टीतून बोर्डाने प्रत्येक शुगर मशिनरी उत्पादक कंपनीला पुण्यामध्ये मीटिंगसाठी बोलावण्यास सुरुवात केली, सर्व कंपन्यांबरोबर अनेक वेळा बैठका झाल्या आणि बकाऊ-वुल्फ आताच्या थायसन क्रुप कंपनीला ऑर्डर देण्यात आली. कंपनीला IFCI, IDBI, ICICI या वित्तीय संस्थांकडून दहा कोटी पंचवीस लाख रुपये आणि SDF (शुगर डेव्हलपमेंट फंड) कडून सात कोटी सॉफ्ट लोन मंजूर झाले. IFCI चे



नवीन साखर कारखाना



नवीन कारखान्यातील साखर निर्मितीचा आनंदः डावीकडून अरविंद जाधव, प्रदीप जाधव, अरूण पांढरे, विजयकांत कुदळे.



गळीत हंगाम प्रसंगी डावीकडून राजेंद्र गोपाळराव गिरमे, विजयराव सिताराम रासकर आणि सौ. रासकर, विजयकांत कुदळे,
गजानन इनामके, अरूण पांढरे, मधुकर शिवरकर, दिगंबर गिरमे, अरविंद जाधव आदी मान्यवर.



जगदगुरू तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारक-यांना कापडी पिशव्याचे वाटप करताना डावीकडून राहुल गिरमे,
शरद बोरावके, अनिल रासकर, सुनिल बोरावके, अरूण पांढरे, विजयकांत कुदळे.




नवीन साखर कारखान्याच्या गळीत हंगाम समारंभाच्या वेळी बोलताना पद्मश्री अप्पासाहेब पवार.
यावेळी डावीकडून - वसंतराव राऊत, अरविंद जाधव, अरूणराव पांढरे, विनायकराव पाटील.

अधिकारी यांनी माळीनगरला येऊन सर्व्हे केला. कंपनीचा आर्थिक अभ्यास केला आणि कामास सुरुवात झाली. त्याप्रमाणे नऊ महिन्यांत नवीन प्लॅन्ट उभा करून १९९३ - १९९४ चा ट्रायल सीझन घेण्यात आला. त्या वर्षी १,८५,००० टन उसाचे क्रशिंग झाले. त्यानंतर जास्तीत जास्त ऊस कसा उपलब्ध करायचा याचे शेती खात्याला आवाहन करण्यात आले. नवीन कारखान्यामध्ये त्या वेळच्या नॉर्म प्रमाणे हाय प्रेशर बॉयलर व नवीन मशिनरी यांबाबत कामगारांना उत्सुकता होती आणि त्यांनीसुद्धा अत्यंत कार्यक्षमतेने काम करून कमीत कमी स्टॉपेजेसने कारखाना कसा चालवता येईल हा प्रत्येक खातेप्रमुख पाहत होता. नवीन कारखान्यासाठी आपल्याला ४ ते ५ लाख टन उसाची गरज भासणार होती त्यामुळे शेती खात्याने माढा, इंदापूर आणि माळशिरस या भागामधून ऊस कसा येईल या दृष्टीतून ते प्रयत्नशील होते. सन १९९२-१९९३-१९९४ च्या दरम्यान अनेक शेतकऱ्यांशी दहा वर्षांचे ऊस पुरवठा करार करून बांधिलकी निर्माण केली, शेतकऱ्यांकडे जमिनी होत्या परंतु त्याला लेव्हल नव्हती, पाणी होते तर पाइपलाइन नव्हत्या. ऊस लागणीनंतर त्यांना खत नव्हते. त्या वेळी कंपनीने शेतकऱ्यांना फार मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करून ऊस वाढविण्याचा सतत प्रयत्न चालू होता. शेतकऱ्यांना कंपनीकडून आर्थिक मदत मिळाल्यामुळे हजारो शेतकरी आपआपल्या शेतावर अत्यंत उत्साहाने कामाला



गोदामातील साखरपोती.

लागले. माळीनगर कारखान्याकडून आपल्याला ही मदत मिळते याचा त्यांना फार मोठा दिलासा वाटे. त्यामुळे त्यांना कंपनीबद्दल आत्मीयता निर्माण झाली. प्रत्येकाचे ऊसाचे क्षेत्र वाढत चालले. त्यांची आर्थिक भरभराट होऊ लागली. माळीनगरला ऊस पुरवठा करणारी गावे समृद्ध होऊ लागली अशा तऱ्हेने शेतकऱ्याची प्रगती आणि ४ ते ५ लाख क्विंटल तयार होणारी साखर ही पूर्ण फ्री-सेल असल्यामुळे कंपनीची आर्थिक परिस्थिती झपाट्याने सुधारली गेली. आपण लोन रिपेमेंट फार जलद गतीने फेडत गेलो. त्याचबरोबर परिसराचा विकासपण आपण चालू केला. नवीन शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधण्यात आले. गावात नवचैतन्य निर्माण झाले. तसेच दहा वर्षांत कंपनी कधीही लॉसमध्ये चालली नाही. माझ्या मॅनेजिंग डायरेक्टरच्या काळामध्ये विजयकांतभाऊ कुदळे - होलटाईम डायरेक्टर व आबासाहेब जाधव यांचा या कामामध्ये सिंहाचा वाटा आहे. सर्व कर्मचारी आणि कामगार यांच्याशी चांगला सुसंवाद असल्यामुळे कामगार नेहमीच उत्स्फूर्तपणे आपली कामे करत असत.

माझ्या मॅनेजिंग डायरेक्टरच्या दहा वर्षांच्या काळामध्ये सर्व डायरेक्टर्स, सभासद, ऊस पुरवठा करणारे शेतकरी बांधव आणि कामगार यांचे सहकार्य मिळाल्यामुळे मी सर्वांचा ऋणी आहे. तसेच कंपनीच्या इथून पुढच्या वाटचालीस आणि नवीन प्रकल्पास माझ्या शुभेच्छा.

***

# दूरदृष्टी, धडाडी आणि अभ्यासवृत्ती



**श्री. विजयकांत शंकराव कुदळे**
माजी मॅनेजिंग डायरेक्टर
दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर
**मोबा. नं. ९८२२५०१६०६**

दि सासवड माळी शुगर फॅक्टरी या कारखान्याची स्थापना १९३२ साली होऊन १९३४ साली कारखाना सुरु झाला. अनेक साखर कारखाने काढले जातात. कारखाना उभारला आणि सुरू केला एवढेच या साखर कारखान्याविषयी नाही. याचा एक वेगळाच इतिहास आहे, नवीन कल्पनांची जोड आहे, अनेक अडचणींचा सामना आहे. अनेक संकाटांवर मात आहे. दूरदृष्टी आहे. अशा प्रकारे या कारखान्याचा इतिहास इतर साखर कारखान्यांना आणि शेतकरीबंधूंना दीपस्तंभ ठरणारा आहे.

जमिनीची व पाण्याची कमतरता यामुळे सासवड व त्याच्या आसपासच्या गावांतील शेतक-यांनी जमिनीच्या व पाण्याच्या शोधात स्थलांतर केले. पुणे-नगर-सोलापूर जिल्ह्यातील अनेक गावांत जाऊन शेती करू लागले. परंतु साखर कारखाना काढण्याच्या उद्देशाने पुन्हा ही सर्व मंडळी अकलूजला (माळीनगरला) एकत्र आली व त्यांनी सुमारे पाच हजार एकर जमिन, काही खरेदीने व काही भाडेपट्टयाने घेऊन उसाची लागण केली. कारखाना उभारणी सुरू झाली. या पाच हजार एकरांवर कंपनीचे वर्चस्व होते. म्हणजे आता ज्या प्रमाणे एस.ई.झेड. (स्पेशल इकॉनॉमी झोन) ची कल्पना आहे ती आमच्या वाडवडिलांनी ८० वर्षापुर्वीच अमलात आणली होती.

हा कारखाना कंपनी ॲक्टखाली रजिस्टर झालेला आहे. म्हणून या कारखान्यास खासगी कारखाना म्हणतात. त्यावेळी सहकारी कायदा १९०५ पासून अस्तित्वात असून सुद्धा त्यांनी कंपनी ॲक्ट खाली कारखाना रजिस्टर केला. त्यावेळी या लोकांनी दूरदृष्टीने घेतलेला निर्णय किती योग्य होता हे आज दिसते. कारण नंतर निघालेल्या सहकारी कारखान्यांपैकी कित्येक कारखाने आज बंद आहेत. काही आजारी आहेत तर काहींची विक्री झालेली आहे. ही सहकारी साखर कारखान्यांची अवस्था पाहिल्यावर त्या वेळी त्यांनी घेतलेला निर्णय किती योग्य होता हे दिसून येते. हा कारखाना खासगी कंपनीचे वेगळेपण आहे.

त्या वेळी साखर कारखाना उभा करण्यास जे संस्थापक व सभासद सहभागी होते. त्यांपैकी काही थोडेफार शिकलेले होते तर



शेतकरी जागरण मंचाच्या शिवारफेरी उपक्रमाअंतर्गत ऊस पीक व्यस्थापन चर्चेत सहभागी झालेले शेतकरी.

काही अंगठाबहाद्दर होते. शिक्षणाची अडचण त्यांना वेळोवेळी अनुभवास येत होती. म्हणून शेतात दिवसभर काम केल्यानंतर रात्री ज्या वेळी एकत्र जमत त्या वेळी जे शिकलेले होते ते न शिकलेल्यांना शिकवत होते. म्हणजे आता जी रात्रप्रशाला आहे त्याची सुरवात ८० वर्षापुर्वी आमच्या लोकांनी केली होती. आलेले सभासद आपल्या शेतावर गटागटाने राहिले होते. त्याच ठिकाणी त्यांच्या मुलांचे शिक्षणासाठी प्राथमिक शाळा काढल्या. म्हणजे आताची अंगणवाडीची कल्पना आहे तीच कल्पना त्या वेळच्या या शाळेमध्ये होती.


शिक्षणाचे महत्त्व जाणून प्राथमिक शाळेबरोबरच माळशिरस तालुक्यातील पहिले हायस्कूल माळीनगरला सुरू केले. कॉलेजची सोय नसल्यामुळे पुण्याला जावे लागत होते. तिथे विद्यार्थ्यांची राहण्याची सोय व्हावी म्हणून महात्मा फुले वसतिगृह काढले. आता त्या ठिकाणी 'हॉटेल सेंट्रल पार्क' आहे.

कंपनीकडे असलेल्या पाच हजार एकरांत पाणी देण्याची सोय कंपनीमार्फत केली जाते. आता जी शासनाची घनमापन पद्धतीने पाणी वाटप योजना आहे ती ८० वर्षापुर्वीच या कंपनीने अमलात आणली आहे. 'आम्ही केले त्यात वाढवा अथवा त्यासी जपून ठेवा' अशी आमच्या वाडवडिलांची इच्छा होती. त्याप्रमाणे पूर्वी २५० टनी असणाऱ्या कारखान्याचे नूतनीकरण व विस्तारीकरण करून आज दररोज ३२०० ते ३३०० मे.टन उसाचे गळीत होते. त्याप्रमाणे मोलॅसीस बेस डिस्टिलरी, ग्रेन बेस

डिस्टिलरी, बायोगॅस प्रकल्प, १४.८ सहवीज निर्मिती प्रकल्प असा विस्तार केलेला आहे. सोलापूर जिल्ह्यात, तालुक्यात नवीन कारखाने होत असूनसुद्धा या कारखान्याने सहा लाख टनांपर्यंत गाळप केले आहे.साखर कारखाना चालविताना पूर्वीपासून ते आजपर्यंतच्या पदाधिकाऱ्यांनी वेळोवेळी बदल करून योजना करून कारखाना नेहमीच प्रगतिपथावर नेला आहे. या कारखान्यातून निघणाऱ्या साखरेस बाजारपेठेत सासवड माळी एस-३० या साखरेस प्रमुख मागणी असायची. चांगल्या साखरेचा पुरस्कार स्वातंत्र्यापूर्वी आपणास मिळालेला आहे.

वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटच्या २००१ च्या रिपोर्टप्रमाणे सर्वांत कमी खर्चाचा कारखाना म्हणून दि सासवड माळी शुगर फॅक्टरीची नोंद झालेली आहे. साखर कारखान्यामध्ये क्रशिंग इतकेच रिकव्हरीला महत्त्व असते. आपली रिकव्हरी सरासरी १० च्या आसपास असायची ती वाढविण्याच्या दृष्टीने डायरेटर बोर्डाने तज्ज्ञाची मदत न घेता निकराचे प्रयत्न सुरू केले. त्या अंतर्गत जातवार ऊस लागण प्रोग्रॅम, तोडणी प्रोग्रॅम याची कटाक्षाने काळजी घेतली. पाच तालुक्यांतून साखर कारखान्यास ऊस येतो. या प्रत्येक विभागामये कोणत्या रिकव्हरीचा ऊस आहे, याची माहिती घेतली. त्याप्रमाणे तोडणी प्रोग्रॅम बनविला जातो. एवढेच नव्हे तर लांब अंतरावरून ऊस येत असल्यामुळे व केनयार्डमध्ये वाहने थांबत असल्याने उन्हाचा उसावर परिणाम होऊन रिकव्हरीत घट येत होती. त्यासाठी वाहनातील उसावर पाण्याचा फवारा मारून ऊस ताजा ठेवण्यासाठी प्रयत्न केले जात असत. वाहनावरील धूळ या पाण्यामुळे धुवून जायची. त्यामुळे चांगल्या उसाचे मिलवर क्रशिंग होत असे. या सर्वांचा परिणाम म्हणून सरासरी रिकव्हरी १२.२९ व दिवसाची जास्तीत जास्त रिकव्हरी १३.७३ पर्यंत आली आहे. केनडेव्हलपमेंट स्कीम व तज्ज्ञांचे मार्गदर्शन सभासदांना उपलब्ध करून दिल्यामुळे व ठिबक सिंचन, सुधारीत लागण पद्धत व खतांची मात्रा यांमुळे उसाचे टनेज वाढण्यास मदत होत असे. या प्रक्रियेत माझा सहभाग होता.

साखर कारखान्याचा कारभार पाहण्याबरोबरच सभासद हा शेतकरी आहे, त्याची उन्नती होण्यासाठी व अडी-अडचणी सोडविण्याकडे पदाधिकाऱ्यांचे लक्ष असते. बाजारामध्ये आपले स्वत:चे आडत दुकान नसल्यामुळे शेतमालाला योग्य भाव मिळत नव्हता. वजन योग्य मिळेल याची शाश्वती नव्हती. जादा आडत घेतली जात होती. सभासदांना ऊस, भुसारपिके यासाठी कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी आपली स्वत:ची एक संस्था असावी म्हणून शुगरकेन प्रोड्युसर्स विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची स्थापना झाली. या संस्थेत २ वेळा चेअरमन होण्याची संधी मला मिळाली. या संस्थेमार्फत



१९५५ साली डेक्कन शुगर टेक्नालॉजिस्ट असेसिएनचे १२ वे अधिवेशन माळीनगर येथे पार पडले. या अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी केंद्रीय कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख, सौ. देशमुख यांच्यासोबत श्री. दळवी, जगन्नाथ रासकर, हरीभाऊ गिरमे, सोपानराव गिरमे, शंकरराव कुदळे, सेठ करमसी जेठाभाई, श्री. गोवित्रीकर आदी मान्यवर.

सभासदांना शेतीमालाची विक्री खते, बी-बियाणे, शेती तज्ज्ञांचे मार्गदर्शन असे साह्य केले जाते.

प्रत्येकजण माळीनगरचे नाव कसे उंचावेल याबाबतच विचार करत असतो. माळीनगर फेस्टिव्हलमुळे माळीनगरच्या लौकिकात भरच पडली आहे. नागरिक लांबून हे फेस्टिव्हल पाहण्यास येतात व त्यांच्या डोळ्याचे पारणे फिटते.

साखर कारखाना वाढला. तीन नवीन

प्रकल्प झाले. त्यामुळे कामगारांच्यात वाढ झाली. निवासासाठी जागेची उपलब्धता झाली. त्यामुळे माळीनगरची लोकसंख्या वाढली. त्यामुळे आहे ती दुकाने अपुरी पडायला लागली. पूवी काही शॉप्स कारखान्याने बांधली होती, ती कमी पडायला लागली म्हणून सर्वांच्या मागणीप्रमाणे कारखान्याने मोठ्या प्रमाणावर शॉप्स बांधली. त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला शोभा आली. तो परिसर गजबलेला दिसतो. सर्व रस्त्याच्या कडेला, ग्राऊंडवर, कारखान्याच्या आतील भाग, पेट्रोलपंप, सावित्री गार्डन लहान-मोठ्या झाडांना व निरनिराळ्या रंगीत पाना-फुलांनी बहरलेला आहे. सुष्टीचे एक शानदार दृष्य येथे पाहवयास मिळते.

दूरदृष्टी, धडाडी व अभ्यासूवत्ती असे पदाधिकारी लाभलेल्या शेतकऱ्यांच्या मालकीचा व शेतकऱ्यांनी चालविलेल्या कारखान्यात व्हाईस चेअरमन, चेअरमन, होलटाईम डायरेक्टर व मॅनेजिंग डायरेक्टर या पदांवर काम करण्याची संधी मला मिळाली, हे माझे भाग्य समजतो. तसेच सभासद व कामगारांनी सन्मानाची व आदराची वागणूक मला दिली त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

जुना साखर कारखाना नवीन करताना काही डायरेक्टरांनी आहे त्याच (जुन्या) कारखान्यांत काही कोटी रूपये खर्च करून एक्स्पान्शन करू असे सुचविले पण बोर्डाला ही योजना मान्य झाली नाही. एक्स्पान्शन व मॉडर्नायझेशन या योजनेखाली नवीनच कारखाना उभारला. त्यावेळी बोर्डाने घेतलेला निर्णय किती योग्य होता हे आज समजते. जूने ते जूनेच असते आणि नवीन ते नवीनच असते. त्यावेळी मॅनेजिंग डायरेक्टर व डायरेक्टरांनी अल्प काळात नवीन कारखाना उभारला. कारखान्याच्या प्रगतीत कामगार, खातेप्रमुख व कर्मचाऱ्यांचाही मोठा सहभाग आहे. आपले कामगार दररोजच्या कामात तर कर्तव्यदक्ष व तरबेज आहेतच, त्याचप्रमाणे वेळेत किंबहुना वेळेपूर्वी काम पूर्ण करण्यात आपला कामगार तरबेज आहे. नवीन कारखान्याची उभारणी चालू असताना जूना कारखाना तर चालू होताच पण त्याला आहे त्याच कामगारांनी नवीन कारखाना ११ महिन्यांत पूर्ण केला हीच पुनरावृत्ती वीज निर्मिती प्रकल्पावेळी एम. डी. च्या मार्गदर्शनाखाली सुद्धा झाली. कारखान्याने ISO चे प्रमाणपत्र प्राप्त करून एका उत्कृष्ट कारभाराची पावतीच मिळविली आहे.

अशा आपल्या वाडवडिलांनी उभारलेली संस्था हा आपला मानबिंदू आहे, आपली शान आहे. या कारखान्याची निरंतर वाढ होत जाईल, लौकिक मिळवेल, आपला कारखाना आर्थिक अडचणीत येणार नाही ही आपणा सर्वांची जबाबदारी, कर्तव्य आहे ते आपण सर्वजण मिळून पार पाडू या.

***



केंद्रीय श्रम व रोजगार राज्यमंत्री ना. चंद्रशेखर साहू यांच्या हस्ते राष्ट्रीय सुरक्षा पुरस्कार स्विकारताना
कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. अरविंद जाधव.



केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री ना. ऑस्कर फर्नांडिस यांच्या हस्ते राष्ट्रीय सुरक्षा पुरस्कार स्विकारताना
कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे

# सभासदांची साथ आणि प्रेरणा



**विजयराव शंकरराव गिरमे**
माजी मॅनेजिंग डायरेक्टर
दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर
**मोबा. नं. ९८२३२८३६९३**

दि. सासवड माळी शुगर फॅक्टरीचा अष्टदशकपूर्ती सोहळा आणि १४.८ मेगावॅटचा सहवीज निर्मिती प्रकल्प आदरणीय शरदरावजी पवार साहेबांच्या शुभहस्ते सुरू होत आहे. काही सभासदांनी निर्माण केलेल्या अडचणींवर मात करून ११ महिन्यात हा प्रकल्प उभारला आहे. आणि अत्यंत यशस्वीरित्या चालू झाला आहे. यानिमिताने मनाला अतिशय आनंद होत आहे. गेली अनेक वर्षे संचालक म्हणून काम करीत असताना आलेल्या अनुभवांच्या आठवणी ही दाटून येत आहेत. संचालक, मॅनेजिंग डायरेक्टर आणि चेअरमन म्हणून मला काम करण्याची संधी मिळाली ती अर्थातच, सभासदांची साथ आणि प्रेरणा यामुळेच. आपल्या कारखान्याचा संचालक झालो आणि आमच्या पुढे मोठे संकट उभे राहिले. सहकारीकरण होऊन सहकाराच्या ताब्यात असलेला कारखाना १९७९-८० ला ऊस आणि पैशाअभावी बंद पडला होता. त्यामुळे माळीनगराला एका ओसाड नगरीचे स्वरूप आले होते. व्यवहार बंद पडले होते. सभासदांपुढे आर्थिक अडचणीचा डोंगर उभा राहिला होता. मी या काळात चेअरमन होतो. व श्री राजाभाऊ जाधव हे मॅनेजिंग डायरेक्टर होते. तसेच आमचे इतर संचालक सहकारी - श्री प्रभाकर रासकर, कै. गजानन तात्या इनामके, श्री मधुनाना गिरमे, श्री अरविंद जाधव, कै. वसंतराव राऊत, श्री निळकंठ रासकर असे आम्ही सर्वजण सतत विचार-विनीमय करायचो. कारखाना परत मिळविण्यासाठी काय करता येईल याचा विचार करायचो. कारखान्याच्या बाजूने सभासद, कामगारांबरोबरच नागरिक आणि माळीनगर मधील महिला ही त्यावेळी आंदोलनात उतरल्या होत्या. मी आणि राजाभाऊ सतत मुंबईला जाऊन कै. ज्ञानेश्वर आगाशे , त्यांच्या पत्नि रेखाताई आगाशे, त्यावेळचे मुख्यमंत्री अ. र. अंतुले साहेब यांच्या संपर्कात होतो. प्रयत्नांती तीन वर्षासाठी कारखाना आपल्याला मिळाला. पुढे पैशाचा प्रश्न उभा राहिला. कंपनीकडे फक्त एक लाख रूपये शिल्लक होते. परंतु दैवयोगाने राजाभाऊंचे मेव्हुणे श्री सोनाळकर साहेब हे सेंट्रल बँकेचे चेअरमन व एम. डी. होते. त्यांच्यामुळे पैशाचा मोठा प्रश्न मार्गी लागला. त्यामुळे कामगारांच्या कुटुंबियांचा उपासमारीचा प्रश्न सुटला. याच हंगामात कारखान्याने उच्चांकी गाळप व साखर उत्पादन केले. अशा रितीने सर्व सुरळीत चालले होते. कारखाना उत्तम रितीने चालला होता. आपण आधुनिकीकरण करावे. कारखान्याची गाळप क्षमता दोन ते अडीच हजार टनापर्यंत वाढवावी अशी चर्चा संचालक मंडळात चालायची. त्यासाठी सुमारे आठ

कोटी रूपये खर्च अपेक्षित होता. श्री राजाभाऊंच्या मनात ही योजना होती. पण काही सभासदांनी हा विचार हाणून पाडला. तेथूनच सभासदांमध्ये दुफळी माजली. काही सभासदांनी १९८६ साली कंपनी विरूध्द पिटीशन दाखल केले होते. एम. डी. असणारे श्री राजाभाऊ आणि चेअरमनपदी असणारा मी स्वतः हायकोर्टाच्या आदेशानुसार कामापासून तात्पुरते दूर राहिलो. काही महिन्यांनी कंपनीच्या बाजूने निकाल लागला. आम्ही परत काम पाहू लागलो. परंतु राजाभाऊंनी एम. डी. पदाचा राजीनामा दिला. त्यांनी हा विचार बदलावा म्हणून, कै. जनाभाऊ गिरमे, श्री दिपक जगन्नाथराव गिरमे, रामभाऊ गिरमे व आम्ही खूप विनंत्या केल्या पण आम्हाला यश आले नाही. त्यानंतर संचालकांनी एम. डी. पदाची माळ माझ्या गळ्यात घातली. संचालक मंडळीतील एक-दोन मंडळींना ते पहावले नाही. आणि पुढच्याच वर्षी माझ्याविरूध्द राजाभाऊंना निवडणुकीला उभे केले. पण माझ्यामागे असणा-या लहान-मोठ्या सभासदांनी मला प्रचंड बहुमतानी निवडून दिले. या घटनेनंतर मी मनातून पुर्णपणे निराश झाला होतो. सुमारे पावने दोन वर्षानंतर मी सुध्दा एम. डी. पदाचा राजीनामा दिला. काळ बदलला. माणसं बदलली. माणसांची नियत ही बदलली.

मी व आबासाहेबांनी १७५० मे. टनाची परवानगी आणली होती. काळाच्या ओघात पुढे १७५० व नंतर २५०० मे.टन गाळप क्षमता झाली. श्री अरूण पांढरे यांच्यानंतर श्री विजयकांत कुदळे एका संघर्षमय वातावरणात एम. डी. झाले. पुढे श्री अरविंद जाधव आले. त्यांनी मोलॅसेस बेस्ड डिस्टीलरी प्रकल्प उभारला. नंतर श्री राजेंद्र गिरमे आले. त्यांनी ग्रेन बेस्ड डिस्टीलरी उभारली. आदरणीय शरदरावजी पवार साहेबांनी त्याचे उद्घाटन केले. त्यानंतर कारखान्याची आर्थिक घडी व्यवस्थित बसली. त्यानंतर सहविज निर्मिती करण्याचे ठरले. सर्व बाबींची पूर्तता करीत ऑर्डर्सही दिल्या. आणि परत अडचणींचा डोंगर उभा राहिला. बँकाना पत्रे दिली गेली. सेंट्रल बँक व बँक ऑफ बडोदाने पतपुरवठा बंद केला. पण चेअरमन श्री कृष्णकांत कुदळे, काही संचालक व मी अशा आम्ही सर्वांनी बँकेत अतिशय निर्भिडपणे पाठपुरावा करून कर्ज मंजूर करून घेतले. व पैसे उपलब्ध झाले. सुमारे १० कोटी रूपये खर्चाचा हा प्रकल्प उभारताना आर्थिक अडचणी होत्या तशाच काही मंडळींनी अर्ज करून कायदेशीर अडचणी ही उभ्या केल्या होत्या. मात्र हा प्रोजेक्ट अल्पावधीत पूर्ण करायचाच या प्रबळ इच्छेने काम सुरू होते. मॅनेजिंग डायरेक्टर राजेंद्र गोपाळराव गिरमे यांनी अतिशय समर्थपणे या सर्व अचणींवर मात केली. कारखान्याचे सभासद, कामगार, नागरीकांनी त्यांना भक्कम साथ दिली. आणि अल्पावधीत अतिशय यशस्वीरित्या हा प्रकल्प पूर्णत्वास गेला आहे. १० नोव्हेंबर २०१३ रोजी आदरणीय शरदरावजी पवार साहेबांच्या हस्ते उद्घाटन होत आहे. या कार्यक्रमाला सार्वजनिक बांधकाममंत्री मा. ना. छगनराव भुजबळ, पाणीपुरवठा व स्च्छतामंत्री दिलीपराव सोपल, सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील, रामराजे निंबाळकर, विजयसिंह मोहिते पाटील यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आमदार आणि अन्य मंडळी उपस्थित राहणार आहेत. कंपनी, सभासद, कामगार व माळीनगरवासीय यांची अशीच प्रगती होत राहो. हीच परमेश्वराजवळ प्रार्थना.

***

# घनमापन पद्धतीच्या पाणी वापराचा आदर्श



**श्री. अरविंद एकनाथराव जाधव**
माजी मॅनेजिंग डायरेक्टर
दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर
**मोबा. नं. ९८२२२४९४४०**

दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगरच्या संचालक पदावर १३ जानेवारी १९८० पासून आजअखेर म्हणजे ३३ वर्ष अखंडपणे कार्यरत आहे.

या कालावधीत कंपनीचे व्हाईस चेअरमन, चेअरमन, होलटाईम डायरेक्टर व मॅनेजिंग डायरेक्टर या सर्व पदांवर काम केले आहे. संचालकांच्या सर्व कमिट्यांमध्ये संचालक व चेअरमन म्हणून काम केलेले आहे.

मी सुरुवातीला १९८० साली प्रथम संचालक मंडळावर आलो त्या वेळी सहकारी साखर कारखाना बंद पडला होता. १९८१ - १९८२ साली प्रदीर्घ प्रयत्नानंतर दि सासवड माळी शुगर फॅक्टरी ताब्यात मिळाला. त्या वेळी श्री. प्रदीपराव ऊर्फ राजाभाऊ जाधव मॅनेजिंग डायरेक्टर होते. त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली तसेच श्री. विजयराव गिरमे, वसंतराव राऊत, मधुकरराव गिरमे, निळकंठ रासकर, गजाननराव इनामके, प्रभाकरराव रासकर या संचालकांबरोबर काम केले.

आज मला अत्यंत आनंद होत आहे की, १९८० - ८१ साली बंद पडलेला साखर कारखाना परत सुरू झाल्यापासून, नवीन साखर कारखाना, मोलॅसीस व ग्रेन बेस व आता १४.८ को.जन प्रकल्प या सर्व नवीन प्रकल्पाचे उभारणीमध्ये माझा सहभाग होता व आहे.

या सर्व नवीन प्रकल्पांची उभारणीमध्ये मातब्बर मॅनेजिंग डायरेक्टर, चेअरमन, व्हाईस चेअरमन व संचालकांबरोबर काम करण्याची संधी मला मिळाली. त्यामध्ये पूर्वीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. प्रदीपराव जाधव, श्री. विजयराव गिरमे, श्री. अरुणराव पांढरे, विजयकांत कुदळे व आताचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे या सर्वांबरोबर काम करण्याची संधी मला मिळाली, हे माझे भाग्य समजतो.

माझ्या मॅनेजिंग डायरेक्टरच्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये तीस हजार लिटर कपॅसिटीचा मोलॅसीस डिस्टिलरी प्रकल्प सहा महिन्यांमध्ये उभा केला. त्या वेळीसुद्धा साखर कारखानदारी अडचणीत होती. परंतु संचालक मंडळ व सर्व सभासदांच्या प्रखर इच्छाशक्तीमुळे ते शक्य झाले. त्यानंतर ग्रेन बेस डिस्टिलरी, को.जन प्रकल्प लागोपाठ उभे राहिले. या सर्व प्रगतीमुळे आज मला सांगण्यास अत्यंत अभिमान वाटतो की, माळीनगरचा साखर कारखाना वरच्या दर्जाच्या कारखान्यामध्ये मोडला जात आहे.




डिस्टीलरी प्रकल्प उद्घाटन समारंभात मार्गदर्शन करताना केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री शरद पवार साहेब.

माझ्या ३३ वर्षांच्या कार्यकालामध्ये सुरुवातीपासून कारखान्याच्या इरिगेशन कमिटीवर काम करीत आहे. यापैकी जवळजवळ २२ वर्ष या कमिटीच्या चेअरमनपदी काम केले आहे. दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. कारखान्याने १९३२ सालापासून घनमापन पद्धतीने पाणी व्यवस्थापन यशस्वीपणे केल्यामुळेच महाराष्ट्रामध्ये माळीनगरच्या पाणी व्यवस्थापनाचे शासन स्तरावर कौतुक होत आहे.

त्याचे दूरदर्शनवर दोन वेळा व बारामतीमध्ये पाणी परिषदेमध्ये माळीनगरच्या घनमापन पद्धतीच्या यशस्वी व्यवस्थापनाची फिल्म दाखविण्यात आली हे अत्यंत भूषणावह आहे. महाराष्ट्र शासनाबरोबर १९९२ साली १८ वर्षांचे व २०१० साली १२ वर्षांचे वॉटर ॲग्रिमेंट करण्याची संधी संचालक मंडळाने मला दिली व ती मी यशस्वीरीत्या पार पाडली.

आजमितीला सोलापूर जिल्ह्यामध्ये जवळ जवळ २८ ते ३० साखर कारखाने सुरू होत आहेत. त्यामुळे स्पर्धा वढणार आहे. साखरेपेक्षा बायप्रॉडक्ट यांना फार महत्त्व आलेले आहे. ज्यांच्याकडे हे सर्व बायप्रॉडक्ट आहेत तेच कारखाने स्पर्धेत टिकणार आहेत. त्यासाठी या पुढील काळामध्ये साखर कारखाने व्यावसायिक दृष्टीने चालवावे लागणार आहेत. भावी संचालकांवर ती मोठी जबाबदारी पडणार आहे. त्यामध्ये या पुढील संचालक मंडळ कमी पडणार नाही याविषयी माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. यापुढेही देशी-विदेशी दारूचा बॉटलिंग प्लॅन्ट, हॉटेल सेंट्रलपार्क प्रकल्प उभारण्याचे काम करावे लागणार असून त्यादृष्टीने नियोजन चालू झालेले आहे.

***

# कृषी क्रांतीची ज्योत



**श्री. भगवानराव राजाराम बोरावके**
अकलुज
**मोबा. नं. ९८५०५७६७६८**

१९३२ साली हिंदुस्थानात एक कृषी क्रांतीची ज्योत पेटली तीसुद्धा महाराष्ट्रात आणि आश्चर्य म्हणजे माळशिरस तालुक्यातील अकलूज परिसरात. तिसरी-चौथी इयत्ता शिकलेली, शेतामध्ये अहोरात्र धडपडणारी परंतु पोटाची खळगी रिकामी अशा शेतकरी मंडळींच्या मनामध्ये काळ्या आईच्या मायेचा पंख फडफडला. या भागामध्ये पाणी आहे परंतु कर्तबगारी नसल्यामुळे कॅनॉलचे पाणी रानावनात पळत होते हे या शेतकऱ्यांनी हेरले आणि रेल्वेने, मोटारीने हिंडत हिंडत अकलूजच्या उघड्या वघळी, ओढेनाले, उंच-सखल भाग असलेल्या प्रदेशात पाऊल टाकले.

ना घर ना दार, अनोळखी माणसे. परंतु अंगात असलेली हिंमत आणि जन्मजात शेतीत सोने पिकवण्याची जिद्द असणारी हरिभाऊ गिरमे, नारायणराव बोरावके, बापुराव बोरावके, नानासाहेब पांढरे शंकरराव व रघुनाथराव इनामके, भाऊसाहेब राऊत, बाबासाहेब रासकर, भगवंतदादा गिरमे अशा सहकाऱ्यांनी सेझ म्हणून आज जी संकल्पना रुजू पाहत आहे त्याची मुहूर्तमेढ त्या काळी या अनाडी माणसांनी रोवली.

प्रत्येक शेतकऱ्यांना मोजून पाणी देण्याची पद्धत स्वातंत्र्य काळातसुद्धा अस्तित्वात आली नाही. ते या शेतकऱ्यांनी गेल्या ७५ वर्षांत केले आहे. ज्या अडाणी शेतकऱ्यांनी ७५ वर्षापूर्वी केले ते या देशातील सरकार, शास्त्रज्ञ, विद्वान यांनी गेल्या कित्येक वर्षांत केले नाही. त्यामुळे पाण्याचा प्रचंड अपव्यय अनावश्यक रुपयांची धूळधाण होऊन देश मागे राहिला. या शेतकऱ्यांना उत्पन्नातून योग्य भाव व पैसे न मिळाल्यामुळे त्यांच्यामध्ये आपण उसाची साखर करण्याची कल्पना आली.

१९३२ या इंग्रजांच्या काळात त्यांनी शुगर फॅक्टरी करण्याचे ठरविले. ही गोष्ट महाराष्ट्रातील धुरीणांनी स्वातंत्र्योत्तर काळात १९६० मध्ये केली व त्याला सहकारी कारखाना म्हणून संबोधले.

अशा रीतीने मिळणारे उत्पन्न आणि कारखान्यातील शेतकऱ्यांची सधनता स्वातंत्र्योत्तर धुरीणांना सहन करता आली नाही. त्यामुळे त्यांनी सिलिंग कायद्याचा बडगा १९६० साली उभारला. सासवड माळी शुगर फॅक्टरी हा कॅनॉलवर आधारित कारखाना असल्यामुळे त्यावर सिलिंगची मोठी कुऱ्हाड कोसळून शेतकऱ्यांच्या उमेदीवर, प्रगतीवर बंधन घालण्यात आले.

टाटा-बिर्ला यांच्यासारखे सबंध देशात कारखान्याची मालिका निर्माण करीत असताना त्यांना मात्र सिलिंग नव्हते. शेतकऱ्यांनी कॅनॉल बागायत १८ एकर शेती करावी असा कायदा

केला. याचा परिणाम म्हणून कालांतराने शेतकरी ३-४ एकरांपर्यंत आला. त्यांची पिढी बरबाद होत गेली. वालचंदनगर, बृहनमहाराष्ट्र, सोमय्या या खासगी कारखान्याचे स्वत:चे अत्याधुनिक शेतीचे मळे होते. त्यांचीसुद्धा स्टेट फार्मिंगमध्ये रूपांतर करून दिवाळे वाजविले. देशाचे अब्जावधी रुपयांचे नुकसान झाले. हे सर्व खासगी कारखाने शेअर होल्डरचे होते. शेतकऱ्यांचे नव्हते. सासवड माळी शुगर फॅक्टरी हाच फक्त कारखाना शेतकरी सभासदांचा होता. अशा परिस्थितीतही कारखान्यातील संचालक मंडळाने कारखाना यशस्वी करण्यासाठी भरपूर प्रयत्न केले.

सिलिंगमुळे कमी होणारे क्षेत्र, इतर मोठ्या सहकारी कारखान्यांचे मोठ्या प्रमाणात गाळप यांमुळे सभासदांमध्ये चिंतेचे वातावरण व अस्वस्थता वाढून कारखान्याचे रूपांतर सहकारी कारखान्यात करण्याचे काम केले. ३-४ वर्षे तो कारखाना चालवून उसाची परिस्थिती व अस्थिरता यामुळे १९८० साली कारखाना बंद पडला. त्यामुळे या परिसरातील अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. सभासद व कामगार आणि जनता हवालदिल झाली. त्याच वेळी एक उदयोन्मुख, उच्च शिक्षित व महत्त्वाकांक्षेने प्रेरित झालेला तरुण श्री. प्रदीप जाधव या कारखान्यात मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून पदावर आले. त्यांनी महान प्रयत्नांनी सहकारी कारखान्याचे रूपांतर पूर्वीच्याच आपल्या खासगी कारखान्यात करून पैसा व मनुष्यबळ नसताना आजूबाजूंच्या शेतकऱ्यांच्या मनामध्ये साशंकता व नाराजी असतानासुद्धा अत्यंत धाडसाने १९८१ साली कारखाना सुरू केला. लहान मशिनरी असतानासुद्धा रेकॉर्ड ब्रेक करून कारखाना नावलौकिकास आणला. या सर्व मंडळींनी पुढे २५०० टनी कारखान्याची उभारणी करून स्थिरस्थावर व अस्तित्व निर्माण केले. या सर्व प्रयत्नांमुळे कारखान्याची भरभराट होत राहिली. त्याचे श्रेय या होतकरू संचालकांना व कामगारांना देणे हे क्रमप्राप्त आहे.

अशा या अत्यंत स्पर्धात्मक काळामध्ये सध्याचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे यांसारख्या एका तरुण, तडफदार व हिंमतवान नेतृत्वाने सर्व संकटांना तोंड देत कारखान्याचे विस्तारीकरण, मोलॅसीस बेस्ड व ग्रेन बेस्ड डिस्टिलरी यांची उभारणी उत्तमरीत्या केली व यशस्वीरीत्या चालविली. यानंतर १४.८ मेगावॅट को-जनचे काम अवघ्या अकरा महिन्यांत करून देण्याचा विक्रम केला आहे. विशेष अनुभव नसताना तरुणांच्या अंगात हिंमत व जिद्द असेल तर काय करू शकतो याचे हे उत्तम उदाहरण आहे.

या देशातील जिद्दी आणि कर्तबगार तरुण पिढीला फार वयस्कर असलेल्या मंडळींनी चालना दिली तर देश, राज्य, कारखानदारी व राजकारण यांचे जगाच्या नकाशावर नाव कोरल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास आमच्यासारख्या अनेक संस्था यशस्वीरीत्या जबाबदारी स्वीकारलेल्या ८४ वर्षांच्या म्हाताऱ्याला खात्री वाटते.

भविष्यातील संकल्पनांना मूर्त स्वरूप आणण्याची जिद्द व हिंमत ८१ वर्षांच्या निमित्ताने परमेश्वराने या सर्व मंडळींना द्यावी हीच इच्छा.

***

# अखिल भारतीय माळी शिक्षण संस्था



**श्री कृष्णकांत कुदळे.**
अध्यक्ष, अ.भा.माळी शिक्षण संस्था.
**मोबा.नं. ९८२३०६८६२०**

माळी समाजाची उन्नती करायची असेल तर संघटीत प्रयत्न केले पाहिजेत. फक्त शेती विकास करून किंवा व्याख्याने देऊन समाजाची दुःस्थिती घालविता येणार नाही. चारित्र्य संपन्न, निर्व्यसनी समाज घडवायचा असेल तर समाजाला शिक्षणाची अत्यंतीक गरज आहे. त्यासाठी शिक्षण प्रसार झाला पाहिजे. वाड्यावस्त्यावरील, शेतमळ्यामधील माळी समाजातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे.या हेतूने प्रेरीत होऊन सुमारे ६८ वर्षापुर्वी माळी समाजातील काही दृष्ट्या आणि उपक्रमशील व्यक्तींनी एकत्र येऊन माळी समाजाच्या विकासाचे स्वप्न उराशी बाळगून, शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून क्षत्रिय माळी शिक्षण संस्थेची स्थापना केली. कै. तुकाराम गिरमे, कै. हरीभाऊ गिरमे, कै. जगन्नाथ मेहेर, कै. रा.बा. नारायणराव बोरावके आणि कै. गणेश हरी दरोडे आदी मंडळींनी ही संस्था स्थापन केली.

शिक्षण क्षेत्रात माळी समाजाने समर्थपणे वाटचाल करावी या हेतूने क्षत्रिय माळी शिक्षण संस्थेची घटना व नियम करण्याचे ठरले. त्यानुसार ६ डिसेंबर १९४५ रोजी सोसायटी ॲक्टनुसार या संस्थेची नोंदणी झाली.त्यावेळी १८८ बुधवार पेठ पुणे. हे संस्थेचे मुख्य कार्यालय होते.संस्थेच्या नियमानुसार प्रथमतः संस्थेची जबाबदारी समाजातील पुढील १५ व्यक्तींकडे सोपविण्यात आली. कै.रा.ब. नारायणराव सोपानराव बोरावके (राहता), कै. हरीभाऊ बळवंतराव गिरमे (माळीनगर), कै. रामचंद्र भगवंत गिरमे. एम.एल.ए. (श्रीरामपूर), कै. बाळकृष्ण पांडुजी उर्फ दादाभाई बनकर (मुंबई), कै. जगन्नाथशेठ सबाजीशेठ मेहेर (पुणे), कै. गणेश हरी दरोडे (पुणे), कै. विश्वनाथ महादेवराव फुले (पुणे), कै. धोंडीबा नारायणराव बोराटे (पुणे), कै. संभाजी गेणूजी यादव (पुणे), कै. शिवराम गणपतराव पिंगळे (पुणे), कै. काशीनाथ गोविंदराव पाषाणकर (पुणे), कै. नारायण बळवंतराव घुमटकर (पुणे), कै. तुकाराम नामदेव गिरमे (पुणे), कै. गणपतशेठ आबाजी बोडके (मुंबई), कै. मारूती कोंडीबा कुदळे (माळीनगर).

या शिक्षण संस्थेमुळे माळी समाजात उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले. शैक्षणिक विचाराने कार्यकर्ते भारावून गेले. त्यानंतर एक वर्षाने २६-२७ डिसेंबर १९४६ रोजी



अखिल भारतीय माळी शिक्षण संस्था सुवर्ण महोत्सव सोहळा : २८ मे २०००
दीप प्रज्वल्न प्रसंगी डावीकडून - उपमुख्यमंत्री मा.ना. छगनराव भुजबळ, मुख्यमंत्री विलासराव देशमुख, मा.ना. दिलीपराव वळसे पाटील, मा.ना. विजयसिंह मोहिते पाटील, मा. ना. प्रा. ना.स. फरांदे, मा. कृष्णकांत कुदळे, मा. ना. रामकृष्ण मोरे, मा.ना. वसंत चव्हाण व इतर मान्यवर.



अखिल भारतीय माळी शिक्षण संस्था सुवर्ण महोत्सव सोहळा : २८ मे २०००
मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष कृष्णकांत कुदळे.

माळीनगर येथे चैतन्यपूर्ण वातावरणात अधिवेशन पार पडले. त्यानंतर संस्थेचे प्रमुख आणि कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागामुळे क्षत्रिय माळी शिक्षण संस्थेची प्रगती होत गेली. १९४६ सालापासून नियमितपणे संस्थेचा वार्षिक अहवाल प्रसिध्द होऊ लागला. संस्थेच्या शैक्षणिक निधीत भर पडू लागली. शैक्षणिक मदतीसाठी गरजू विद्यार्थ्यांकडून अर्ज येऊ लागले. संस्थेच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळाल्याने अनेकांनी आपला शिक्षणक्रम पूर्ण केला. सुशिक्षीत माळी युवक नोकरी, व्यापार, उद्योगाबरोबर विविध क्षेत्रात पदार्पण करून आपल्या कुटुंबियांचे तसेच समाज विकास कार्यात जाणीवपूर्वक कार्यरत झाले. संस्थेच्या विकासाबरोबर अनेक अनुभव येऊ लागले. निधी संकलन, कामकाज पध्दती, त्यासंबंधीच्या अडचणी इ. बाबींचा अभ्यास करून २० जुलै १९४९ रोजी संस्थेच्या घटनेत दुरूस्ती करून नवीन घटना तयार करून स्विकारण्यात आली.

त्यानुसार संस्थेचे कार्यालयाचे ठिकाण पुणे ऐवजी माळीनगर जि. सोलापूर येथे सोईच्या दृष्टीने ठरविले. दि. सासावड माळी शुगर फॅक्टरीने कार्यालयासाठी विनामुल्य जागा दिली. बॉम्बे पब्लिक ट्रस्ट अन्वये १९-०६-१९५३ रोजी रजि. नं. एफ - ३९ ने क्षत्रिय माळी एज्युकेशन सोसायटीची न्यास नोंदणी झाली. १९७३ मध्ये क्षत्रिय माळी एज्युकेशन सोसायटीचा रौप्य महोत्सवी कार्यक्रम पुणे येथे पार पडला.पंचवीस वर्षातील कार्याचे दर्शन घडविणा-या आणि कार्यकर्त्यांच्या कार्याचा परिचय करून देणा-या कै. प्रा. वसंत काणे, संपादक दै. संध्या. यांनी संपादीत केलेल्या रौप्य महोत्सवी ग्रंथाचे त्यावेळचे महाराष्ट्र राज्याच्या प्रसिध्दी, गृह व क्रिडा खात्याचे तरूण तडफदार मंत्री मा. शरदचंद्र पवार यांच्या शुभहस्ते दि. ४ फेब्रुवारी १९७३ रोजी प्रकाशन झाले.

संस्थेच्या उभारणीत दि. सासवड माळी साखर कारखान्याने महत्वाची भुमिका बजावली आहे. सुरूवातीपासून कारखान्याच्या इमारतीत संस्थेच्या कार्यालयासाठी जागा दिलेली आहे. त्याशिवाय कारखाना परिसरात संस्थेने इमारत बांधावी व अन्य काही प्रकल्प सुरू करावेत यासाठी आठ गुंठे जमिन दिली आहे.

काळानुरूप संस्थेच्या कार्यपटलात बदल करणे आवश्यक आहे. असे सर्वानुमते ठरल्यावर घटना दुरूस्ती बाबत अभ्यास करण्यासाठी मा. प्रा. ना.स. फरांदे, मा. कै. के.टी. गिरमे, मा. कै. चंद्रकांत कुदळे, मा. कृष्णकांत कुदळे, चिटणीस मा. कै. परशुरामभाऊ गिरमे व सहचिटणीस मा. रामभाऊ गिरमे यांची एक समि ती तयार करण्यात आली. या समितीने घटनेचा सखोल अभ्यास करून घटनेत महत्वपूर्ण बदल सुचविले. त्यांच्या शिफारशीनुसार घटनेत दुरूस्ती करण्यात आली. नवीन घटना १५ जानेवारी १९९४ पासून अस्तित्वात आली. त्यातील बदल खालीलप्रमाणे करण्यात आले. संस्थेचे नांव अखिल भारतीय माळी शिक्षण संस्था असे करण्यात आले.

संस्थेचा सुवर्ण महोत्सव सोहळा २८

मे २०० रोजी दुपारी ४ वाजता पुणे येथील शिवशंकर सभागृहात मोठ्या दिमाखाने साजरा झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. ना. स. फरांदे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री दिलीप वळसे पाटील, शालेय शिक्षण मंत्री प्रा. रामकृष्ण मोरे, उत्पादन शुल्क मंत्री वसंतराव चव्हाण, उर्वरीत महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष उल्हासराव पवार, खासदार प्रदीप रावत, रामदास फुटाणे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. सुवर्ण महोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने प्रा. दादा शिंदे व प्राचार्य दत्तात्रय बाळसराफ यांनी संपादीत केलेल्या सुवर्ण अक्षर या स्मरणिकेचे प्रकाशन उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेच्या सुवर्ण महोत्सवाच्यावेळी समाजातील शैक्षणिक, उद्योग, सहकार, कला, समाजसेवा आदी क्षेत्रातील नामवंतांचा सत्कार करण्यात आला. सुवर्ण महोत्सवाच्यावेळी संस्थेचे मुख्य विश्वस्त डॉ. विजयराव बोरावके होते. व संस्थेचे अध्यक्ष श्री कृष्णकांत कुदळे हे होते. त्यांच्या प्रयत्नानेच हा देखणा सोहळा दिमाखात पार पडला.

अखिल भारतीय माळी शिक्षण संस्थेची शिष्यवृत्ती घेऊन आपले जिवन उज्वल करून




अखिल भारतीय माळी शिक्षण संस्थेच्या सुवर्ण महोत्सव सोहळा समारंभात बोलताना उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ.

यशोशिखरावर जाणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री छगनरावजी भुजबळ, महाराष्ट्र विधानसभेचे माजी सभापती प्रा. ना.स. फरांदे, माजी राज्यमंत्री श्रीमती रजनीताई सातव, माजी आमदार सदाशिवराव माळी तसेच स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे (नांदेड) माजी कुलगुरू व मा. खासदार जनार्दन वाघमारे, माजी कलेक्टर दादासाहेब झगडे, अमेरिकेतील डॉ. सुरेश लोंढे आदी नामवंतांचा समावेश आहे. अनेक डॉक्टर्स, इंजिनियर्स यांनी संस्थेची शिष्यवृत्ती घेऊन आपापल्या भागात आपला व्यवसाय, नोकरी सुरू केली आहे.

आश्रयदाते, पुरस्कर्ते, हितचिंतक आणि तहहयात सदस्य याद्वारे आणि देणगी, पारितोषिक आणि मुदत ठेव या स्वरूपात संस्थेकडे शिक्षण निधीचे संकलन होते. संस्थेचे सुमारे बारा हजाराचेवर सभासद असून महाराष्ट्रात नव्हे तर भारतातील इतर राज्यात आणि परदेशातही सभासद आहेत. संस्थेकडे सद्या ट्रस्ट फंड, जनरल फंड, नारायण पाटील काजळे फंड,

पारितोषिक ठेव मिळून सुमारे ६५ लाखाच्यावर निधी आहे. तो योग्य प्रकारे गुंतविलेला आहे. विद्यार्थ्यांच्याकडे शिष्यवृत्तीच्या रूपाने एक कोटी रूपयांच्यावर निधी आहे.

शिक्षण निधीच्या गुंतवणुकीचे दरवर्षी व्याज मिळते. त्या व्याजातून व शिष्यवृत्ती परतफेडीतून आलेल्या रकमेतून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. आत्तापर्यंत संस्थेने पाच हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन शिक्षणासाठी आर्थिक मदत केली आहे. महाविद्यालयीन (बारावी नंतरच्या) शिक्षणासाठी कर्जाऊ शिष्यवृत्ती परतफेडीच्या तत्वावर दिली जाते. दर वर्षी अंदाजे दहा लाख रूपये शिष्यवृत्ती वाटप केले जाते. माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर आणि व्यावसायिक विविध परिक्षांमध्ये उत्तीर्ण होऊन माळी समाजाच्या विद्यार्थ्यांमध्ये सर्व प्रथम येणा-या गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी माळी समाज बांधवांनी पारितोषिके देण्यासाठी संस्थेकडे निधी सुपुर्त केला आहे. या निधीच्या येणा-या व्याजातून विद्यार्थ्यांना दरवर्षी पारितोषिक रूपाने रोख रक्कम दिली जाते.

संस्थेचे आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे सर्व पदाधिकारी व कार्यकारी मंडळाचे सदस्य त्यागी भावनेने काम करतात. कोणत्याही कामासाठी संस्थेकडून मानधन किंवा खर्च घेतला जात नाही. सर्व पदाधिकारी व कार्यकारी मंडळाचे सदस्य विविध भागात होणा-या बैठकांना स्वखर्चाने येतात. सहाजिकच याचा परिणाम शिक्षण फंड वाढण्यात झाला आहे. विशेष उल्लेख करावा लागेल तो, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री व सद्याचे सार्वजनिक बांधकामंत्री मा. श्री छगनराव भुजबळ यांनी दोन लाख रूपये त्यांच्या निधीतून उपलब्ध करून देऊन मोठे सहकार्य केले आहे. या पुढे ही असेच सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने मुख्यमंत्री निधीतून तीन लाख पन्नास हजार रूपये मिळाले होते. संस्थेची व्याप्ती वाढविण्यासाठी संस्थेच्या वतीने सध्या भारत माळी टाईम्स या नावाने एक त्रैमासिक चालू करण्याचा प्रयत्न आहे. हा प्रयत्न यशस्वी झाल्यास पुढे त्याचे मासिकात रूपांतर केले जाणार आहे.

संस्थेची नवीन घटना अस्तित्वात येत असून त्यातील महत्वाचा भाग म्हणजे येथून पुढे माळी समाजातील वेगवेगळ्या संस्थाना सुध्दा सभासदत्व दिले जाणार आहे व संस्थेचे शैक्षणिक शिष्यवृत्तीबरोबर समाज संघटन व समाज जागृतीचे कार्यसुध्दा या संस्थेद्वारे केले जाणार आहे. याकरिता संस्थेच्या नावामध्ये बदल केला जाणार असून संस्थेचे नांव अखिल भारतीय माळी समाज प्रबोधन व शिक्षण संस्था म्हणून नावारूपास येणार आहे. या संस्थेमार्फत दत्तक-पालक योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेमध्ये एखादा गरीब व होतकरू विद्यार्थी दत्तक घेऊन त्याला दरवर्षी ठरावीक रक्कम (जी संस्थेने वेगवेगळ्या शिक्षणक्रमास ठरवलेली आहे) देऊन एखाद्यास पालकत्व स्विकारता येणार आहे.

सद्या या संस्थेचे मुख्य कार्यालय दि. सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या डेक्कन जिमखान्यावरील हॉटेल सेंट्रल पार्कच्या परिसरात आहे.

**संस्थेचे विश्वस्त मंडळ**

श्री अरूणराव अनंतराव पांढरे (मुख्य विश्वस्त) माळीनगर, प्रा. ना. स. फरांदे (तज्ञ स्वीकृत) पुणे, श्री पदमकांत शंकरराव कुदळे-पुणे, श्री प्रतापशेठ जगन्नाथशेठ मेहेर-मुंबई, श्री ज्ञानेश्वर नारायणराव गिरमे-माळीनगर, श्री संपतराव मारूतराव शिंदे-फलटण, प्रा. मधुकरराव मारूतराव फुले-पुणे, सौ. उषाताई दशरथ पांढरे-पुणे, श्री प्रकाश रामचंद्र लोंढे-पुणे, श्री जयवंतराव भाऊसाहेब गायकवाड-औरंगाबाद, श्री गुलाब सुकदेव माळी-नासिक.

**संस्थेचे मध्यवर्ती पदाधिकारी मंडळ**

श्री कृष्णकांत शंकरराव कुदळे (अध्यक्ष), प्रा. दादा पांडुरंग शिंदे (कार्याध्यक्ष), श्री दिलीप कृष्णाजी राऊत (सरचिटणीस), श्री विजय तुकाराम लोणकर (खजिनदार).

**संस्थेचे कार्यालयीन समन्वयक**

श्री अनिल वसंतराव होले-पुणे (अंतर्गत हिशोब तपासनीस), ॲड. रंगनाथ तुकाराम ताठे (कायदेशीर सल्लागार) श्री शिवदास नारायण महाजन-पुणे, श्री महादेव प्रल्हाद शेंडे-पुणे, श्री रवी पुंडलिक चौधरी-पुणे, श्री प्रशांत बाबूराव एकतपुरे-पुणे, श्री दिलीप विष्णू करपे-पुणे, श्री

**संस्थेच्या विभागीय कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी**

| अध्यक्ष | चिटणीस |
|---|---|
| १) श्री मच्छिंद्र बाबूराव गुलदगड-राहूरी (माळीनगर (सोलापूर) विभागीय कार्यालय) | श्री दादासाहेब नारायण म्हेत्रे-राहुरी (माळीनगर (सोलापूर) विभागीय कार्यालय) |
| २) श्री लक्ष्मण मनोहर पवार-औरंगाबाद (औरंगाबाद विभागीय कार्यालय) | श्री शिवाजी किसनराव जाधव-औरंगाबाद (औरंगाबाद विभागीय कार्यालय) |
| ३) श्री दिगंबर सदाशिव ननावरे-चिपळूण (मुंबई विभागीय कार्यालय) | श्री तुकाराम गंगाराम डबाणे-चिपळूण (मुंबई विभागीय कार्यालय) |
| ४) श्री वासुदेव निंबा माळी-नंदुरबार (नासिक विभागीय कार्यालय) | प्रा रमेश ओंकार मगरे-तळोदा ( नासिक विभागीय कार्यालय) |
| ५) श्री प्रल्हाद सुंदरकर-अमरावती (अमरावती विभागीय कार्यालय) | श्री अशोक एस. इंगळे-अमरावती (अमरावती विभागीय कार्यालय) |
| ६) श्री महादेवराव रामजी कोल्हे-नागपूर. (नागपूर विभागीय कार्यालय) | डॉ. ज्ञानेश बापूराव ढाकूलकर-नागपूर (नागपूर विभागीय कार्यालय) |

# जिव्हाळ्याचे संबंध



**श्री. मधुकरराव भिकोबा गिरमे**
माळीनगर गट नं. २
**मोबा. नं. ९४२३०१२७०२**

माननीय कृषिमंत्री श्री. शरदचंद्र पवार साहेब यांच्या हस्ते दि सासवड माळी साखर कारखान्याचे सहवीज प्रकल्पाचे उद्‌घाटन होत आहे. ही साखर कारखान्याचे इतिहासातील प्रगतीच्या वाटचालीतील महत्त्वाची घटना आहे.

सासवड येथील सर्वसामान्य माळी समाजातील शेतकऱ्यांनी सन १९२०-१९२१-१९२२ साली कोपरगाव येथील गंगापूर व श्रीरामपूर येथील भंडारदरा धरणाचे पाणी मिळणार असल्याने सासवड माळी समाजातील द्रष्टे शेतकरी नेते कै. हणमंतराव गणपतराव गिरमे यांच्या प्रेरणेने कोपरगाव व श्रीरामपूर येथील माळी समाजातील





गुळाची ढेप.



शुभ्र दाणेदार साखर.

शेतकऱ्यांनी कोपरगाव श्रीरामपूर तालुक्यामध्ये कॅनॉल खालील जमिनी घेण्यासाठी स्थलांतर केले. त्यापूर्वी ही मंडळी पुरंदर तालुक्यात सासवडच्या आसपास ऊस पिके व मोसंबीची तटपुंजा क्षेत्रामध्ये शेती करीत होते. त्यामुळे त्यांना उसाचे उपजत ज्ञान होते. गूळ तयार करण्यासाठी ऊस पिकवीत असत. उसापासून गूळ तयार करण्यासाठी त्यांनी कोपरगाव श्रीरामपूर येथे सुरुवात केली. त्यावेळी साखर कारखाना मशिनरीस मोठ्या भांडवलाची आवश्यकता होती. मुंबईतील साठे जमनादास मेहता यांच्याकडून मशिनरी त्यांच्याकडे कर्जासाठी तारण ठेवली व अशा रीतीने दर दिवशी २५० ते ५०० टन क्रशिंग इंग्लंडच्या फॉसेट कंपनीकडून घेतली. कै. हरिभाऊंच्या हयातीत हजार टनांपर्यंत वाढ करण्यात आली. नंतर नवीन पिढीने त्यामध्ये १७५० टनांपर्यंत काही वर्षांतच वाढ केली व नंतर २५०० टनांपर्यंत क्षमता वाढवली. या मशिनरीकडून ४ ते ५ लाख टन क्रशिंग दर वर्षी करण्यात येत आहे. श्री. प्रदीप जाधव, श्री. सुरेंद्र गिरमे, श्री. विजयकांत कुदळे, श्री. अरुण पांढरे हे निवृत्त झाले आहेत तर नव्या पिढीतील चेअरमन श्री. कृष्णकांत कुदळे, व्हा. चेअरमन श्री. विलास इनामके, मॅनेजिंग डायरेक्टर श्री. राजेंद्र गिरमे, होलटाईम डायरेक्टर श्री. वसंतराव ताम्हाणे, संचालक श्री. अरविंद जाधव, श्री. विजयराव गिरमे, श्री. नंदकुमार गिरमे, श्री. सतीश गिरमे, श्री. गणेश इनामके, श्री. प्रवीण पांढरे, श्री. अश्विन गिरमे, श्री. परेश राऊत हेदेखील चांगला कारभार चालवीत आहेत. याप्रमाणे नवीन तरुण पिढीकडे कारखान्याची सूत्रे आहेत. श्री. पवारसाहेबांचे व माळीनगरचे शालेय जीवनापासून जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यांच्याकडून यापुढेही आम्ही मदतीची अपेक्षा करतो.

***

# मार्ग चालूया प्रगतीचा...



**जयश्री वसंतराव राऊत**
माळीनगर
**मोबा. नं. ९८२३०३५४५५**

१९३२ साली सासवड गावावरून स्थलांतरित झालेल्या आपल्या समाजातील कर्तबगार व्यक्तींनी दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. ची स्थापना केली. श्री गहिनीनाथ महाराजांचा कृपाशीर्वाद व श्री शंकर महाराजांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या या माळीनगरच्या पवित्र भूमीत शुगर फॅक्टरीच्या रूपाने माळीनगरच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली गेली. तर असे हे माळीनगर जिला आपल्या कर्तबगार लोकांनी स्वतःच्या कष्टांनी समृद्ध केले, त्या सर्वांना माझे लाख लाख प्रणाम. त्या कर्तबगार व्यक्तींत माझे सासरे भाऊसाहेब ऊर्फ श्री. शंकरराव भाऊराव राऊत व माझे आजोबा कै. रावबहादूर नारायणराव सोपानराव बोरावके हेही होते याचा मला खूप आनंद व अभिमान आहे. अशी आमची नाळ फॅक्टरीशी जुळली गेली आहे. त्यामुळेच फॅक्टरीच्या सर्व यशाने आमचा ऊर भरून येतो.

१९३२ साली सुरू झालेल्या फॅक्टरीत आपल्या सर्व सभासद व समाजबांधवांच्या सहकार्याने आपण खूप प्रगती केलेली आहे. शुगर फॅक्टरी व शेतकऱ्यांना लागणारी खते, बियाणे पुरवविण्यासाठी व शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला माल खरेदी-विक्री करण्यासाठी व शेतकऱ्यांना लागणारे भांडवल पुरविण्यासाठी शुगरकेन सोसायटीची स्थापना झाली. त्याचा शेतकऱ्यांना खूपच फायदा होतो आहे.

माळीनगर शुगर फॅक्टरीने नुसता शेतकऱ्यांचाच विचार न करता येथील शेतकरी, कामगार, शेतमजूर यांच्या मुलांच्या बालवाडी, मॉडेल हायस्कूल, गुलमोहर इंग्लिश मीडियम स्कूलची स्थापना केली. तेथे होणारे १५ ऑगस्ट व २६ जानेवारीचे कार्यक्रम, त्याला येणारे वेगवेगळ्या क्षेत्रांतील प्रतिष्ठित प्रमुख पाहुणे यांनी कार्यक्रमाची शोभा द्विगुणित होते. त्या वेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेले कार्यक्रम व एकूणच सर्व शिस्त पाहून मन आचंबित होते. आपल्या शाळेतील अनेक मुले व मुली आज उच्चशिक्षित होऊन देश-परदेशात उच्चपदस्थ आहेत. माळीनगर येथे स्त्रियांसाठी महिला मंडळ स्थापून स्त्रियांच्या कलागुणांना वाव दिला जातो. स्त्रियांसाठी वेगवेगळे कार्यक्रम व स्पर्धा आयोजित केल्या जातात.

तरुण वर्गासाठी जिमखाना, बॅडमिंटन, टेनिस कोर्ट अशा व्यायामासाठी सुविधा पुरविल्या जातात. प्राणायाम - योगासनांचे वर्ग घेतले जातात. त्यात स्त्री-पुरुष सर्वजण सहभागी होतात. तर संध्याकाळी ज्येष्ठांना विरंगुळा म्हणून पत्ते, कॅरम



सावित्री उद्यान.

अशा गोष्टींचीही सोय केलेली आहे.

तसेच श्री. संत सावता महाराज पुण्यतिथी, गहिनीनाथ मंदिर व श्री. शंकर महाराज पुण्यतिथी गणपती उत्सव व आषाढी वारीतील तुकाराम महाराज पादुकांचे पूजन व वारकऱ्यांचा भोजन समारंभ करून चांगला आदर्श भावी पिढीसमोर ठेवून त्यांच्यावर नकळत चांगले संस्कार घडविण्याचे काम फॅक्टरी करीत आहे. फॅक्टरीने नुसती साखर तयार करणे एवढेच उद्दिष्ट न ठेवता काळाप्रमाणे बदलून मोलॅसीस बेस डिस्टिलरी, ग्रेन बेस डिस्टिलरी व आता सहवीज निर्मिती करून भरीव प्रगती केली आहे.

कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे यांनी माळीनगर विकास मंडळाची स्थापना करून माळीनगरचा विकास खूपच केला आहे. तसेच माळीनगर येथे सावित्री उद्यान व नक्षत्रगार्डन केले आहे. त्याचा लाभ सर्वांना होत आहे.

पुण्याच्या मध्यवर्ती भागात कंपनीचे हॉटेल सेंट्रल पार्क असल्याने सभासदांच्या राहण्याची, लग्नकार्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना राहण्यासाठी रास्त दरात सोय केली आहे.

या फॅक्टरीच्या उभारणीत व प्रगतीत आमचे राऊत कुटुंबीयांचे निश्चितच भरीव योगदान आहे. श्री. भाऊसाहेब राऊत हे तर संस्थापक सदस्य व पुढे बराच काळ संचालक होते. त्यानंतर माझे मोठे दीर कै. सदानंद शंकरराव राऊत यांनीही संचालकपद भूषविले. त्यानंतर माझे पती कै. श्री. वसंतराव शंकरराव राऊत यांनी अंदाजे २८ वर्ष फॅक्टरीच्या कामकाजात निरपेक्ष बुद्धीने व




कारखान्याचा पेट्रोलपंप.

निःस्वार्थीपणे आपले योगदान दिले कै. श्री. वसंत आप्पांनी संचालक, व्हाईस चेअरमन, चेअरमन व होलटाईम डायरेक्टर अशी पदे भूषवली व आपल्या अनुभवाचा, ज्ञानाचा फॅक्टरीला व समाजाला निश्चित फायदा मिळवून दिला. सभासद व संचालक मंडळाच्या सहकार्यामुळेच ते सर्व काही करू शकले, त्याबद्दल मी सभासद व संचालक मंडळाची आभारी आहे. आता आमची तिसरी पिढी श्री. परेश दिगंबर राऊत हे संचालक म्हणून कार्यरत आहेत.

३ ऑक्टोबर २००८ रोजी वसंत आप्पांचे अल्प आजाराने निधन झाले व आमच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यानंतर मला फॅक्टरीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे यांनी अत्यंत मोलाचे सहकार्य केले. तसेच फॅक्टरीचे होलटाईम डायरेक्टर, चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ, शेती खाते, पाणीपुरवठा खाते, त्यातील सर्व अधिकारी व पाटकरी तसेच सिक्युरिटी व शुगरकेन सोसायटी पदाधिकारी व स्टाफ या सर्वांनी मला व माझा मुलगा श्री. सत्यजित याला खूप सहकार्य केले, त्याबद्दल त्या सर्वांची मी शतशः ऋणी आहे.

आज आपली फॅक्टरी ८१ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे व आपला सहवीज प्रकल्पही सुरू होत आहे. आपल्या फॅक्टरीची अशीच उत्तरोत्तर प्रगती व भरभराट होऊन फॅक्टरीला वैभवशाली




निशीगंध मार्केट.

दिवस यावेत ही प्रभूचरणी प्रार्थना. हा दिवस पाहण्यास आपले मॅनेजिंग डायरेक्टर श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे व त्यांचे सहकारी यांनी अहोरात्र कष्ट घेतले आहेत, याची मला दखल घ्यावीच लागेल.

मी जयश्री वसंतराव राऊत पूर्वाश्रमीची कु. जयश्री विनायकराव पिंगळे जिचा जन्म पुणे येथे व शालेय़ शिक्षण पुण्यातील नामांकित शाळा हुजूरपागा व महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन महाविद्यालय येथे झाले. ती मुलगी माळीनगरसारख्या सुसंपन्न गावातील प्रगतिशील शेतकरी कै. भाऊसाहेब ऊर्फ शंकरराव भाऊराव राऊत यांचे चिरंजीव श्री. वसंतराव शंकरराव राऊत Msc Agri यांच्याबरोबर विवाह करून १९७० साली माळीनगरमध्ये आली व येथेच रमली. शहरात राहिलेली मुलगी येथे कशी रमली त्याला कारणही तसेच होते, ते म्हणजे माळीनगर व माळीनगर परिसरातील दि सासवड माळी शुगर फॅक्टरी.

या सुवर्ण दिनास माझ्या व माझा मुलगा श्री. सत्यजित वसंतराव राऊत व संपूर्ण राऊत कुटुंबीयांकडून लाख लाख शुभेच्छा.

हातात हात धरुया एकजुटीचा
मार्ग चालुया प्रगतीचा

***

# चौफेर प्रगती



**श्री. मधुकर रामचंद्र पिंगळे**
माळीनगर
मो.नं. ९४२०७८२२९३

दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. या आमच्या कंपनीत सलग ३९ वर्षे दीर्घकाळ सेवा करण्याची संधी मला मिळाली. गॅरेज इन्चार्ज, ऑफिस सुपरिंटेंडेंट आणि इस्टेट मॅनेजर या पदावर काम करताना मला खूप काही शिकायला मिळाले. पुणे जिल्ह्यातील राजगुरुनगर येथून नोकरीच्या निमित्ताने येथे आलो आणि या मंडळीच्या आपुलकीच्या व प्रेमाच्या वागणुकीमुळे माळीनगरवासीय होऊन येथे आता स्थिरावलो आहे. कारखान्याचे त्या वेळचे मॅनेजिंग डायरेक्टर हरिभाऊ गिरमे यांच्या हाताखाली काम करण्याचे भाग्य मला लाभले. सचोटीने काम करण्याची उमेद या काळात मनामध्ये रुजली. कारखान्यात क्लेरिकल नोकरीने माझ्या सेवेचा प्रारंभ झाला आणि ३९ वर्षांनंतर इस्टेट मॅनेजर या पदावरून मी निवृत्त झालो. त्या कालखंडात कारखान्याच्या वाटचालीत अनेक खडतर प्रवासाचे टप्पे पाहायला मिळाले, अनेक स्थित्यंतरे झाली, कठीण प्रसंग आले परंतु गहिनीनाथ महाराज आणि शंकर महाराज यांच्या पुण्याईने कारखान्याची सतत प्रगती होत राहिली आहे. कारखान्याचा रौप्यमहोत्सव आणि सुवर्णमहोत्सव साजरा होतानाचे सुवर्णक्षण मी अनुभवले. कारखान्याचा हा दीर्घ यशस्वी कालखंड आनंदोत्सवाच्या रूपाने साजरा केल्यानंतर कारखान्याने अमृतमहोत्सवाचा टप्पाही पार केला असून आता शतकपूर्तीच्या दिशेने ही कंपनी प्रवास करीत आहे, याचा खूप आनंद आहे. या कारखाना परिसरातील कामगारांमध्ये कारखान्याविषयी खूप आदराची भावना आहे. सर्व जाती-धर्मांतील व्यक्तींना कारखान्याने सेवेत घेऊन सर्वधर्मसमभावाची जपणूक केली आहेच. पण त्याचबरोबर हा सर्वधर्मसमभाव संचालक मंडळाने आपल्या कृतीतूनही सिद्ध केला आहे.

सन १९९४ साली २५०० टन क्षमतेच्या कारखान्याची उभारणी झाली. तेव्हापासून खऱ्या अर्थाने कारखान्याच्या भरीव प्रगतीला सुरुवात झाली आहे. या नव्या कारखान्याच्या उभारणीनंतर मोलॅसीस बेस्ड डिस्टिलरी, ग्रेन बेस्ड डिस्टिलरी उभारणी झाली. आणि त्यानंतर आता सहवीज निर्मिती प्रकल्पाची उभारणी करण्यात आली आहे. सहवीज निर्मिती प्रकल्प म्हणजे कंपनीच्या शिरपेचातील




महात्मा फुले शॉपींग सेंटर.

मानाचा तुरा आहे.

आजवर अनेक संकटपर्वाच्या प्रसंगी कारखाना टिकविण्यात, वाढविण्यात व प्रगतिपथावर नेण्यात सर्व आजी-माजी चेअरमन, मॅनेजिंग डायरेक्टर आणि संचालक मंडळाचे मोठे योगदान आहे. त्याचबरोबर कारखान्याच्या प्रगतीत आणि माळीनगरच्या वैभवात भर घालण्यात खऱ्या अर्थाने विद्यमान मॅनेजिंग डायरेक्टर राजेंद्र गोपाळराव गिरमे व त्यांच्या सहकाऱ्यांचा सिंहाचा वाटा आहे, असे मला वाटते. सहवीज निर्मितीचे कार्य तडीस गेले आहे. एका अर्थाने त्यांनी कलशारोहण केले आहे असेच म्हणावे लागेल. हरिभाऊंच्या काळात कारखान्यात शिस्त होती, टापटीप होतीच परंतु रंजनभाऊंच्या कार्यकाळात या सगळ्या गोष्टी सोबतच माळीनगरची चौफेर प्रगती झाली आहे. कारखाना प्रगतिपथावर नेण्याबरोबरच सर्वांगसुंदर माळीनगरसाठी त्यांनी केलेले प्रयत्न महत्त्वाचे आहेत.

***

# सर्वांगसुंदर शैक्षणिक परिसर...



**श्री. एम. जी. कुलकर्णी**
माळीनगर

माळीनगरच्या साखर कारखान्याप्रमाणेच माळीनगरचे शैक्षणिक विश्वसुद्धा खूप संपन्न आणि समृद्ध आहे. संख्यात्मक आणि गुणात्मक आलेख सतत उंचावत नेण्यातच या ज्ञानमंदिराने धन्यता मानली आहे.

१९३२-३३ ला साखर कारखाना सुरू झाला. त्यानंतर केवळ ८-९ वर्षांतच शिक्षणाची मुहूर्तमेढ येथे रोवली गेली. ९ जून, १९४१ या दिवशी मॉडेल हायस्कूल माळीनगर सुरू झाले. या वेळी कारखान्याने बालविकास केंद्र सुरू केले होते. पारतंत्र्याचा तो काळ होता. सोलापूर जिल्ह्यात सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, पंढरपूर आणि मोडनिंब वगळता अन्य कोठेही हायस्कूलची सोय नव्हती. प्राथमिक शाळा सर्वत्र होत्या, मात्र हायस्कूल नव्हते. त्या वेळी माळीनगर येथे हायस्कूल सुरू करण्यात आले होते. यातच त्याच वेळच्या मंडळींचा शिक्षण विषयक दृष्टिकोन किती प्रगल्भ होता याची साक्ष पटते, त्या वेळेचे मॅनेजिंग डायरेक्टर हरिभाऊ गिरमे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अगदी प्रयत्नपूर्वक हायस्कूल सुरू केले आणि पुढे वसतिगृह सुद्धा सुरू केले. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याबरोबर शेजारच्या पुणे आणि सातारा जिल्ह्यांतील विद्यार्थीही येथे शिक्षणाला येऊ लागले होते. हायस्कूलच्या सुरुवातीच्या काळात डी. पी. ताम्हनकर, श्री. चव्हाण, श्री. मंगुडकर यांनी मुख्याध्यापकपदाची धुरा सांभाळली. १९५१ मध्ये आर. के. पागे यांच्याकडे मुख्याध्यापकपदाची सूत्रे आली आणि त्यांनी या शाळेचे स्वरूपच पालटून टाकले. कमालीची शिस्त आणि गुणवत्तेचा आग्रह असणाऱ्या पागे सरांच्या काळात शाळेचा लैकिक खूप वाढला. त्या काळात व्ही. जी. कुलकर्णी, श्री. भावे, श्री. साबडे, श्री. लाळे अशा निष्ठावंत शिक्षकांची त्यांना मोलाची साथ मिळाली. पुढे शेतीविषयक अभ्यासक्रमही सुरू करण्यात आला. १९५७ साली या शाळेचे मॉडेल विविधांगी प्रशाला असे नामकरण करण्यात आले. निकोप शैक्षणिक वातावरण असणाऱ्या या शाळेचा रौप्यमहोत्सव १९६० साली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला होता. त्या वेळचे केंद्रीय कृषिमंत्री अण्णासाहेब शिंदे व अमरावतीचे शिक्षणतज्ज्ञ डॉ. सोनार यांची त्या कार्यक्रमाला उपस्थिती लाभली होती. शाळेतून दर वर्षी शर्करा हे नियतकालिक आम्ही प्रकाशित करायचो. रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने त्या वेळी शर्कराचा रौप्यमहोत्सवी अंक प्रकाशित करण्यात आला होता. माळीनगरच्या शैक्षणिक आणि सांस्कृतीचा



मॉडेल विविधांगी प्रशाला, माळीनगर.

आढावा त्यात घेण्यात आला होता. शाळा आणि शिक्षकांविषयी संस्थाचालकांमध्ये आदर होता. शिक्षकवर्गही निष्ठेने काम करीत होता. त्यामुळे एक निकोप शैक्षणिक वातावरण इथे तयार झाले. त्या वेळी मुलाखतीला येणाऱ्या शिक्षकाला एका बाजूचा प्रवासखर्चही दिला जायचा. शिक्षकांची निवासव्यवस्था आणि तेथील वीजव्यवस्था मोफत होती. रस्ते, पाणी या सोयी दिल्या होत्या. अशा पद्धतीने शिक्षकांची काळजी घेणारी दुसरी कुठली संस्था त्या काळातसुद्धा नव्हती आणि आजही नाही. संस्थाचालकांच्या या धोरणांमुळे शिक्षक उत्तम काम करीत होते. त्यातूनच एक चांगले शैक्षणिक वातावरण इथे तयार झाले.

शाळेने अध्यापनाबरोबर कला, क्रीडा व सांस्कृतिक संवर्धनाचे मोठे काम या परिसरासाठी केले आहे. राजकीय, सामाजिक क्षेत्रासह चित्र, नाट्य, संगीत, साहित्य आदी क्षेत्रांतील मान्यवरांचे विचारमंथन इथे सातत्याने होत आले आहे. त्यामुळे या परिसराची वैचारिक व सांकृतिक समृद्धता वाढायला मदत झाली आहे. विविध क्षेत्रांत अनेक विद्यार्थी व शिक्षकांनी नावलौकिक मिळवला आहे. राज्य, राष्ट्रीय स्तरावरील यशाच्या अनेक नोंदींची गौरवगाथा त्यामुळे लिहिली गेली आहे. काळानुरूप दहावी, बारावीची परीक्षा केंद्रे इथे सुरू झाली  आहेत. सहा प्राथमिक शाळा, एक इंग्रजी माध्यमिक शाळा, एक हायस्कूल असणाऱ्या या संस्थेने व्यवसाय अभ्यासक्रम, तंत्रनिकेतन, आय.टी.आय.चे अभ्यासक्रम सुरू करून विद्यार्थी व पालकांची मोठी सोय केली आहे. १९७५ पासुन सुरू झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयानेसुद्धा आपली



शैक्षणिक संकुलाचा भव्यदिव्य परिसर.

गुणवत्ता सिद्ध केली आहे. वाढते अभ्यासक्रम, वाढती विद्यार्थिसंख्या व त्यामुळे निर्माण झालेली गरज लक्षात घेऊन संस्थेने आखीव, रेखीव व शैक्षणिक निकषाची पूर्तता करणाऱ्या भव्य इमारतीही बांधल्या आहेत, त्यामुळे या परिसराच्या शैक्षणिक विस्ताराची कल्पना येते. शाळेसमोर भव्य मैदान, त्यामध्ये विविध क्रीडाप्रकारांची मैदाने, मैदानाभोवती प्रयत्नपूर्वक वाढवलेली झाडे यांमुळे या परिसराला एक रमणीय वातावरण लाभले आहे. रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनचे दुसरे रूपच इथे पाहायला मिळतेच असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

लेखक, कवी, शास्त्रज्ञ, विचारवंत यांचे शाळेमध्ये वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या निमित्ताने येणे होत राहिले आहे. विद्यार्थ्यांना प्रेरणा, प्रोत्साहन मिळावे, मार्गदर्शन व्हावे व उद्याचे सुजाण नागरिक घडायला मदत व्हावी या हेतूने संस्थाचालकांनी हा उपक्रम सुरू केला आहे. शंतनुराव किर्लोस्कर, यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण, ग. दि. माडगूळकर, द. मा. मिरासदार, वसंत शिंदे, राम नगरकर, शरद तळवळकर, निळू फुले आदी विविध क्षेत्रांतील मान्यवर कार्यक्रमाच्या निमित्ताने इथे येऊन गेले आहेत. इथल्या सांस्कृतिक समृद्धतेची ही साक्ष आहे. १९७२ साली पागेसरांना राज्याचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला होता, त्या वेळी पागेसरांच्या सत्कार समारंभाला ग. दि. माडगूळकर उपस्थित होते.

या संस्थेने आपल्या लौकिकाचा आलेख सतत उंचावत ठेवला आहे. श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे हे संस्थेचे सेक्रेटरी झाल्यावर आलेखातील उंचावर जाणारी रेषा खूप गतीने वर गेली आहे. रंजनभाऊंनी स्वतः जातीने लक्ष घातल्याने शैक्षणिक वातावरण खूप समृद्ध होत गेले आहे. काळाची गरज ओळखून त्यांनी अभ्यासक्रमांची संख्या वाढवली, इमारती बांधल्या, चांगले शिक्षक दिले, शिक्षकांच्या चांगल्या कामाला प्रोत्साहन दिले त्यामुळे माळीनगरचा लौकिक वाढला आहे. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विभाग, आय.टी.आय., व्यवसाय अभ्यासक्रम, इंग्लिश मीडियम स्कूल या प्रत्येक ठिकाणी त्यांचे बारीक लक्ष आहे. त्यामुळे कोणत्याही अडचणी येत नाहीत. त्यामुळे साहजिकच एक सर्वांगसुंदर शैक्षणिक परिसर उभा राहण्यात त्यांचे योगदान खूप महत्त्वपूर्ण ठरले आहे.

***

# टाटा-सासवड माळी-अध्यात्म



**श्री. वैभव अशोक यादव**
माळीनगर
**मोबा. ९४२३०६५७५०**

टाटा आणि सासवड माळी यांच्या विचारामध्ये बरेच साम्य आहे. टाटा वस्त्रोद्योगामध्ये होते. ते नवीन उद्योगाच्या शोधात होते. पोलाद हा उद्योग भारताला औद्योगिक क्रांतीकडे घेऊन जाणारा महामार्ग आहे. असे जमशेटजी टाटांना वाटत होते. म्हणून त्यांनी भारतभर लोहखनिज व चुनखडीचे साठे शोधण्यासाठी सुरुवात केली. त्यास यश आले. बिहारमध्ये त्यांना लोहखनिज व चुनखडीचे मोठे साठे सापडले. १९०७ साली टाटा स्टील कंपनीची स्थापना झाली. २५ वर्षांनंतर म्हणजे १९३२ साली दि सासवड माळी शुगर फॅक्टरीची स्थापना झाली. कंपनीने कृषी औद्योगिक क्षेत्रामध्ये मुहूर्तमेढ रोवली. त्यासाठी सासवड - बारामती - कोपरगाव - श्रीरामपूर नंतर माळीनगर असा त्यांचा प्रवास झाला. जमशेटजी टाटांनी पोलाद कारखाना उभारताना आपला मुलगा दोराबला काही महत्त्वाच्या सूचना केल्या. त्यामध्ये प्रकल्पाच्या कामामध्ये मोठे रस्ते असावेत, हिरवळ आणि बगीच्यासाठी भरपूर जागा असावी. क्रीडांगणासाठी जागा ठेवावी. हिंदूची मंदिरे आणि मुसलमानांच्या मशिदीसाठी जागा राखून ठेवाव्यात अशा सूचना केल्या होत्या. माळीनगरमध्ये भव्य रस्ते व त्या कडेने डेरेदार वृक्ष आहेत. माळीनगर गर्द वृक्षांच्या छायेत आहे. भव्य क्रीडागंण आहे. येथे मंदिर आहे, मशिद आहे.  टाटांनी देश - विदेशात आपल्या नावाचा विश्वास निर्माण केला, जोपासला आहे तोच विश्वास सासवड माळीने जोपासला आहे.

माळीनगरचा आणि अध्यात्माचा फार जवळचा संबंध आहे. विज्ञान युगामध्ये अध्यात्माचा उपयोग काय असे अनेकांना वाटते. विज्ञानाला फार मर्यादा आहेत. विज्ञान जेथे थांबते तेथून अध्यात्माला सुरुवात होते. अध्यात्मामध्ये ज्ञानविज्ञान हा भाग आहे. श्री शंकर महाराजांचे माळीनगरला झालेले आगमन, वास्तव्य हीदेखील ऐतिहासिक घटना आहे. कारखान्यास व परिसरास त्यांचे सुरक्षाकवच लाभलेले आहे. ह.भ.प. सोनोपंत दांडेकर, ह.भ.प. साखरे महाराज, डॉ. भाई कारखानीस, ब्रह्माकुमारी उषा बहेनजी, डॉ. शंकर अभ्यंकर, रामानंद सरस्वती महाराज इत्यादी अध्यात्मातील सत्पुरुष माळीनगरला आले होते.

आज एकविसाव्या शतकात पाहिले तर



संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे माळीनगरातील स्वागत.

कोणालाच वेळ नसतो. आपल्या कामालाच परमेश्वर मानणारे संत सावतामाळी बाराव्या शतकात होऊन गेले. श्री ज्ञानेश्वर महाराज, श्री नामदेव महाराज, श्री गोरा कुंभार हे त्यांचे समकालीन संत. कंपनीच्या दर्शनी भागातच संत सावतामाळी यांचा पुतळा बसविला आहे. तसा पुतळा अजून कोठेही पाहावयास मिळाला नाही.

माझे आजोबा श्रीपती मारुती यादव कंपनीच्या प्रिंटिंग प्रेसमध्ये कामास होते. त्या वेळी भिकू सावळाराम भुजबळ लिखित श्री संत सावता महाराज यांच्या पोथीच्या छपाईचे काम कंपनीच्या प्रेसमध्ये झाले. सन १९५२ पासून आजतागायत म्हणजे गेली ६१ वर्षे सावता महाराज यांची पोथी आमच्या घरी वाचली जाते. सावता माळी पुण्यतिथीच्या दिवशी त्याची समाप्ती होते. सावता महाराजांची पोथी, सावता दर्शन, सावता माळी चित्रमय जीवन दर्शन हे साहित्य कंपनीने प्रकाशित करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.

संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा माळीनगरमार्गे पंढरपूरला जातो. महाराष्ट्रातील लाखो लोक या सोहळ्यामध्ये सहभागी असतात. पालखी सोहळ्यात अश्वाचे उभे रिंगण होते. डोळ्याचे पारणे फेडणारा हा कार्यक्रम होतो.

***

# दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटी




गुलमोहोर इंग्लीश स्कूलची देखणी व भव्य इमारत.

दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीची स्थापना १९४२ साली झालेली असून, मागील ६९ वर्षापासून माळीनगर व परिसरामधील विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य या संस्थेच्या माध्यमातून सुरू आहे. आज संस्थेमध्ये ६ प्राथमिक शाळा, दि मॉडेल विविधांगी प्रशाला व कला व शास्त्र किमान कौशल्य कनिष्ठ महविद्यालय, गुलमोहर इंग्लिश स्कुल सुरू आहे. आधुनिक युगातील शिक्षणाची गरज ओळखून संगणक प्रशिक्षण सुरु केलेले आहे. तसेच व्यवसाय शिक्षणाची सोय व्हावी म्हणून केंद्र सरकार पुरस्कृत औद्योगिक प्रशिक्षण सुरु केलेले आहे. या संस्थेच्या शैक्षणिक वटवृक्षाखाली जवळ जवळ ६००० विद्यार्थी ज्ञानार्जनाचे कार्य करीत आहेत. तसेच १९९० पासुन टेक्निकल विभाग चालू असुन प्रशस्त अशी इमारत व संगणक शाळा व मुलांच्या शारिरीक विकासासाठी सुसज्ज अशी व्यायाम शाळा व भव्य मैदान आहे.

विद्यार्थ्यांचा संर्वागीण विकास व्हावा म्हणून माळीनगर कमांडो प्रशिक्षण २ ते १३ मे अखेर भरविले जाते. यात २००० विद्यार्थी सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होतात, १५ ऑगस्ट व २६ जानेवारी हे राष्ट्रीय सण विशेष आकर्षक पद्धतीने साजरे केले जातात. एन. सी. सी., स्काउट, गाईड यांचे आतिशय शिस्तबध्द पद्धतीने संचलन केले जाते. प्रशालेत एन सी सी, एम सी सी, शारीरीक शिक्षण विभाग,

शेती विभाग गृहउद्योग, संगणक प्रयोगशाळा विभाग असून भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र यांच्या सुसज्ज अशा प्रयोगशाळा आहेत. १९८३ रोजी गुलमोहर इंग्लिश स्कूलची स्थापना झाली असून या विभागाची स्वतंत्र तीन मजली इमारत आहे. तिथे नर्सरी ते उच्चमाध्यमिक स्तरापर्यंतचे इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देण्यात येते. त्याचबरोबर संगीताची आवड निर्माण होण्यासाठी संगित शिक्षकांच्या मदतीने आधुनिक १३ वाद्यांसह ४० कलावंतांचा बालवाद्यवृंद जुलै २०१३ पासुन सुरु केलेला आहे. त्याचबरोबर औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात इलेक्ट्रिशियन, फिटर, वेल्डर, पेंटर, मोटार मॅकेनिक, डिझल मॅकेनिक हे अभ्यासक्रम आहेत. अनेक उपयोगी पडणाऱ्या अनेक वस्तुंचे उत्पादन करण्याचे प्रशिक्षण तेथे विद्यार्थ्यांना देण्यात येते. प्रशिक्षणांवर अनेक विद्यार्थ्यांना निरनिराळ्या कंपन्यांमध्ये काम करण्याची संधी येथून मिळत आहे. आतापर्यंत १०० जणांना अशी संधी मिळालेली आहे. संस्थेच्या किमान-कौशल्य विभागातही ॲटोमोबाईल्स, इलेक्ट्रीकल्स, मॅकॅनिकल्स इ. विभाग आहेत. तेथील प्रशिक्षणानंतर या विद्यार्थ्यांना पॉलिटेक्निक, इंजिनियरींग मध्ये प्रवेश मिळवण्यासाठी तसेच कंपन्यांमध्ये ॲपरेंन्टीसशीप मिळविण्यासाठी मोठी मदत होत आहे. आत्तापर्यंत ३०० जणांनी याचा लाभ घेतलेला आहे. मॉडेल विविधांगी प्रशालेची शारीरीक शिक्षण विभागाची कामगीरी ही उल्लेखनिय आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर जंपरोप स्पर्धेत शिवम कणगी व ओंकार पांढरे या दोन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविलेला आहे. बांबू उडी, हँडबॉल, वेटलिफ्टींग इ. स्पर्धेत राज्य व राष्ट्रीय स्तरावर १२० खेळाडूंनी सहभाग नोंदविलेला आहे.

सुर्यनमस्कार , प्राणायाम, योगासन इ. शिबीरे प्रशालेत आयोजित करुन दरवर्षी प्रशालेतील अनेक विद्यार्थी सहभागी होतात. एन.सी.सी. विभागातर्फे प्रशालेतील कॅडेट्सनी आत्तापर्यंत अनेक राष्ट्रीय स्तरावरील कॅम्पमध्ये सहभाग नोंदविलेला आहे. जुन २०१३ पासुन ३० मुलींसाठी एन.सी.सी. चा ज्युनियर विभाग चालू करण्यात आलेला आहे. प्रशालेत चित्रकला विभागात सकाळ चित्रकला स्पर्धा, तसेच इतर संस्थामार्फत होणा-या स्पर्धा आयोजित केल्या जातात . राज्यस्तरावर सकाळ बालचित्रकला स्पर्धेत कु. अबोली जयवंत चौरे ह्या विद्यार्थिनीलास रू.२५००/चे प्रथम पारितोषीक मिळालेले आहे. गेल्या दहा वर्षात इयत्ता १० वी व १२ वी चे निकाल सातत्याने ८० टक्केच्या पुढे लागत आहेत. शेती विभागाकडे आधुनिक शेती बद्दल विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येते. केंद्र सरकारचा राष्ट्रीय हरीत सेना प्रकल्प राबवून पर्यावरण संरक्षणाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली जाते. सामाजिक वनीकरण विभागातर्फे जिल्हास्तरीय उत्कृष्ट रोपवाटीका प्रथम क्रमांक तसेच जिल्हास्तरीय उत्कृष्ट विको क्लब पुरस्कार मिळालेला आहे. वैज्ञानीक जाणीव विद्यार्थ्यात निर्माण होण्यासाठी अंधश्रद्धा

निर्मुलन समितीचे काम विशेष उल्लेखनीय आहे. या समितीद्वारे फटाके. अभियान, साधना, वाचन, संस्कृती अभियान, इ. द्वारे विद्यार्थ्यामध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य केले जाते.

प्रशालेच्या भुगोल विभागाकडे ६ इंची टेलिस्कोप असून प्रशालेतील विद्यार्थ्यांना आकाश दर्शनाची माहिती व मार्गदर्शन केले जाते. शैक्षणीक वर्ष २०११ - २०१२ मध्ये प्रशालेतील १००० विद्यार्थ्यांना गुरु ग्रह व त्याचे चार उपग्रह दाखविण्याचा उपक्रम राबविल्याबद्दल पुणे येथील ॲस्टो क्लब यांचे मार्फत ४ इंची टेलीस्कोप प्रशालेस भेट मिळाली आहे. तसेच भुगोल विभागामध्ये खास अमेरिकेहुन मागविलेले ९० थ्रीडी फोटो आहेत. सदर थ्रीडी फोटो मंगळ गृह, चंद्राचा पृष्ठभाग, चंद्राचा उपग्रह, उत्तर अमेरीकेतील ग्रॅड कॅनीयन दरी, काही प्राणी पक्षी यांचा समावेश असुन, विद्यार्थ्यांना थ्रीडी ही संकल्पना समजावून सांगता येते. हे थ्रीडी फोटो पाहण्यासाठी खास थ्रीडी गॉगल्स वापरावे लागतात.

संस्थेत पहिली ते उच्च माध्यमिक स्तरापर्यंत राष्ट्रीय दृष्टीकोनातून आदर्श नागरीक कसे तयार होतील या बाबत सातत्याने शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. अनेक प्रकारचे उपक्रम राबवीत असतात. यासाठी संस्था सातत्याने मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत देत असल्याने हे सर्व शक्य होत आहे.

***

## अखिल भारतीय माळी शिक्षण संस्था

महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सर्व स्त्री-पुरूषांनी शिक्षण घेतले पाहिजे यासाठी दिलेले योगदान अतुलनीय असेच आहे. त्याच्या शिक्षण विचारांचा आदर्श माळी समाजातील मंडळींसमोर आहे. शिक्षणाचे महत्त्व संस्थेच्या संस्थापकांना समजले होते. या परिसरातील सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. पैशावाचून कोणी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून १९४० साली क्षत्रिय माळी शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेमाफत समाजातील गरजू मुलां-मुलींना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत दिली. ही परंपरा आजही सुरू आहे. या संस्थेतून शिक्षण घेतलेले अनेकजण आज विविध ठिकाणी वरिष्ठ पदावर काम करीत आहेत. श्री. कृष्णकांत शंकरराव कुदळे हे या संस्थेचे अध्यक्ष आहेत.

# सावित्रीच्या लेकी




सावित्री महिला औद्योगिक सहकारी संस्थेचे संचालक मंडळ - डावीकडून उज्वला पांढरे, नलिनी नवले, वंदना भरवीरकर, साधना रासकर, साधना गिरमे, प्रमिला रासकर, निलम पांढरे, संगीता जाधव, लिना गिरमे, रजनी इनामके.

## सावित्री महिला औद्योगिक सहकारी संस्था

सावित्री महिला औद्योगिक सहकारी संस्थेची स्थापना दि. १३ ऑक्टोंबर १९८३ रोजी झाली. माळीनगरमध्ये महिलांनी चालविलेली ही एकमेव संस्था आहे. कै . अनुसयाबाई अनंतराव पांढरे व कै. यमुनाबाई जगन्नाथराव रासकर व त्यांच्या सहकारी महिलांनी ही संस्था स्थापन केली. या संस्थेच्या दोन कांडप मशिन, दोन पिठाच्या गिरण्या, दोन ग्रँडर आहेत. येथे गहू, ज्वारी,बाजरी आदी धान्याचे दळण करून दिले जाते. तसेच तांबडे काळे तिखटाचे कांडप करून दिले जाते. साखर, खारीक, खोबरे, शिकेकाई तसेच उपवासाच्या पदार्थाचे कांडप केले जाते व विक्री ही केली जाते. सौ. साधना राजेंद्र गिरमे या संस्थेच्या विद्यमान चेअरमन आहेत. सौ. निलम उदय पांढरे या व्हाईस चेअरमन, सौ. साधना हेमंत रासकर या सेक्रेटरी आहेत. तर सौ. उज्वलाताई अरूणराव पांढरे, सौ. प्रमिलाताई प्रभाकरराव रासकर, सौ. संगीता रत्नदिप जाधव, सौ. नलिनी राजू नवले, सौ. लिना अरूण गिरमे, श्रीमती रजनी दत्तात्रय इनामके या सदस्या आहेत. महिलांच्या या औद्योगीक संस्थेचे काम अतिशय चांगल्या पध्दतीने सुरू आहे.

***

# महिला मंडळ




महिला मंडळाचे संचालक मंडळ - हेमलता खताळ, छाया यादव, उज्वला पांढरे, साधना गिरमे, जयश्री झगडे, लिना गिरमे, प्रमिला रासकर, नलिनी नवले, निलम पांढरे, साधना रासकर, सारंगा गिरमे, वंदना भरवीरकर, संगीता जाधव.

सभासदांच्या व कामगारांच्या महिलांना त्यांच्या विचारांना व त्यांच्यातील सुप्त गुणांना संधी मिळावी म्हणून १९४२ साली महिला मंडळाची स्थापना करण्यात आली. सौ. पार्वतीबाई हरिभाऊ गिरमे या महिला मंडळाच्या पहिल्या अध्यक्षा होत्या. त्यानंतर सौ. लक्ष्मीबाई रामचंद्र गिरमे, सौ. अलकाबाई भगवंतराव जाधव, सौ. सरलाबाई ग. देशपांडे, सौ. अनुसयाबाई अनंतराव पांढरे, सौ. द्रोपदीबाई माधवराव राऊत, सौ. यमुनाबाई जगन्नाथ रासकर, सौ. दमयंतीबाई कृष्णकांत गिरमे, सौ. अंजनीबाई परशुराम गिरमे, सौ. इंदूताई सदानंद राऊत, सौ. प्रमिलाताई प्रभाकर रासकर, श्रीमती शांताबाई काशिनाथ जगताप, सौ. साधनाताई राजेंद्र गिरमे, सौ. उज्वलाताई अरूणराव पांढरे यांनी या महिला मंडळाचे अध्यक्षपद भूषविले आहे. महिला मंडळामार्फत वर्षातील पारंपरिक सण मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. तसेच विविध प्रकारच्या स्पर्धा, व्याख्याने आयोजित केल्या जातात. सौ. निलम उदयराव पांढरे या विद्यमान अध्यक्षा आहेत. सौ. संगीता रत्नदिप जाधव आणि सौ. लीना अरूणराव गिरमे या उपाध्यक्षा आहेत. खजिनदार पदाची जबाबदारी सौ. जयश्री सतीश झगडे यांच्याकडे आहे. तर श्रीमती छाया प्रकाश यादव व सौ. हेमलता बबन खताळ या सेक्रेटरी आहेत.

***

# शुगरकेन सोसायटी




शुगरकेन सोसायटीचे ऑफीस.

१९३४-३५ साली ऊस व इतर पीके घेताना त्याकरीता लागणारा पैसा आजच्या प्रमाणे वित्तसंस्था किंवा बँकाकडून उपलब्ध होण्याची पध्दत नव्हती. यामुळे सभासद खाजगी व्यापाऱ्याकडून किंवा सावकरांकडून पीक जोपासणेसाठी जादा व्याज दराने पैसे घेऊ लागले. यामुळे उत्पन्नातील मोठा भाग व्यापारी किंवा सावकार यांना जात होता. यावर तोडगा म्हणून स्वत:ची संस्था असावी या भावनेतून १९५६ मध्ये कारखाना कार्यस्थळावर एक मिटींग झाली. त्यामध्ये पिक जोपासणेसाठी येणा-या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी सोसायटी स्थापनेचा विचार झाला. त्या विचाराची अमंलबजावणी होऊन १९ मे १९५६ रोजी शुगरकेन प्रोड्युसर्स विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि; माळीनगर या नावाने संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फत ऊस पीक व इतर पिकांना तसेच बोअर,पाईपलाईन, ठिबक सिंचन, फळबागा इत्यादी करीता संस्था कमी व्याज दरामध्ये रक्कम उपलब्ध करून देते. पुर्वी वेगवेगळ्या पिंकांना आवश्यक खते फॉरम्युल्यानुसार हाताने मिक्श्चर तयार करीत होते काळाच्या प्रगतीत देऊळ छाप मिश्रखते यांत्रिक पध्दतीने  तयार केली जात असे .काळानुरूप अकलूज, टेंभुर्णी येथे आडत दुकान चालू केले. पिकाला लागणारी औषधे, खते शेतक-यांना पुरवली जातात. वेळोवेळी परीसंवादाचे आयोजन केले जाते. श्री. सुरेश अनंतराव राऊत हे विद्यमान चेअरमन आहेत. श्री. सुबोध धनंजय गिरमे व्हा. चेअरमन आहेत.तर श्री. दिनेश मधुकरराव गिरमे, श्री. अरविंद काळबा म्हेत्रे, श्री. नितीन राजाराम झगडे, शालिनी कृष्णकांत राऊत, श्री. विजयकुमार लक्ष्मणराव नेवसे, श्री. निखिल विजयकांत कुदळे, श्री. विशाल अरविंदराव जाधव, श्री. पुष्कर दिलीपराव इनामके, श्री. संदीप जगन्नाथराव बोरावके, श्री. मनोहर गोपाळा जाधव हे संचालक आहेत.

# महात्मा फुले पतसंस्था




## सर्वसामान्यांचा आर्थिक आधारवड

माळीनगर व परिसरातील सभासद, कामगार, नागरिक, व्यापारी यांना आर्थिक अडचणीच्या काळात आधार देण्याच्या हेतूने ३ मार्च १९९४ रोजी श्री. हरिभाऊ वाघमोडे यांनी महात्मा फुले पतसंस्थेची स्थापना केली. ही पतसंस्था माळीनगर परिसरामधील अग्रगण्य पतसंस्था म्हणून ओळखली जाते. सुमारे दहा कोटी रूपयांच्या ठेवी या पतसंस्थेत असून वार्षिक उलाढाल साठ कोटीपर्यंत आहे. संस्थेने सभासदांसाठी आरटीजीएस, डीडी अशा बँकींग सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. संस्था संपूर्ण संगणीकृत आहे. संस्थेचा ऑडीट वर्ग 'अ' आहे. संस्थेचे संचालक भत्ते घेत नाहीत हे विशेष. राजकीय व गैर कर्ज वाटप केले जात नाही. संस्थेची वसूली ९५ ते ९८ टक्के असते. त्यामुळे संस्थेची आर्थिक परिस्थिती भक्कम आहे. श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे हे विद्यमान चेअरमन आहेत.

श्री. महादेव खंडू एकतपुरे व्हा. चेअरमन आहेत तर श्री. विजयराव सिताराम रासकर, श्री. किरण यशवंत गिरमे, श्री. हेमंत प्रभाकर गिरमे, श्री. दुष्यंत वसंतराव ताम्हाणे, श्री. दिलीप निवृत्ती कुदळे, श्री. निळकंठ राजाराम भोंगळे, श्री. जयवंत रमेश चौरे - संचालक, श्री. उल्हास तुकाराम गिरमे, श्री. सतीश दिगबंर गिरमे, श्री. चंद्रकांत मारूती जाधव, श्री. कृष्णा मारूती भजनावळे, श्री. अंकुश विठोबा फुले, श्रीमती प्रभा बाबुराव काळे हे संचालक मंडळातील सदस्य आहेत.

***

# माळीनगर विकास मंडळ



माळीनगर फेस्टीवल

माळीगरचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून २००६ साली श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे यांनी माळीनगर विकास मंडळाची स्थापना केली. माळीनगरमाध्ये कुठल्याही प्रकारची यात्रा भरत नव्हती. माळीनगर मधील नागरिकांच्या व शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने या मंडळाच्या माध्यमातून माळीनगर फेस्टीवल हायस्कुलच्या भव्य प्रांगणात भरवायला सुरूवात केली.

माळीनगर फेस्टीवलची दशकपुर्ती होऊन यंदा त्याचे अकरावे वर्ष आहे. फेस्टीवलच्या ४ ते ५ दिवसाच्या कालावधीत जवळ जवळ एक लाख लोक भेट देऊन जातात. विविध स्टॉल्स, खेळणी, मनोरंजन पार्क, ग्रामीण भागात जे पहायला मिळणार नाही असे गो कार्टींग, रिमोटवरील विमान प्रात्यक्षीक, अंधश्रद्धा निर्मुलन, बग्गी, हत्ती, घोडे, उंट, तालबध्द कारंजे तसेच जवळ जवळ १००० विद्यार्थी विविध गुण दर्शनाच्या कार्यक्रमात भाग घेत असतात. माळीनगरसह परिसरातील अबालवृध्द त्यात सहभागी होतात. या फेस्टीवलला आजवर अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या आहेत. माळीनगर विकास मंडळ, दि सासवड माळी एजुकेशन सोसायटी व दि सासवड माळी शुगर फॅक्टरी यांच्या संयुक्त विद्यमाने माळीनगर फेस्टीवलचे आयोजन केले जाते. माळीनगर विकास मंडळ नागरिकांसाठी विधायक कामे करीत असते. अंधश्रध्दा निर्मुलन ,रक्तदान शिबीरे, वधु-वर सुचक मेळावे, वृक्षारोपण, आरोग्य शिबिरे इत्यादीचा समावेश आहे.

***

# माळीनगर मल्टीस्टेट




माळीनगर मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडीट सोसायटीचे कार्यालय

***

माळीनगर मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडीट सोसायटीचे उद्‌घाटन दि. १६ ऑगस्ट २०१३ रोजी राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छतामंत्री श्री. दिलीपराव सोपल यांच्या शुभहस्ते झाले आहे. महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांचे या संस्थेचे कार्यक्षेत्र आहे. साखर कारखानदारी, दुध प्रकल्प, सोलर, वीजप्रकल्प आदी उद्योग-धंद्यांसाठी ही संस्था आधारभूत ठरणारी आहे. असा एखादा उद्योग करण्याचा मानस या संस्थेच्या स्थापनेमागे आहे. संस्थेची सुसज्ज व भव्य अशी इमारत आहे. अल्पावधीतच चार कोटीच्या ठेवी ठेवून नागरिकांनी संस्थेवरील विश्वास स्पष्ट केला आहे. संस्थेचे श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे हे संस्थेचे चेअरमन आहेत. श्री. महादेव खंडू एकतपूरे हे व्हाईस चेअरमन आहेत. श्री. शशांक बाळासाहेब यादव, श्री. धिरज विजयकांत कुदळे, श्री. बाळासो. विठोबा सोनवणे, श्री. शिरीष ताराचंद फडे आणि सौ. साधना राजेंद्र गिरमे हे संचालक मंडळातील सदस्या आहेत.

***

# अजितदादा पतसंस्था

अजितदादा नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना दि. २८ आक्टोबर १९९३ रोजी करण्यात आली. कारखान्याचे सभासद, कामगार तसेच माळीनगर येथील व्यापारी यांच्या आर्थिक गरजा भागविण्यात या संस्थेने आपले भरीव योगदान दिले आहे. श्री.शिरीष ताराचंद फडे हे या संस्थेचे संस्थापक असून श्री. विश्वनाथ संगाप्पा चोळे हे विद्यमान चेअरमन आहेत. श्री. अरूण निवृत्ती मदने व्हाईस चेअरमन आहेत. श्री. विजय सोपानराव भोंगळे, श्री. हरिदास कृष्णाजी कांबळे, श्री. विलास दामोदर इनामके, श्री. उमेश बाबूराव शिंदे, श्री. हेमंत रामचंद्र रासकर, श्री. निलेश रत्नाकर गिरमे, श्री. संजय निवृत्ती राऊत, श्री. धनराज जगन्नाथ चव्हाण, श्री. देविदास मल्हारी एकतपूरे, सौ. श्रीलेखा प्रकाश पाटील हे संचालक मंडळाचे सदस्य आहेत तर सौ. सीमा शिरीष फडे व श्री. मनोज रविंद नेवसे हे तज्ञ संचालक म्हणून कार्यरत आहेत.

# नोकर वर्ग सोसायटी

कंपनीच्या कामगारांची खाजगी सावकारी, उसनवारी या संकटातून सुटका व्हावी व त्यांच्या रास्त आर्थिक गरजा भागविण्याची सोय व्हावी म्हणून सहकारी तत्त्वावरील दि. १२ फेब्रुवारी १९५१ रोजी नोकर वर्ग सोसायटी ही संस्था रजीस्टर केली. तेंव्हापासून आज अखेर कामगारांना अडीअडचणींना या संस्थेच्या माध्यमातून आर्थिक उपलब्धता होत आहे. सोसायटीचे भाग भांडवल एक कोटी चौदा लाख असून, कर्ज वाटप एक कोटी एकवीस लाखाचे आहे. संस्था स्वभांडवलावर कार्यरत असून संस्थेचा ऑडिट वर्ग अ आहे. श्री. मनोजकुमार रविंद नेवसे हे चेअरमन आहेत. श्री. विलास लक्ष्मण ठोंगे व्हाईस चेअरमन आहेत. व श्री. दिलीप आण्णा पवळ, श्री. सुरेश बाबूराव जगताप, श्री. रमेश माणिक देवकर, श्री. परेश यशवंत बोरावके, श्री. वैभव वसंतराव म्हेत्रे, श्री. सुनील धोंडीबा सुळे, श्री. मधुकर पितांबर ओव्हाळ, श्रीमती रूक्मिणी राजाराम होनप हे संचालक मंडळाचे सदस्य आहेत. श्री. अमोगसिद्ध पांडुरंग शेंडगे हे सचिव आहेत.

# शेतकरी जागरण मंच

भारत हा कृषी प्रधान देश आहे. असे म्हटले जाते मात्र आजही शेतकऱ्यांसमोर अनेक समस्या आहेत. शेतकरी व शासन यांच्यामध्ये सुसंवाद साधण्यासाठी, नव्या पिढीमध्ये शेतीविषयक आवड निर्माण व्हावी, शेतीतील उत्पादकता वाढावी, नवनवीन यशस्वी प्रयोगांची माहीती शेतकऱ्यांपर्यंत पोहचावी या हेतूने शेतकरी जागरण मंचाची स्थापना करण्यात आली आहे. श्री. विजयकांत शंकरराव कुदळे हे शेतकरी जागरण मंचाचे संस्थापक अध्यक्ष आहेत. पिकांचे एकरी उत्पन्न वाढावे म्हणून त्या क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन, परिसंवाद, शिवार भेटीचे आयोजन केले जाते. श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे, श्री. हेमंत गिरमे, श्री. चंद्रकांत जगताप, श्री. रूपेश गिरमे, श्री. सदानंद बोरावके, श्री. उदय यादव, श्री. राजेंद्र शिवरकर, श्री. सतीश गिरमे, श्री. प्रशांत कुदळे, श्री. निखील कुदळे, श्री. विशाल जाधव हे शेतकरी जागरण मंचाच्या कार्यकरणीचे सक्रिय सदस्य आहेत.



शेतकरी जागरण मंचाच्या शिवारफेरी उपक्रमाअंतर्गत ऊस पीकाची पाहणी करताना तरूण पिढीतील शेतकरी.



शेतकरी जागरण मंचाच्या शिवारफेरी उपक्रमाअंतर्गत शेत तळ्याची पाहणी करताना तरूण शेतकरी.

# ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था

**अरविंद एकनाथराव जाधव**
अध्यक्ष, जेष्ठ नागरिक सेवाभावी संस्था, माळीनगर

दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि; या साखर कारखान्या सभोवती  माळीनगर हे गांव वसलेले आहे. येथे स्वतंत्र ग्रामपंचायत असून त्याची लोकसंख्या सुमारे पंधरा हजार आहे. माळीनगर हे आदर्श, सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक वारसा असलेले गांव आहे.

माळीनगरमध्ये अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या संस्था कार्यरत आहेत. येथील जेष्ठ नागरिकांसाठी काही करता येईल का या हेतूने दिनांक १० नोव्हेबर २०१३ रोजी भारताचे केंद्रीय कृषिमंत्री मा. श्री. शरदराव पवार साहेब यांचे उपस्थितीत ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था, माळीनगर या संस्थेची स्थापना केलेली आहे.आपल्या देशामध्ये अंदाजे १५ कोटी ज्येष्ठ नागरिकांची संख्या आहे. अलीकडे सगळीकडे विभक्त कुटूंबपध्दती मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे व मुले शिक्षण, नोकरी यामुळे घरांमधील ज्येष्ठांकडे जास्त लक्ष देवू शकत नाहीत. त्यांचे आरोग्य, मनोरंजन इत्यादीबाबत अनेक समस्या निर्माण होवू लागलेल्या आहेत. त्यासाठी गांवोगावी ज्येष्ठ नागरिकांच्या संघटना होवू लागलेल्या आहेत. आपल्या महाराष्ट्र व केंद्र सरकारने ज्येष्ठांसाठी अनेक सुविधा देवू केल्या आहेत. एस. टी. प्रवासभाडे, रेल्वेप्रवासभाडे, विमानप्रवासभाडे यामध्ये चांगल्या सवलती दिलेल्या आहेत. आरोग्यासाठी सुध्दा सवलती देवू केल्या आहेत.

पाश्चात्य देशात ज्येष्ठ नागरिकांची फारच काळजी घेतली जाते. त्यामानाने आपल्या प्रगतशील भारतामध्ये नुकतीच सुरवात होवू लागलेली आहे. आम्ही माळीनगर मध्ये श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे, मॅनेजिंग डायरेक्टर यांच्या प्रेरणेने ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था ही धर्मदाय आयुक्तांकडे रजिस्टर केलेली आहे.

त्यामध्ये सध्या ८० सभासद असून त्यांच्या महिन्यातून दोन वेळा मिटींग होतात. त्यामध्ये वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करून नामांकीत वक्त्यांची भाषणे, आरोग्य शिबीरे, शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, सहली काढणे इत्यादींचे आयोजन करीत असतो. यासाठी लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था, माळीनगर यांची कार्यकारणी खालीलप्रमाणे आहे.

**सन्मान्य सदस्य**

१) श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे,
२) श्री. विजयकांत शंकरराव कुदळे,
३) श्री. वसंतराव मल्हारी ताम्हाणे,
४) श्री. नंदकुमार जगन्नाथ गिरमे,
५) श्री. कृष्णकांत शंकरराव कुदळे,
६) प्रदीपराव भगवंतराव जाधव,
७) अरूणराव अनंतराव पांढरे




आरोग्य शिबीर उद्घाटन प्रसंगी डावीकडून : विजयकांत कुदळे, अरविंद जाधव, श्रीकांत मुंदडा, भगवानराव बोरावके, राजेंद्र गोपाळराव गिरमे, चंद्रकांत ना. कुदळे.

**कार्यकारी मंडळ**

१) श्री. अरविंद एकनाथराव जाधव, अध्यक्ष
२) श्री. चंद्रकांत नारायणराव कुदळे, उपाध्यक्ष
३) श्री. गोपाळ मारूती कुटे, सचिव
४) श्री. प्रेमचंद लक्ष्मण कांबळे, सहसचिव
५) श्री. चंद्रकांत यशवंतराव पांढरे, कोषाध्यक्ष
६) श्री. चंद्रकांत किसनराव फुले, सहकोषाध्यक्ष
७) श्री. वसंत विठ्ठलराव तिळवे, हिशोब तपासणीस
८) श्री. मधुकर रामचंद्र पिंगळे, सदस्य
९) श्री. पुंडलीक सोपानराव राऊत, सदस्य
१०) श्री. शरद विठ्ठलराव दप्तरदार, सदस्य
११) श्री. मधुकर काशिनाथ जगताप, सदस्य
१२) श्री. हणमंतराव भिकोबा बोरावके, सदस्य
१३) श्री. शरदराव राधुजी गिरमे, सदस्य
१४) श्री. नरेंद्र जनार्दन गिरमे, सदस्य
१५) श्री. विजय काळबा म्हेत्रे, सदस्य
१६) श्री. हरीदास कृष्णात कांबळे, सदस्य
१७) श्री. सुरेश श्रीपती गिरमे, सदस्य
१८) श्री. दादाराव जगन्नाथ शेंडे, सदस्य

यापुढील काळामध्ये माळीनगरचा ज्येष्ठ नागरिक संघ नेत्रदीपक कामगिरी करून दाखवेल असा मला संस्थापक अध्यक्ष म्हणून आत्मविश्वास वाटतो.

**अरविंद एकनाथराव जाधव**
संस्थापक अध्यक्ष.

# महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा माळीनगर

**विजयकांत कुदळे**
अध्यक्ष,महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा, माळीनगर

महाराष्ट्र साहित्य परिषद माळीनगर शाखेचे उद्घाटन साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा. श्री. फ. मु. शिंदे यांचे शुभहस्ते दिनांक ३ एप्रिल २०१४ रोजी करण्यात आले. ज्येष्ठ कवी श्री. रामदास फुटाणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमात महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा, माळीनगरचे अध्यक्ष श्री. विजयकांत कुदळे, उपाध्यक्ष श्री. राजेंद्र गोपाळराव गिरमे, विश्वस्त- श्री. कृष्णकांत कुदळे, कार्यकारी विश्वस्त- श्री. अरविंद जाधव, कंपनीचे होलटाईम डायरेक्टर श्री. वसंतराव ताम्हाणे, व्हाईस चेअरमन श्री. विलासराव इनामके, कार्याध्यक्ष श्री. दत्तात्रय अवघडे तसेच माळीनगरमधील विविध संस्थाचे चेअरमन, संचालक, नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. माळीनगर परिसर हा शेती, औद्यागिक धंद्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांचे तिर्थस्थान आहे. याबरोबरच साहित्य संस्कृतीचेही माहेरघर आहे. याला अनुसरूनच अनेक साहित्यीक व सांस्कृतीक कार्यक्रमानंतर महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाखा माळीनगर येथे झालेली आहे. ही पुढील सांस्कृतीक व साहित्य वाटचालीची नांदी आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा, माळीनगर यांचे वतीने ध्येयवेडी माणसे इतिहास घडवितात या विषयावर श्री. चंद्रशेखर गायकवाड यांचे व्याख्यान दिनांक ८ जून २०१४ रोजी आयोजित केले होते. तसेच दिनांक १५ जून २०१४ कवी संमेलन आयोजित केले होते.




माळीनगर व परिसरामध्ये वाचन संस्कृती वाढावी म्हणून श्री. विजयकांत कुदळे विशेष प्रयत्न करीत आहेत.
म. सा. प. शाखा माळीनगर उद्घाटन प्रसंगीः डावीकडून अरविंद जाधव, कृष्णकांत कुदळे, विजयकांत कुदळे, वसंतराव ताम्हाणे, रामदास फुटाणे, विलास इनामके, फ. मु. शिंदे, राजेंद्र गोपाळराव गिरमे, नारायण सुमंत

शतकपूर्तीकडे
यशस्वी वाटचाल

**दि सासवड माळी शुगर**
**फॅक्टरी लि. माळीनगर**

ता. माळशिरस, जि. सोलापूर ४१३१०८
दूरध्वनी क्रमांक : ०२१८५-२५११३३, २५१२०२, २५१२०३

E-mail : saswadmali@yahoo.com
spr_smsfmgr@sancharnet.in

**www.saswadmalisugar.com**